

मराठी अनुवाद :

श्री. अशोक कोठारे

# महाभारत



खंड ३५ : सौप्तिकापर्व

# महाभारत

## महाभारत खंड पस्तिसावा

## सौप्तिका आणि स्त्री पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन** : **१० डिसेंबर २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा पस्तिसावा खंड, सौप्तिका पर्व आणि स्त्री पर्व आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# सौप्तिका पर्व (सुरू)

## भाग एक

नारायणाला नमस्कार करुन व नराला स्मरुन सरस्वतीची प्रार्थना करत मी जय म्हणत महाभारताचा हा भाग सादर करत आहे.

संजय सांगत असतो, ते तिघे नंतर दक्षिणेकडे प्रस्थान करतात. कौरवांच्या तळाकडे पोहोचतात. त्यांचे घोडे मोकळे करतात व स्वतः विश्रांती घेण्याचे ठरवतात. तेथील भयाण शांतता पाहून ते शूरयोद्धे सुद्धा घाबरतात. म्हणून ते त्या तळाच्या बाहेर परंतु, जवळच थांबतात. त्यानंतर पूर्ण विचार करून ते जवळच्या वनात शिरतात. ते तिघेही जखमांनी भरलेले होते तरी मुष्किलीने ते पुढचा प्रवास करण्याचे ठरवतात. त्यांना पांडवांच्या सैनिकांची भिती वाटत असते. कांहीं अंतर गेल्यावर त्यांना समजते कीं, त्यांचे घोडे थकले आहेत. त्यानासुद्धा तहान लागलेली असते. सुडाच्या भावनेने ते पूर्णपणे भारलेले होते. दुसरा कोणताही विचार त्यांच्या मनात येत नव्हता. तेथे ते विश्रांति घेण्याचे ठरवतात.

धृतराष्ट्र बोलतात, माझा मुलगा राक्षसी शक्ती असलेला असून त्याला भिमाने खाली पाडले त्याचे मला नवल वाटते. माझे सगळेच मुलगे तसे अवाढव्य शक्ति असलेले होते त्यांना पांडव कसे चुटकीसरशी मारतात तेंच मला समजत नाही. आमचे कसे होणार संजया, आम्ही एकटे पडलो आहोत. मुलांशिवाय मातापिता पोरके समजले जातात. मला पांडवांच्या आधिपत्याखाली रहाण्याची इच्छा नाही. आयुष्यभर एक सम्राट म्हणून राहिलेला मी आता ह्या वयात एका आश्रिताचे जीवन कसे जगणार ते समजत नाही. मरणसुद्धा येत नाही. मला सर्वात जास्त भिती वाटते ती भिमाची, त्याला मर्यादा नाहीत. बाकीचे मला ठीक वाटतात. युधिष्ठीर उत्तम आहे, त्याप्रमाणे अर्जुनसुद्धा चांगला आहे. माद्रीचीसुद्धा बरी आहेत. विदूरानी केलेले भाकित खरे झाले धन्य आहे तो आमचा बंधू. मला सांग, माझ्या मुलाच्या अंतानंतर ते तिघे काय करावयाचे ठरवतात"?

संजय सांगतो, ते एका घनदाट अरण्याकडे जातात जेथे ते लपू शकतील. ते जंगल विविध प्रकारच्या पशूंनी भरलेले होते. तेथे खाद्य म्हणून अनेक पक्षी व खाद्य जनावरं होती. तेथे पाणीसुद्धा मुबलक होते. रहाण्यासाठी ते उत्तम होते,

तेथे ते एक प्रचंड वडाचे झाड पहातात. त्याच्या फांद्या चहोबाजूला पसरलेल्या होत्या, त्या खाली रहाणे शक्य होते. ते जवळ असलेल्या तळ्यात जाऊन स्नान करतात व संध्याकाळची प्रार्थना करतात. सूर्य मावळतीला गेला होता. रात्र होत होती. आकाश तार्यांनी चमकत होते व वातावरण सुद्धा प्रसन्न होते. आता निद्रा देवता त्यांना पकडणार असें वाटत होते. ते फार थकलेले होते. परंतु, आजूबाजूला फिरत असलेले हिंस्त्र श्वापद त्यांना शांतपणे झोपू देत नव्हते. त्यांचे आवाज त्यांना घाबरवत होते. ते तिघे त्या झाडाखाली बसतात व जे झाले त्याचा विचार करत असतात. त्यावेळी त्यांना झोप कधी लागली ते समजत नाही. कृप आणि कृतवर्मन गाढ झोपी जातात. त्या जमिनीवर ते शांतपणे निजतात. अश्वत्थामा मात्र सुडाच्या अग्नीने तसाच जळत होता. त्याला झोप लागत नाही. तो आजूबाजूला निरीक्षण करत असतांना त्याला दिसते कीं, तेथे एक वडाचे झाड होते त्यावर पुष्कळ कावळे बसलेले होते. अश्वत्थामा विचार करत असतो कीं, पांडवांचा नाश कसा करावा. सरळ युद्धात ते शक्य नाही कारण कृष्णाची शक्ती त्यांना सतत मदत करणार आहे. मग करावयाचे ते काय?

तेवढ्यात तो पहातो कीं, एक घुबड तेथे येते आणि त्या झाडावर शांतपणे निजलेल्या कावळ्यांना एकएक करून मारून खाऊ लागतो. अश्वत्थामाला सुचते कीं, तेसुद्धा असे पांडव निजलले असतांना त्यांना मारू शकेल. कोणाला पत्तासुद्धा लागणार नाही कोणी ते मारले. परंतु, त्यासाठी त्यांना पांडवांच्या क्षेत्रात जावे लागणार होते. तो पुन्हा विचार करू लागतो. त्या कारवाईत बाकिचे दोघे त्याला साथ देतील ह्याबद्दल शंका होती कारण ते क्षत्रिय कार्य ठरणार नाही, ते शुद्राचे कार्य ठरेल. म्हणजे जर ह्या पद्धतीने पांडव मारावयाचे असतील तर ते मला एकट्याला करावे लागेल. पांडवांचा नाश चलाखीने करावा लागेल, वैध मार्गाने ते केवळ अशक्य आहे ह्याची त्याला पुरती जाणीव होते. **न्याय मिळवण्यासाठी मार्ग कोणता निवडला ते महत्वाचे नसते न्याय मिळाला हेंच महत्वाचे असते असें धर्मशास्त्रात सांगितले आहे हे तो आठवतो.** म्हणजे घुबडाच्या

मार्गाने आपल्याला काम केले पाहिजे असे द्रोणाचा मुलगा ठरवतो. पांडव आणि पांचालांचे असे जे समाईक आहे ते म्हणजे द्रौपदीची मुलं. त्यांचा नाश केला म्हणजे त्या दोन घराण्यांचा नाश केला असें सिद्ध होईल. अश्वत्थामा विचार करत असतो. त्याला तो विचार पटतो म्हणून तो त्याचा मामा व भोजराजा ह्यांना उठवण्याचा प्रयत्न करतो. त्याला त्याची ती भयंकर योजना अमलात आणण्याची उत्सुकता होते. ते उठतात व अश्वत्थामाची योजना ऐकतात परंतु, त्या दोघाना ती शुद्र कल्पना अजिबात आवडत नाहीत व ते पुन्हा झोपी जातात. ते त्याला सांगतात ज्याच्यासाठी आपण लढलो तो मेला आहे तेव्हां त्या मेलेल्या मित्रासाठी कांहीं अभद्र करणे क्षत्रियाला शोभणारे नाही. ते दोघे त्या योजनेचा धिक्कार करतात. भोज राजा सांगतो कीं, त्याला त्याच्या राज्यात जावयाला पाहिजे येथील कार्य संपले आहे, मला माझ्या जनतेसाठी जबाबदारी आहे ती जास्त महत्वाची आहे. कृप सांगतात दुर्योधनानंतर युद्ध संपले पाहिजे. त्यांना त्याच्या गुरूकुला कडे गेले पाहिजे. अशाप्रकारे त्यांचा विरोध असल्याचे तो द्रोणांचा मुलगा समजतो. तो परोपरीने त्याच्या योजनेचे महत्व सांगण्याचा प्रयत्न करतो पण व्यर्थ. ते सांगतात कीं, त्याची बुद्धी भ्रष्ट झाली आहे कीं तो अशा योजना आखत बसला आहे. कांहीं योग्य सुचव नाहीतर आम्हाला शांपणे झोपू दे.

सौप्तिका पर्व भाग एक संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग दुसरा

कृप बोलतात, तू जे बोलतोस ते सगळे आम्ही ऐकले आहे. आता आमचे ऐक, सगळे आपण दोन गोष्टीने प्रभावित होत असतो. एक आहे, दैव व दुसरे प्रयत्न. त्यापेक्षा इतर कांहीं नसते. आपले काम यशस्वी होण्यासाठी त्याला दैवाची साथ असावी लागते. केवळ प्रयत्न असून चालत नाही. खरे यश ह्या दोनांच्या संयोगाने प्राप्त होत असते. त्या दोघांमुळे मनुष्य एक तर यशस्वी ठरत असतो अथवा अयशस्वी. कोणी एक नसेल तर दुसरा काम करू शकत नाही. ते जीवनाचे सत्य आहे हे लक्षात घे अश्वत्थामा. कधी कधी दैव प्रयत्नाशिवाय यश देते जे त्याच्या प्राक्तनात आहे. परंतु, प्रयत्न यशस्वी होण्यासाठी दैवाची साथ असणे जरूरीचे असते. म्हणजे दैव प्रयत्नापेक्षा जास्त महत्वाचे असते. ज्यांना प्राक्तनामुळे मिळत असते त्यांना प्रयत्नाचे महत्व समजत नाही. दैव असतांना जर जास्त प्रयत्न झाले तर त्यामुळें जास्त यश मिळू शकते. दैव नसतांना प्रयत्नाची पराकाष्ठा करणार्याला निदान थोडे यश मिळते. असे त्यांचे गणित आहे. जे हे गणित समजून आपली कामं करतात ते त्यांचे यश नियंत्रित करू शकतात. जरी प्रयत्ना शिवाय मिळाले म्हणून प्रयत्नाची गरज नाही असें समजणे मूर्खपणाचे आहे. म्हणून जे शहाणे आहेत ते प्रयत्नाची पराकाष्ठा करत रहातात कारण दैव आहे कीं नाही ते समजण्यासारखे नसते. प्रयत्नानां मिळणार्या यशाच्या प्रमाणांवरून ते लक्षात येत असते. त्यासाठी जीवन जगलेले अनुभवी त्याबद्दल मार्गदर्शन करू शकतात. त्यासाठी आपण नेहमी वडीलधार्यांचा सल्ला घेऊन काम करण्याचे पहात असतो. ज्येष्ठ त्यांच्या अनुभवानुसार मार्गदर्शन करत असतात. ते बहुधा योग्य असते. त्यासाठी राजाकडे जुनेजाणते सल्लागार असतात. तसे मार्गदर्शक आपले खरे हितचिंतक असावे लागतात. नाहीतर चुकीची दिशा मिळून नुकसान होऊ शकते. दुर्योधनाचे काय झाले ते तू पाहिलेस. त्यांने ज्येष्ठांचे ऐकले नाही व अननुभवी मित्रांच्या मार्गदर्शनाने गेला व नष्ट झाला हे तू पाहिले आहेस. पांडवांचे पहा ते कृष्ण, व्यास अशा अनुभवी लोकांचे विचारून मग त्याप्रमाणे युधिष्ठीर करत होता तो यशस्वी झाला आहे. हे ज्येष्ठांच्या

सल्ल्याचे महत्व असते. त्याच्यामुळें आपल्याला सुद्धा अपयश आले आहे. म्हणून कांहींही करण्या आधी ज्येष्ठांचा सल्ला घेतला पाहिजे. नाहीतर अपयश येण्याची शक्यता असते. त्यासाठी सल्लागार कोण असावा ते महत्वाचे असते. तो आपला हितचिंतक असला पाहिजे. एरवी चुकीचा सल्ला मिळत असतो. त्यासाठी असे कांहीं करण्याआधी तू धृतराष्ट्र आणि गांधारी ह्यांना विचारले पाहिजेस. तसेंच विदूर आहेत ज्यांचा सल्ला कधी खोटा नसतो. त्यांना विचार व ते सांगतील काय योग्य व काय अयोग्य आहे त्यांच्या अनुभवानुसार. माझे असे मत आहे. जेव्हां प्रयत्न करूनही यश मिळत नाही तेव्हां समजावयाचे कीं, दैव विपरीत आहे. असे बोलून ते गप्प बसतात.
सौप्तिका पर्व भाग दोन संपला.

# सौप्तिका पर्व
# भाग तीन

संजय पुढे सांगतो, कृपाचे ते ऐकून अश्वत्थामा अतिशय दुःखी झाला. त्याला ते सहन झाले नाही व तो एक दुष्ट निर्णय घेतो व त्या दोघांना बोलतो, प्रत्येक माणसाची समजण्याची कुवत भिन्न असते. तरी ज्याला त्याला त्याचा निर्णय योग्य वाटत असतो. प्रत्येक इसम स्वताला दुसर्यापेक्षा जास्त शहाणा समजत असतो. प्रत्येक त्याचा विचार योग्यच समजत असतो. आणि त्याप्रमाणे तो वागत असतो. समविचाराचे लोक एकमेकांना साथ देतात. काळानुसार माणसाचे विचार बदलत असतात. जे आधी योग्य वाटत होते ते नंतर अयोग्य वाटणे शक्य असते. ते अनुभवानुसार होत असते. कोणता एक विचार आदर्श असत नाही सर्वांसाठी. जितकी माणसे तितके विचार असू शकतात. त्यातील कोणता जास्त चांगला ते ठरवणे शक्य नसते. वैद्य त्याच्या निदानाप्रमाणे ओषधी देतो, त्याप्रमाणे माणसे त्यांच्या निदानाप्रमाणे त्यांचे उपाय सुचवत असतात. अखेरीस रोग बरा होणे हा उद्देश असला पाहिजे. दोन हुशार वैद्यांची मतं भिन्न असू शकतात रोग निदाना बद्दल तसेच असते इतर धोरणं ठरवतांना. तरूणपणी ज्यांने मनुष्य प्रभावित होतो त्याने तो उतारवयात होत नाही. संकटात पडलेला किंवा सुखात असलेला ह्यांचे विचार एकाच गोष्टीसाठी भिन्न असू शकतात. गरजेनुसार ह्या गोष्टी बदलत असतात. परंतु, ज्याला जे योग्य वाटते त्याने ते केले पाहिजे. त्याप्रमाणे त्याने प्रयत्न केल पाहिजेत. सगळे लोक त्यांना जे योग्य वाटते ते करू लागतात जरी त्यात ते नष्ट झाले. तो ते करतो कारण त्याला वाटत असते कीं, ते योग्य आहे. एकाला जे योग्य वाटते ते दुसर्याला अयोग्य वाटू शकते. ते त्यांच्या जगाच्या जीवनातील अनुभवावर विसंबून असते.

ज्या भयंकर अनुभवातून आपण गेलो आहोत त्यानुसार जे मला रास्त वाटते ते तुम्हाला सांगणार आहे. ते तुम्हाला पटेल अथवा नाही पटणार. विधात्याने विविध जीव उत्पन्न केले आहेत. त्या प्रत्येकाला त्याचे जीवन कार्य योजलेले आहे. त्याप्रमाणे माणसात निरनिराळे वर्ण तयार झाले आहेत. माणसात ब्राह्मणांना त्याने ज्ञान (वेद) व संयम

दिले आहेत. क्षत्रियांना शौर्य व व्यवस्थापन कला दिली आहेत. वैश्यांना विविध कला कसबी आणि व्यवहारज्ञान दिले आहे, शुद्राना सेवा करण्याची बुद्धी दिली आहे. जर ब्राह्मणात ज्ञान लालसा आणि संयम नसेल तर तो ब्राह्मण समजला जात नाही. तेंच क्षत्रियांबद्दल, वैश्यांबद्दल आणि शुद्रांबद्दल असते. मी जन्माने ब्राह्मण आहे, तरी नशिबाने मी क्षत्रिय वर्णाचे काम करत आहे. मात्र आता मी पुन्हा ब्राह्मण वर्णाचे कार्य स्वीकारत आहे, तरी मी ब्राह्मण समजला जाणार नाही. कारण मी गुणकर्माने क्षत्रिय झालो आहे जरी जन्माने ब्राह्मण आहे. म्हणजे मला क्षत्रियच रहावयाला पाहिजे. त्यामुळें मला माझ्या राजाच्या मृत्यूचा सूड उगवणे क्षत्रिय धर्मानुसार आवश्यक वाटते तर ते मी केले पाहिजे असे वाटते. ते तुम्हाला अयोग्य वाटू शकते.

तो सूड उगवण्यासाठी मी ह्या रात्री पांचालांच्या तळावर जाणार आहे जेव्हां ते मजेत झोपलेले असतील. त्यांची सगळी संरक्षक कवच काढून. त्या आनंदात ते असतांना मी तेथे जाऊन त्यांच्या तळावर जोरदार हल्ला करणार आहे जसे इंद्राने असुरांच्या तळावर केला होता प्राचीन काळी. त्यात ते मारले जातील. त्याला गनिमी कावा म्हणू या. त्यांत त्यांचा सरसेनापति धृष्टद्युम्न सुद्धा मारला जाईल. ज्याने माझ्या पित्याचा वध अवैध मार्गाने केला आहे. वैध लढाईला वैध प्रतिकार व अवैधला अवैध प्रतिकार असे माझे धोरण असेल. म्हणजेच जे कृष्ण सांगतो तेंच, "जशास तसे", माझ्या पित्याच्या शत्रूंचा नाश करण्याने मला मनःशांती प्राप्त होणार आहे. मी त्यांच्या मुडद्यांमध्ये पिनाकधारी महादेवा सारखा फिरणार आहे. त्यानंतर मी पांडवांच्या तळाकडे जाणार आहे. तेथे सगळ्या पांडवांचे मुडदे पाडल्यावर मी माझे ऋण फेडले असे समजणार आहे. ते सगळे दुर्योधनाच्या दिशेने जाताना पाहून मला हर्ष होणार आहे जसा आधी कधी झाला नव्हता.

सौप्तिका पर्व भाग तीन संपला.

# सौप्तिका पर्व
## भाग चौथा

कृप बोलतात, दैवगतिने तुझ्या मनात सूडाचे विचार येत आहे. जरी मला ते मान्य नसले तरी आम्ही दोघे तुझ्या बरोबर येऊ. आता मात्र तुझे कवच उतरव आणि आराम कर. रात्र खूप झाली आहे. उद्या आम्ही आमच्या गाड्यांने तुझ्या मागू येऊ तू पुढे असशिल. तू ते वध करण्याचे काम करशिल आम्ही फक्त तुझ्या साथीला असणार. जर तू हिम्मत दाखवलीस तर तुझे इप्सित पुरे करशिल. परंतु, आता आराम कर. ताज्या दमाने काम कर उद्या. इंद्रसुद्धा थांबवू शकणार नाही. कोणाची हिम्मत आहे जो अश्वत्थामाला आव्हान देईल. वस्तुतः झोपलेल्यांना मारण्यासाठी मोठे शौर्य लागत नाही. मी व कृतवर्मन तुला संरक्षण देण्याचे काम करणार. परंतु, आता थोडी विश्रांती घे, फार थकला आहेस.

उद्या आपण तेथे पांडवांच्या तळावर जाऊ व तू त्यांना युद्धाचे आव्हान दे. आम्ही दोघे तुला संरक्षण देत असल्याने तुला कोणी हरवू शकणार नाही. एकतर आपण त्यांना मारू अथवा आपण मारले जाऊ, कांही एक होणार आहे. मेलो तर स्वर्गात जाऊ. मामाचे बोलणे झाल्यानंतर त्याचा भांचा बोलतो, "अरे मामा, जो मनुष्य सुडाने प्रेरित आहे, किंवा रागावलेला आहे, किंवा पैशाच्या मागे आहे त्याला कधी झोप लागत नाही. जोवर त्याची मनिषा पूर्ण होत नाही तोवर तो अशांत आत्मा झोपू शकत नाही. तसा मी माझ्या धन्याच्या वधाचा सूड उगवल्या खेरिज शात होणार नाही. पांचालांनी माझ्या पित्याचा खून केला आहे ते मी कसे विसरू"? धृष्टद्युम्नाचा खून केल्याशिवाय मला शांति नाही. मी शांतपणे झोपू शकत नाही. त्याचे सगळे मला मारावयाचे आहेत. माझ्या धन्याचे कण्हणे मला आठवते. ते मला शांत बसू देणार नाही. आम्हाला हरवून ते मजेत राहू शकणार नाहीत. त्या पांडवांचा व पांचालांचा नाश मी ते झोलेले असतांना करणार आहे. त्यानंतरच मी शांत होईन.

सौप्तिका पर्व भाग चौथा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग पांचवा

कृप ते ऐकून त्याला सांगतात, "अरे माझ्या भाच्या, ज्याने सामान्य अक्कल गहाण ठेवली आहे, त्याने त्याच्या श्रेष्ठीं करता जरी आज्ञाधारकपणा बाळगला तरी तो नैतिकतेचे मुद्दे समजू शकत नाही. असे माझे मत आहे. ज्याच्यात माणूसकी नाही तो नैतिकता कशात आहे ते समजू शकत नाही. तू शूर आहेस पण तुला नैतिकतेच्या मर्यादा समजत नाहीत त्याला मी काय करणार. सूडाने पेटलेल्या माणसाची तशी गत होते तेंच तुझ्याबाबत झाले आहे. ज्याच्या मनाचा तोल गेला आहे त्यास शहाणपण सांगणे म्हणजे गाढवापुढे गीता सांगण्यासारखे आहे. तशा माणसाला तो जे करतो ते कितीही गैर असले तरी योग्यच वाटत असते. अशाला त्याचे हितचिंतक समजावू शकत नाहीत. जो शहाणा सल्ला ऐकतो तो अंति यशस्वी होत असतो. जो हट्टाने मनमानी करत रहातो ते बरबाद होतो. जो त्याच्या शहाण्या मित्रांचे ऐकतो तो संकटापासून वाचतो. त्यासाठी तू मनमानी न करता थोडा शांत होऊन विचार कर तुला आमचे म्हणणे पटू लागेल. असे झाले तर तुला नंतर पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाही. आपल्या समाजात झोपलेल्याना मारणे भूषणावह समजले जात नाही. कारण ते कृत्य धर्मबाह्य आहे. त्यात पाप आहे व म्हणून तशा कृत्याने तुझे अध्यात्मिक नुकसान होणार आहे. त्याशिवाय ज्याच्यासाठी तू ते करणार त्याचेसुद्धा अध्यात्मिक नुकसान होणार आहे. दोघाचे नुकसान होणार आहे. क्षत्रिय धर्मानुसार ते भयंकर पाप समजले आहे हे तुला माहीत आहे. झोपलेला शस्त्रं खाली ठेवलेल्या सारखाच असतो. पांचाल झोपलेले असतील, त्याची शस्त्रं बाजूला असतील, असे झोपलेले मेल्यागत असतात त्यांना मारणे म्हणजे मेलेल्याला मारण्यासारखे होईल. असे हीन कृत्य करणारा कायम नरकात जाईल त्यातून त्याची सुटका नसेल. त्याने एरवी कितीही मोठे तप केले असेल. कितीही मोठी व्रतस्थता आचरली असेल त्याचा कांहीं उपयोग रहाणार नाही त्याचे भवितव्य ठरवण्यात. शत्रूत्व सिद्ध करण्याची ती पद्धत शास्त्राने मान्य केलेली नाही. म्हणून ते विचार मनातून काढ आणि उद्या सकाळी उठून त्यांना मर्दासारखे आव्हान देऊन

तुझ्या आयुधानी व मंत्रशक्तीने त्यांचा पराजय करून तुझे शत्रूत्व सिद्ध करावे ते खर्या मर्दाला शोभणारे असेल".

अश्वत्थामा बोलतो, "तुमचे बोल मला एका अर्थाने पटतात. ज्यांनी नैतिकतेचे नियम मोडले आहेत असंख्या वेळा त्यांच्याशी नैतिकतेच्या नियमांने वागण्यात काय हशिल आहे"? "आपण पहात होता कीं, माझे पिता समाधीत होते तेव्हां त्या पांचाल पुत्राने त्यांचे शीर कापले ते आणि झोपलल्याला मारण्याच्या कृत्यात काय फरक आहे"? "कर्णाचे रथाचे चाक अडकले होते ते तो निशस्त्र होऊन बाहेर काढत होता तेव्हां त्याला अर्जुनाने बाण मारला व त्याने तो मेला तेव्हां कोणती नैतिकता त्या पांडवांनी आचरली होती ते मला सांग"? भिष्मानी शस्त्र खाली ठेवली होती तेव्हां शिखंडी त्यांच्यावर बाण मारतो त्याच वेळी अर्जुन सुद्धा बाण मारतो ते सगळे मेलेल्याला मारण्यासारखे नव्हते कां"? भुरिश्रव अंतिम समाधीत असतांना सत्यकीने त्याचे मुंडके छाटले ते कसे योग्य ठरते, समाधीत गेलेला व झोपलेला सारखेच नाही का"?

"दुर्योधनाचा वधसुद्धा सगळ्या राजांसमोर तशाप्रकारेच झाला आहे. त्याचे काय समर्थन करणार अहात तुम्ही मामा? त्याच्या शेवटच्या कण्हण्याचा आवाज मला बेचैन करत आहे. पांचाल कोणते धुतल्या तांदळासारखे आहेत. जेव्हां त्यांना संधी मिळाली तेव्हां ते अशी कृत्य करत होते त्याचे काय? माझ्या अशा कृत्यामुळे मला किड्याचा जन्म घ्यावा लागला तरी हरकत नाही. मी जे ठरवले आहे ते मला करावेच लागेल कारण त्यासाठी माझे मन उतावीळ झाले आहे. ते नाही केले तर मला शांती मिळणार नाही. माझे मन त्या पासून दूर करणे कोणालाही आता जमणार नाही. मी त्यांचा नाश करणार म्हणजे करणार".

संजय पुढे सांगतो, असे बोलून तो द्रोणाचार्यांचा मुलगा त्याच्या गाडीकडे जातो. रथात चढून तो पांडवांच्या दिशेने निघून जाऊ लागतो. तेव्हा कृतवर्मन व कृप त्याला विचारतात. "आता ह्या रात्री कोठे जात आहेस"? उद्या निघू आम्ही तुझ्या बरोबर येणार आहोत. शेवटची लढाई करण्यासाठी. अश्वत्थामा ते ऐकल्या न ऐकल्यासारखे करतो. आम्ही तुझ्या भावनांची कदर करणारे आहोत पण तुझे असे वागणे चांगले नाही. ते त्याला सांगत असतात. अश्वत्थामा त्याना सांगतो कीं, त्याला उद्याच्या युद्धात रस

नाही.  तो घुबडाच्या मार्गानेच जाणार आहे व सगळे कावळे मारणार आहे.  तो बोलतो, "मी त्यांना झोपलेलेच मारणार आहे.  ही माझी युद्धनिती आहे असें समजा.  मी आता पाप करण्यासाठी निघालो आहे असें समजा पाहिजे तर.  मला मृत्यूनंतर उत्तम गती नाही मिळाली तरी चालेल.  असें बोलून मागे न पहाता तो त्या रथाने पांडवांच्या तळाकडे जातो.  नाईलाज  म्हणून ते दोघे त्याच्या मागून निघतात.  पांडवाच्या तळाच्या द्वारापाशी ते पोहोचतात.  सगळे शांत होते.  सगळे झोपलेले होते.

सौप्तिका पर्व भाग पांचवा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग सहावा

धृतराष्ट्र बोलतात, "अश्वत्थामा तेथे थांबल्यावर इतर दोघे काय करतात ते मला सांग". संजय सांगतो, कृप व कृतवर्मन ह्यांच्याकडे दुर्लक्ष करत अश्वत्थामा आत जाण्याचा प्रयत्न करणार तेवढ्यात त्याला तेथे आत मध्ये एक धिप्पाड कोणीतरी अंधारात उभे असलेले दिसते. तो द्वारपाल असावा, त्याच्या अंगावर व्याघ्रचर्माचे वरील वस्त्र होते. खालील वस्त्र हरणाच्या चामड्याचे होते. त्याच्या वस्त्रातून रक्त ठिबकत होते. त्याच्या छातीवरून यज्ञोपविता सारखा एक नाग बसलेला होता. त्याचे हात लाब होते, त्याच्या दंडावरसुद्धा साप होते. जणू त्याचे ते अलंकार होते. त्याचे तोंड उघडे होते व त्यातून अग्नी निघत होता. त्याच्या चेहर्यावर अनेक नेत्र होते व ते सगळीकडे पहात होते. त्यांतून असंख्य हृषिकेश निघत होते. त्यांच्या हातात गदा, चक्र आणि शंखू होते. त्या विलक्षण इसमाकडे पाहून अश्वत्थामा घाबरला नाही. अश्वत्थामा त्याच्यावर बाण मारू लागतो. त्याच्या बाणांने ती व्यक्ती घेरली जाते. तो दैवी शस्त्रांचा वापर करू लागतो. परंतु. ते सगळे ती व्यक्ती खाऊन टाकत होती. अश्वत्थामाला समजते की, हे कांहीतरी वेगळे आहे. अश्वत्थामा एक शक्तीमान शलाक त्याच्यावर फेकतो तो त्याच्या अंगात शोषला जातो. त्याने त्या व्यक्तीला कांहींच होत नाही. दुसरा फेकतो त्याचे हवेतच असंख्य तुकडे होतात. ते काम करत नाहीत हे लक्षात आल्यावर द्रोणाचा मुलगा तलवार काढतो. ती तो त्या काळ्याकभिन्न व्यक्तीवर नेम धरून फेकतो. ती तलवार त्याच्या अंगात शिरते व त्यात नाहीशी होते पण त्याला कांहींच फरक पडत नाही. अश्वत्थामा त्याची गदा फेकतो, ती कोठे जाते ते त्याला समजत नाही. आता त्याच्याकडील सगळी शस्त्रं संपल्याने, तो जरा शुद्धीवर येतो. त्याचा अहंकार दबला जातो व तेव्हां त्याला तेथे असंख्य जनार्दन दिसू लागतात. तेव्हां त्याला कृपांचे शब्द आठवतात. "जो हितचिंतकांचे ऐकत नाही तो पश्चात्ताप करत रहातो", असे ते होते. त्याला त्याच्या पित्याची शिकवण आठवते, ते सांगत, पशू, ब्राह्मण, राजा, स्त्री, मित्र, स्वमाता, गुरू, अशक्त व्यक्ती, मूर्ख, अंध, झोपलेला, घाबरलेला, नशेत

असलेला, वेडा, नुकताच झोपेतून उठलेला आणि हरवलेला ह्यांच्यावर शस्त्र चालवावयाचे नाही असे ते सांगत होते. तो स्वताशी बोलतो, "मी माझ्या ध्येयाकडे जात होतो, परंतु, ते शक्य होत नाही असे दिसते. त्याला दैव समजावयाचे काय"? "मी चांगुलपणाचा त्याग केला होता म्हणून असें होत आहे कां"? तो विचार करत असतो. त्यावेळी तो समजतो कीं, जे तो पहात आहे ते विलक्षण आहे. तो मनुष्य नाही मग कोण आहे? अश्वत्थामा समजतो कीं, त्याची पुण्याई त्याला ते पापकर्म करण्या पासून वाचवत असावी. कारण ती व्यक्ती त्याच्यावर प्रतिहल्ला करत नव्हती. ती अश्वत्थामाला फक्त अडवत होती. तो समजतो कीं, त्याने जे करावयाचे ठरवले होते ते करण्याची ती वेळ नाही. जोवर ती वेळ येत नाही तोवर थांबावयाचे असें तो मनाशी ठरवतो. तो ठरवतो कीं, ह्या अद्भूत शक्तीपासून त्याला संरक्षण मिळाले पाहिजे व त्यासाठी तो त्याचे आराध्य दैवत महादेवाची प्रार्थना करण्याचे ठरवतो. त्याची अनेक नांवे घेऊन तो जप करू लागतो. उमेश्वरा, मुंडक्यांचा हार घातलेला कपर्दीना, रुद्रा, हरा, गिरीशा अशी नांवे तो घेत ध्यानात जातो.

सौप्तिका पर्व भाग सहावा संपला.

# सौप्तिका पर्व
## भाग सातवा

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामा त्याच्या रथीतून उतरतो, खाली मान घालून उभा रहातो, महादेवाचे स्मरण करू लागतो. तो प्रार्थना करतो, "अहो स्थानू, सर्व, इशा, गिरीशा, वरदाई, भवा, निलकंठा, शक्रा, रुद्रा, शिवा, ईश्वरा, हरा, त्रिनेत्रा, उमेश्वरा, सर्वशक्तीमाना, ब्रह्मचारी, पूर्णात्मा, आनंददाई, अशा माझ्या दैवता मी तुला शरण जातो. तुझ्या अंगावर चामड्याचे वस्त्र असते, आपण ब्रह्म अहात, शुद्ध अहात, व्रतस्थ असता, विरक्त अहात, सगळ्या बैराग्यांचे दैवत अहात, भूतनाथ अहात, कुबेराचे ईश्वर अहात, गौरीनंदन अहात, कुमाराचे पिता अहात, नंदीनाथ अहात, भयंकर अहात, त्याच वेळी सुखदाई अहात, आपल्यापेक्षा उच्च कांही नाही, आपण सर्व शस्त्रधारी अहात, सगळ्यांचे संरक्षक अहात, आपण पवित्र अहात, अशा आपले मी एकचित्ताने ध्यान करू इच्छित आहे. असे बोलून तो शंकराचे ध्यान करू लागतो. माझ्यावर जी आपत्ती आली आहे त्या पासून मला संरक्षण मिळावे म्हणून मी माझे शरीर आपल्यास दान करत आहे. महादेव त्याच्यापुढे येतात. अनेक तोंड असलेले ते रुप त्याच्या पुढे येते. त्या भूतनाथाच्या भोवती जे त्याचे हस्तक दिसत होते त्यांची तोंड निरनिराळ्या प्राण्यांची होती. त्यात रानडुक्कर, उंट, घोडे, कोल्हे, गाई, अस्वल, मांजर, वाघ, हरण, कावळा, मांकड, पोपट, नाग, बदकं असें कितीतरी वेगवेगळ्या प्राण्यांचे चेहरे त्याला त्यात दिसत होते. ते तेजांनी चमकत होते. कांहींचे चेहरे सुतारपक्ष्यासारखे होते, कांहीं कासवासारखे होते, कांहीं चपट्या तोडाच्या देवमाशासारखे होते, कांहीं मोठ्या मोरी माशासारखे होते, कांहींची तोंडं सिंहासारखी होती, कांहीं बगळे तर कांहीं पारवा सारखे होते, कांहीं हत्तीच्या तोंडाचे होते असे जवळ जवळ सगळ्याच प्राण्यांचे चेहरे तेथे त्याला दिसत होते. माणसा सारखे दिसणार्यांना अनेक हात होते, अनेक डोळे असलेले सुद्धा तेथे त्याला दिसत होते. कांहींची पोटं फार मोठी होती, काहींचे कान लांब होते, कांहींच्या अंगावर मांस नव्हते ते सांगाड्यासारखे दिसत होते. कांहींना डोकं नव्हती, कांहींना डोळे छातीवर

होते, कांहींची मुख पोटात होती. त्यांचे आवाजसुद्धा विलक्षण होते. ते कोणती भाषा बोलत होते ते समजत नव्हते पण ते सगळे एकमेकांशी बोलत होते असे त्याला दिसत होते. जरी त्यांच्या बोली भिन्न वाटत होत्या तरी ते एकमेकांना कसे समजू शकत होते त्याचे अश्वत्थामाला नवल वाटत होते. (*परावाणीत ते बोलत होते जी सर्व चराचरांची मूळ वाणी आहे आपण विचार प्रथम परावाणीत करत असतो त्यानंतर तो आपल्या स्थुल वाणीतून (वैखरी) व्यक्त करत असतो.*) सर्वजण अतिशय विचित्र प्रकारचे होते ज्यांची कोणी कल्पना करू शकणार नाही. कांहींना चार जिभा होत्या कांहीं ज्या मादी वर्गातील असाव्यात त्यांचे स्तन खूप मोठे होते. कांहींना दोन तीन स्तन होते तर कांहींना एकच स्तन होते. कांहींच्या अंगावर खवलं होती. कांहीं मात्र अतिशय सुंदर होते. ते माणसाच्या जातीतील वाटत होते. कांहींच्या गळ्यात फुलाच्या माळा होत्या तर कांहींच्या गळ्यात हाडाच्या माळा होत्या. असे असंख्य प्रकारचे ते हजाराने तेथे त्याला दिसत होते. त्यांनी शंकराला वेढलेले होते जसें दास स्वामीला वाढतात. कित्येकांच्या हातात विविध प्रकारची हत्यारे होती. जणू काय ते लढण्यासाठी सज्ज आहेत. धनुष्य घेतलेले त्यांच्या पाठीवर भाता घेऊन सज्ज होते. कांहींच्या हातात सोटे, गदा, तलवारी, कुर्हाडी, भाले अशी आयुधं होती. कांहींच्या डोक्यावर जो मुकूट होता त्यात साप बसलेले होते. ते तेथून डोकावून आजूबाजूला पहात आहेत असे दिसत होते. कांहींच्या अंगावर मौल्यवान अलंकार होते. कांहीं मळलेले होते, कांही चिखलाने भरलेले होते, कांहींच्या पायाना बदकाप्रमाणे बोटात पडदे होते. जणूकाय ते पाण्यात असतात. कांहींना दाढ्या होत्या तर कांहींच्या केसाच्या बटा लोंबत होत्या. ते सगळे आनंदात दिसत होते, कांहीं ढोलकी वाजवत होते, तर कांही झांजा वाजवत होते, कांहीं शंखू, गोमुख, टाळ अशी वाद्य वाजवत होते. कांहीं त्या तालावर नांचत होते. त्याची नृत्ये विविध होती त्या त्या प्राण्याच्या प्रवृत्तीनुसार ते होते. परंतु, ते सगळे प्रसंगी भितीदायक वाटत होते. कांहीं मोठ्याने किंचाळक होते. त्यांच्या अंगावरील हार व माळा त्याच्या नांचामुळे विचित्रपणे उडत होते. त्याचे स्वरुप लढाऊ योद्ध्याचे होते जे हमखास जिकणारे असतात. कांहीं बुटके होते तर कांहींच्या माना लांब होत्या. त्याची हिम्मत अशी वाटत होती कीं, ते सगळे आकाश खाली ओढून

आणतील. त्यांच्या वागण्यात कोठेही भितीचा लवलेश नव्हता. त्यांच्या वागण्यात कोठेही गर्विष्ठपणा नव्हता. महादेव मोठ्या कौतुकाने त्यांच्या लिला पहात होते. ब्रह्माच्या दुष्मनांचे रक्त व चरबी ते स्वाहा करत होते. ते सोम पीत असल्याचेसुद्धा त्याने पाहिले. ते भवाचे मदतनिस होते. एकाप्रकारे ते त्याचे भीषण असें लष्कर होते. जे पाहून कोणीही घाबरून जाईल. त्याच्या मध्ये महादेव आणि उमा वावरत असल्याचे त्याला दिसत होते. असे ते सगळे त्याच्याकडे (अश्वत्थामाकडे) येतांना त्याला दिसले. ते महादेवाचे सैनिक अश्वत्थामाला त्याच्या संहारात मदत करणार असें दिसत होते. अश्वत्थामा स्वतः अंशात्मक रुद्र होता. त्यांच्या हालचाली पाहून कोणीही भयचकित झाला असता.

ते विलक्षण दृष्य पाहून द्रोणांचा मुलगा अजिबात घाबरला नाही. तो ते फक्त पहात होता. तो स्वताचे बळीदान करण्याच्या इराद्याने मान खाली घालून होता. त्यानंतर दान करण्याचे मंत्र बोलत तो स्वताचा बळी चढवण्याची तयारी दाखवतो. तो हात जोडून बोलतो त्या ईश्वराला, "मी अंगीरसाच्या वंशाचा माझे बलिदान करत आहे. ते तू स्वीकार, मी एकचित्ताने ते करत आहे म्हणून ते तू स्वीकारावेस. तू सर्वात आहेस व सगळे तुझ्यात असतात". त्यानंतर तो वेदीवर चढतो (काल्पनिक) ज्यावर त्याचे बलिदान होणार असते. त्यानंतर तो अग्नीत प्रवेश करतो. ते होत असतांना महादेव स्वतः तेथे अवतरतात. हसत हसत ते बोलतात, "सत्य, शुद्धता, प्रामाणिकपणा, त्यागबुद्धी, वैराग्य, व्रतस्थाता, क्षमाशिलता, भक्ती, सहनशिलता, विवेक ह्या दहा गुणानी कृष्णाने मला जिंकले आहे. म्हणून मला त्याच्या इतका प्रिय कोणी नाही. त्याच्यासाठी मी पांचालांना संरक्षण देत आहे. त्या मार्गाने मी माझे त्याच्या वरील प्रेम व्यक्त करत होतो. परंतु, पांचालांचासुद्धा काळ संपला आहे. म्हणून मी तुझ्या करवी त्यांचा नाश करणार आहे". असे बोलून महादेव अश्वत्थामाच्या शरीरात शिरतात. त्याला एक धारदार समशेर देतात. त्यामुळे तो द्रोणाचा मुलगा शक्तीमान होतो. त्याचे क्षात्रतेज उफाळून येते. त्याच्या दोनही बाजूंना पिशाच्च असतात असा तो त्या तंबूत जाऊ लागतो भारल्यासारखा. सौप्तिका पर्व भाग सातवा संपला.

# सौप्तिका पर्व
## भाग आठवा

धृष्टराष्ट्र बोलतात, "द्रोणाचा मुलगा आत जात असतांना कृप आणि कृत घाबरून तेथेच थांबले होते कां"? मला वाटते ते तसे न घाबरता तेथेच थांबले असावेत. किंवा ते जोराने धडक देत अश्वत्थामाच्या मागोमाग आत घुसतात, नेमके काय झाले ते मला सांग".

संजय पुढे सांगतो, द्रोणाचा मुलगा जे विलक्षण दृष्य पहात होते ते फक्त त्याच्यासाठी होते, ते इतर कोणी पाहू शकणार नव्हते. त्यामुळे ते दोघे बाहेर त्याची वाट पहात असतात. तेवढ्यात ते पहातात कीं, अश्वत्थामा मोठ्या उत्साहाने त्यांच्या दिशेने येत आहे. तो आनंदात दिसत होता. तो त्यांना सांगतो कीं, चला तुम्हीसुद्धा माझ्यासह या. आपण त्या पांचालांचा नाश करू. त्याची परवानगी मिळाली आहे. ते झोपलेले आहेत तेव्हांच त्यांचा नाश आपल्याला करावयाचा आहे. मी यमासारखा त्यांचा संहार करणार आहे. मी मारत असतांना त्यांच्या पैकी कोणी निसटणार नाही ह्याची खबरदारी तुम्ही घ्यावयाची आहे. जेथे दरवाजा नाही अशा जागेतून तो त्या तंबूत शिरतो. ते प्रथम धृष्टद्युम्नाच्या दालनात जातात. ते पांचाल पुरते थकलेले होते व गाढ निद्रा करत होते. कित्येक जोराजोराने घोरत होते. धुपाच्या गंधाने माखलेल्या मोल्यवान आंथरूणावर तो शांतपणे निजला होता. अश्वत्थामा त्याला एक जोरदार लाथ मारतो. त्या बरोबर तो उठतो. तो अश्वत्थामाला ओळखतो. तो त्याच्या पुढे समशेर घेऊन उभा होता. धृष्टद्युम्न उठण्याचा प्रयत्न करत असतांना अश्वत्थामा त्याला डोके दाबून खाली त्या आंथरूणावरच ठेवत होता. झोपेच्या आहारी गेलेला धृष्टद्युम्न कांहीं करू शकत नव्हता. अश्वत्थामा त्याच्या पायाने धृष्टद्युम्नाचा गळा दाबत असतो व त्याचा श्वास बंद करण्याचा प्रयत्न करत असतो. जसे खाटीकखान्यात प्राणी मारले जातात तसे तो त्याची गर्दन छाटतो. पांचाल पुत्र त्याच्या नखांनी अश्वत्थामाला ओरबडत असतो. धृष्टद्युम्नाला काय होत आहे ते समजते व तो त्याला शांतपणे बोलतो कीं, "अश्वत्थामा त्याला मारू शकतो, उगाच वेळ दवडू नकोस. त्यामुळे मी स्वर्गात जाणार आहे".

अश्वत्थामा त्याला मारल्यानंतर बोलतो, "अरे नीचा, तुला स्वर्गात जागा मिळणार नाही कारण तू तुझ्या गुरूचा वध घाताने केला आहेस". त्यानंतर तो त्याला लाथा मारत असतो. ते होत असतांना त्याची बायको व नोकर जागे होतात. परंतु, भितीपोटी ते गप्प बसतात. अश्वत्थामा तेथून निघतो व त्याच्या रथात येऊन बसतो. मोठ्याने गर्जना करत तो त्या तंबूच्या दुसर्या भागात इतरांचे बळी घेण्यासाठी जातो. तो गेल्यावर त्या बायका व नोकर जोरांने आकांत करू लागतात. ते पहातात कीं त्याचा धृष्टद्युम्न मारला गेला आहे. त्यांच्या आवाजाने इतर क्षत्रिय जागे होतात. ते अंगावर चिलखतं घालून सज्ज होतात. त्या बायका अश्वत्थामाला मारतांना ओळखतात. त्या ओरडून सांगू लागतात कीं, अश्वत्थामा आत घुसला आहे व त्याने धृष्टद्युम्नाला मारले आहे. ती वार्ता सगळीकडे पसरते. सगळे अश्वत्थामाला घेरतात. परंतु, ते अजून निद्रेच्या आहारी असतात, त्यांना तो रूद्र नांवाच्या आयुधाने ठार मारतो जे शंकराचे हत्यार आहे. धृष्टद्युम्नाला मारल्यानंतर त्याचे लक्ष उत्तमौजसाकडे वळते. त्याच्या तो झोपलेला असतांना अश्वत्थामा छातीत लाथ मारतो व त्याला उठवतो. त्याचा गळा पायाने दाबून त्याचा श्वास बंद करतो. त्यानंतर पाळी येते युधमन्यूची. परंतु, तो आधीच जागा झाला होता. तो अश्वत्थामावर गदेने हल्ला करतो. अश्वत्थामा प्रत्यक्षात रुद्र होता ते पहाता त्याची शक्ती अमाप होती. त्याला त्या गदेने कांहीं होत नाही. तो युधमन्यूचा गळा आवळून त्याला मारतो. त्यानंतर इतर गाढ झोपलेले तो न उठवता तलवारीने कापून काढतो, त्यांच्या कर्णकर्कश्य किंचाळ्याने तो आसमंत दणाणून निघतो. त्या मर्दांचे महादेव बळी घेत होता अश्वत्थामाच्या निमित्ताने. ते सगळे झपाट्याना यमाकडे जात होते. त्या अद्भूत तलवारीने तो माणसे, घोडे व हत्ती असें सगळेंच कापत होता. त्यांच्या रक्ताने अश्वत्थामा भिजला होता. काय होत आहे ते कोणाला समजण्या आधीच ते होत होते. ते निश्चितपणे एक अमानवी कृत्य होते. साक्षात यम तेथे वावरत होता असें ते दृष्य होते.

जे जागे झाले होते त्यांना काय होत आहे ते समजत नव्हते कारण अजून ते अर्ध निद्रेत होते. त्यांच्या तंबूत अश्वत्थामा कसा आला ते त्यांना समजत नव्हते. तो कोणी राक्षस असावा असें कांहीं समजत होते, तो द्रोणाचा मुलगा द्रौपदीची मुलं कोठे आहेत ते पहात

होता. एका दालनात ते एकत्रपणे निजलेले तो पहातो. तेथे त्यांच्या बरोबर सोमकांचे योद्धेसुद्धा झोपलेले होते. ते सोमकांचे त्या गदारोळामुळे जागे झालेले समजतात कीं, कोणीतरी त्यांचा संहार करण्यासाठी तंबूत आला आहे. ते सावध होतात. ते बाजूच्या दालनात झोपलेल्या प्रभाद्रकांना उठवतात. ते अश्वत्थामावर बाणांने मारा करू लागतात. त्यावेळी शिखंडीसुद्धा जागा झाला. तोसुद्धा शस्त्रं घेऊन अश्वत्थामाला आवरण्यासाठी सज्ज होतो. त्यांच्यात बाणद्वंद्व सुरू होते. ते होत असतांना इतर सावध होत असतात. अश्वत्थामा आणि खिखंडी दोघे मोठ्याने ओरडत एकमेकांना आव्हानं देत लढत असतात. शिखंडी त्याच्या आतील कपड्यातच लढत असतो, त्याचे शरीर असुरक्षित होते. अश्वत्थामा त्याची लाबलचक तलवार घेऊन द्रौपदीच्या मुलांवर हल्ला करतो. तो प्रतिविंध्याच्या पोटात तलवार घुसवतो. तो मरतो, शूर सुतसोम द्रोणाच्या मुलाला भोसकतो, त्याच वेळी अश्वत्थामा त्याचा होत छाटतो त्याची तलवार पडते व त्याबरोबर तो सुद्धा पडतो. नकूलाचा मुलगा सतनिक रथाचे पडलेले चाक उचलवतो व अश्वत्थामावर चालून जातो. ते फेकल्यावर सतनिकाचा तोल जातो व तो खाली पडतो. त्याचा फायदा घेत अश्वत्थामा त्याचे डोके छाटून टाकतो. श्रृतकर्मन काटेरी गदा घेऊन त्याच्यावर चालून जातो. अश्वत्थामाच्या माथ्यावर तो वार करतो. त्याचवेळी अश्वत्थामा त्याला तलवारीने मारून टाकतो. तो खाली पडतो. श्रृतकिर्ती त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो, अश्वत्थामा ते डावलत त्याच्यावर वार करतो तलवारीने तो मरतो. त्यानंतर शिखंडीकडे अश्वत्थामा जातो. त्यावेळी तो व इतर प्रभाद्रक द्रोणाच्या मुलावर एकत्रितपणे हल्ला करतात. ते आता पूर्णपणे जागे झाले होते. शिखंडी अश्वत्थामाच्या दोन डोळ्यांच्या मध्ये बाण मारतो. त्याचा त्याच्यावर कांहीं परिणाम होत नाही तो त्याचे शीर कापून टाकतो. तो साक्षात महेश्वर तें करत होता त्यामुळे तो हरणे शक्यच नव्हते. अश्वत्थामा नांवापुरता होता. हे लक्षात घेतले कीं, काय होत आहे ते समजते. त्यानंतर तो प्रभाद्रकांचे मुडदे पाडत जातो. अश्वत्थामा द्रुपदाच्या वंशाचा नाश करण्याचा सपाटा चालवतो. ते सगळे मरतात.

पांडवांकडचे तो नरसंहार पहात असतात. ते पहातात कीं, एक कृष्ण वर्णी कोणीतरी ज्याच्या तोंडातून रक्त ठिबकत होते व त्याचे नेत्र लाल होते, त्याच्या गळ्यांत नारींगी

रंगाच्या फुलाच्या माळा होत्या, अंगाला शेंदूर फासला होता, त्याच्या हातात यमाचा फास होता. ती व्यक्ती महामायेसारखी वाटत होती. ती तेथे असलेल्यांचे जीव काढून घेत होती. दैवगतीने आधीच हैराण झालेले ते आता अश्वत्थामाच्या हल्ल्याने बेजार झाले होते. तरी खर्या मर्दा सारखे ते पांडव लढण्यासाठी सज्ज होतात. त्यांच्या ओरडण्याने इतर झोपलेले पांडव योद्धे जागे होतात. अश्वत्थामा त्यांच्यातील कांहींचे पाय कापतो. थोड्याच काळात तेथे मेलेल्या माणसांचा खच पडला होता. त्याबरोबर तेथे असलेले घोडे सुद्धा मारले जात होते. ते विचारतात, "हे कोण आहे, हे कोण आहे, हे काय होत आहे रात्रीच्या प्रहरी"?

द्रोणांचा मुलगा त्यांचा संहारक झाला होता. पांडवांबरोबर श्रींजय, सोमक ह्यांचे योद्धे मारला जात होते. निद्रेच्या प्रभावाखाली ते होते. त्यामुळें त्यांना मारणे शक्य होते. आता तो द्रोणाचा मुलगा पांडवांची हत्या करत होता. त्यांच्यासाठी ती मृत्यूची रात्र ठरली होती. कांहीं योद्धे काय होत आहे ते न समजल्याने सैरावैरा पळत होते. त्यात पडून मार खात होते. कांहींना त्या गडबडीत त्यांची शस्त्रं मिळत नाहीत. मोठाच गोंधळ झाला होता. ते आकाशातील राक्षस पहात होते व त्याना तो संहार पाहून आनंद झाला होता. त्या रणधुमाळीत धूळ उडाल्याने ती डोळ्यात गेल्याने कोणी कांहीं पाहू शकत नव्हते. अनेक घोडे हत्ती पळू लागतात. कोण कोठे पळत आहे ते त्यांना समजत नव्हते. जो तो आपल्या पित्याला हांका मारत होते. कोण कोणाला मारत आहे तेसुद्धा समजत नव्हते.

द्रोणाच्या मुलाचा मारण्याचा सपाटा चालूच होता. कोणाही वाचत नव्हते. कांहीं शरण आल्यासरखे हात जोडून उभे होते व तो त्यांची कत्तल करत होता. जे पळून जात होते त्या तंबूतून त्याना बाहेर असलेले कृप आणि कृत मारत होते. त्यानंतर ते दोघे अश्वत्थामाचे मदतनीस पांडवांच्या तंबूला आग लावतात. त्यामध्ये मेलेल्या पांडवांच्या प्रेताचा खच पडला होता. ते एकतर्फी युद्ध होते त्यात प्रतिस्पर्धी निशस्त्र होता. त्यामुळे एकतर्फी कत्तल होत होती. त्या अंधाराचा त्यांना फायदा होत होता. यक्ष आणि राक्षस तेथे जमा होत होते. ते बोलत होते की, "पार्थ नसल्यामुळे असा संहार अश्वत्थामा करू शकत आहे. ते कोठे गेले? पांडवांचा संरक्षक कृष्ण कोठे गेला आहे"?

ते असते तर हे झाले नसते असे ते बोलत होते. अर्जुन कधी झोपलेल्याला मारणार नाही. हे अश्वत्थामाचे कृत्य राक्षसी आहे. ते क्षत्रियांचे नाही. युद्धाच्या नियमांनुसार ते होत नव्हते. ते नरसंहाराचे नाटक थोड्या काळात संपते. सगळे पांडवांचे लोक मारले गेले होते. सगळीकडे शांत होते. थोड्या वेळापूर्वी होत असललेला गदारोळ शात झाला होता. कित्यांचे रडणे व कण्हणे मात्र ऐकू येत होते.

राक्षस आणि पिशाच्च मेलेल्या माणसांचे लचके तोडत होते. ते दृष्य भयावह होते. त्यांचे कंठ निळ्या रंगाचे होते. त्यांचे पाय उलटे होते. त्यांची पोटं मोठी होती. ते फार क्रूर दिसत होते. त्यांच्या बरोबर त्यांची मुलं व बायका ज्या तितक्याच भयंकर होत्या वावरत होत्या. पहाणारे रक्त ते मोठ्या मजेत पित होते. ते त्या रक्ताची तारिफ करत होते. इतर हिंस्र प्राणी सुद्धा त्यात सामील झाले होते. सावकाशपणे त्यांची संख्या वाढत होती. ते होत असतांना सकाळ उगवते. अश्वत्थामा त्या ठिकाणाहून निघतो. त्याच्या अंगावर माणसाचे रक्त होते. जे कोणताही सज्जन योद्धा कदापिही करणार नाही ते त्यांने केले होते. अश्वत्थामा त्याच्या पित्याच्या वधाचे दुःख विसरतो. त्याला शात वाटत असते. त्यानंतर तो त्याच्या दोन साथींना भेटतो व त्याच्या पराक्रमाचे कौतुक करतो. कृप आणि कृत सुद्धा त्याला सांगतात त्यांनी काय केले. ते मोठ्या दिमाखात बोलतात, त्यांनी आम्हाला नष्ट केले त्यांना आम्ही नष्ट केले आहे. सूड उगवला गेला आहे.

धृतराष्ट्र बोलतात, "अरे संजया, ते कृत्य जे अश्वत्थामाने त्या रात्री केले ते दुर्योधनाच्या लढाईत कां नाही केले ते मला समजत नाही"?

संजय सांगतो, पार्थाची भिती त्याला होती. त्याशिवाय कृष्णाची तेथे उपस्थिती नव्हती. तसेंच ते योद्धे लढण्यासाठी सज्ज नव्हते. झोपलेल्यांना मारण्यात कोणती फुशारकी आहे. सत्यकी जरी तेथे असतां तर ते जमले नसते इतक्या सहज. त्याशिवाय कपर्दीनाची कृपा होती. त्याच्या कृपेमुळें ते शक्य झाले इतक्या चटकन. त्यानंतर ते दुर्योधन जेथे आहे तेथे जाण्याचे ठरवतात. आशा करत असतात कीं, त्यांचा राजा अजून जीवंत असावा. ते त्याला ती वार्ता देणार असतात.

सौप्तिका पर्व भाग आठवा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग नववा

संजय पुढे सांगतो, ते दुर्योधनाच्या जागी जातात ते पहातात कीं, अजून त्याच्या राजाच्या अंगात धुकधुकी शिल्लक आहे. ते तिघे त्याच्या भोवती बसतात. त्याला जागे करण्याचा प्रयत्न सुरू होतो. तो त्यांचा राजा अधून मधून रक्त ओकत असतो. त्याच्या भोवती हिंस्र पशू येरझारे घालत होते. पण त्याला स्पर्श करत नव्हते. ते त्याच्या मरण्याची वाट पहात होते. मोठ्या मुष्कीलीने दुर्योधन त्यांना दूर करत होता. अधून मधून तो कण्हत होता. ते पाहून ते तीन योद्धे खेद करत असतात. ते असे दिसत होते कीं, दुर्योधन वेदीवर झोपला आहे व त्याच्या भोवती ते तीन अग्नी आहेत. ते त्याच्या तोंडावरील सुकलेले रक्त पुसण्याचा प्रयत्न करतात. ते त्याला सांगतात, अहो राजन, दैव अगदीच आपल्या विरुद्ध नाही. आम्ही त्या सगळ्या पांचालांचा, पांडवांचा, सोमकांचा आणि श्रींजयांचा पुरता नाश केला आहे. कृप सांगतात, "दैव काहीही करू शकते. अकरा अक्षौहीणी सैन्याचा धनी असा मातीत पडला आहे, तसेंच आज आम्ही सगळे तुमचे शत्रू ठार मारले आहेत. जेथे ब्राह्मण त्याच्या मागे मागे करत तेथे आज कोल्हे, लांडगे व तरसं त्याच्या कडे त्याच्या मरण्याची वाट पहात आहे. ह्याला दैवगति म्हणतात".

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामा शोक करत असतो त्यात बोलतो, आपण शंकरशनाचे शिष्य अहात. कुबेरासारखे गदाधारी अहात, तरीसुद्धा आपल्याला भिमाने खाली पाडले. भिमाने मांडीवर वार करून अवैध द्वंद्व केले. त्यात तुम्हाला लाथ मारली, हे सगळे अयोग्य होत होते. त्या युधिष्ठीराचा धिक्कार असो. त्याने ते लाथ मारणे योग्य मानले. बलराम दुर्योधनाचा अभिमान करत होते त्याला अवेध द्वंद्वांत त्याने तुमची अशी दशा केली आहे. मला तुमच्या मातेबद्दल दुःख होत आहे. त्या कृष्णाचा धिक्कार करतो जो स्वता ज्ञानी समजतो. ते सगळे पांडव स्वताला मोठे नितीमान समजतात आहेत मात्र पक्के अनितीमान. त्या दोघांना भिमाला विरोध केला नाही उलट त्याला मांडीवर मारण्यासाठी खुणवत होते. मला चिंता खाते ती तुमच्या मातेच्या भवितव्याची.

ती कोणाकडे पहाणार आता आश्रयासाठी. तिची सगळी मुलं मेली, राज्य गेले त्याची मला खंत वाटते. माझा व कृताचा सुद्धा मी धिक्कार करतो. आम्हा सगळ्यांचा धिक्कार असो. आम्ही तुम्हाला वाचवू शकत नाही. दुःख करण्याशिवाय दुसरे कांहीं करू शकत नाही. आता आमचे काय होणार? आता आम्हाला कोणाचा आसरा राहिला नाही. तुमच्या बरोबर आम्ही अगणित संपत्तीचा उपभोग घेत होतो ते सगळे आता संपले. ह्याचे दुःख होत आहे. आम्ही पोरके झालो आहोत. सगळे आमचे दोस्त वल्हीक, सोमदत्त, भागादत्त, भुरिश्रव सगळे स्वर्गात गेले आहेत. त्यांना आमच्यावतीने तुम्ही मिठी मारा".

संजय पुढे सांगतो, ते बोलून झाल्यावर अश्वत्थामा त्याला सांगतो कीं, तुम्हाला ऐकावयाला आवडेल की, आता पाडवांचे फक्त सात उरले आहेत त्यात पांच पांडव आणि सत्यकी व कृष्ण. आपल्या बाजूचे फक्त तीन आहेत जे तुमच्या समोर आहेत. आता पांडवसुद्धा निसंतान झाले आहेत ते पाहून तुम्हाला खात्रीने आनंद होईल. धडष्द्युम्नाला मी ठेचून मारले, त्याला वीरगती मी मिळू दिली नाही. जे भिष्माला, कर्णाला व द्रोणांना जमले नाही ते आम्ही तिघानी केले आहे. आता आम्ही जातो पुन्हा स्वर्गात भेटू. एवढे बोलून तो शांत होतो. ते ऐकल्यावर तुमचा मुलगा शेवटचा श्वास सोडतो व त्याच्या लोकाला निघून जातो. त्याचा देह गिधाडांसाठी तेथेच रहातो. त्या मृत शरीराला ते पुन्हा पुन्हा मिठी मारतात. ती भली पहाट होती. तुमचा मुलगा स्वर्गात गेला व ते युद्ध संपले. त्यामुळे माझी दिव्य दृष्टी सुद्धा नाहीशी झाली.

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्र त्याच्या मुलाचे स्वर्गात जाणे ऐकल्यावर मोठ्या मोठ्याने श्वास घेऊ लागतो. त्याला त्याच्या भवितव्याची चिंता खाऊ लागते.

सौप्तिका पर्व भाग नववा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग दहावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्या रात्रीनंतर धृष्टद्युम्नाचा सारथी पांडवांच्या ठिकाणी जातो व सांगतो कीं, त्यांचे सगळे उरलेले सैन्य अश्वत्थामा, कृप आणि कृतवर्मन ह्यांनी ते झोपलेले असतांना मारून टाकले. त्यांचे द्रौपदीचे मुलगे व द्रुपदाचे सगळे त्यात ठार मारले गेले आहेत. तो सांगतो कीं, अंधारामुळे तो लपून राहिला व सकाळ झाल्यावर तेथे आला. ते वृत्त ऐकून युधिष्ठीर खाली कोसळला. सत्यकी त्याला आधार देतो. अर्जुन व भिमसुद्धा त्याला आधार देतात. माद्रीचे दोनसुद्धा त्याला हात देतात. त्या प्राथमिक धक्क्यातून सावरल्यावर तो उद्गारतो, "शत्रूचा नाश केल्यावर आपलासुद्धा नाश झाला आहे. दैवाची चक्र कशी फिरतात ते सांगता येत नाही. आमच्या शत्रूनी आमच्यावर अखेरीस मात केली आहे. दुःखात समृद्धी आणि समृद्धीत दुःख असे घडले आहे. अशा जयात काय अर्थ आहे"? "आम्ही निष्काळजी राहीलो व हे असे झाले. सर्वप्रकारची सावधानता बाळगली असती तर हे झाले नसते. आम्ही जयाच्या धुंदीत राहीलो व शत्रूने डाव साधला. ते द्रोण तो कर्ण आम्ही मारले त्यांनी आम्हाला आता मारले कारण आम्ही बेसावध राहीलो. खोल समुद्रातून वाचलेली नाव उथळ पाण्यात बुडाली असे झाले आहे. जे गेले ते स्वर्गात गेले. परंतु मला दुःख होते ते त्या द्रौपदीचे जिच्या मुलांचा अंत असा झाला आहे. तिचे मुलगे व बंधू मेले हे जेव्हां तिला समजेल तेव्हां ती काय म्हणेल आपल्याला"?

युधिष्ठीर तेथे जातो व पहातो त्याचे आप्त जमिनीवर पडलेले. त्यांची शरीर रक्ताने भरलेली, त्याला अनावर दुःख होते. त्यानंतर तो अतिशोकाने बेहोष होतो.

सौप्तिका पर्व भाग दहावा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग अकरावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्याचे सगळे आप्त मारले गेले हे समजल्यावर तो राजा शोकाकूल होतो. त्यांच्या आठवणीने त्याचे ऊर भरून येते. त्याचे अश्रू थांबत नाहीत. त्याचे जलशचे त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत असतात. त्यावेळी नकूल तेथे येतो. त्याच्या बरोबर असते द्रौपदी. शोकाकूल अशी ती मुलांची माता युधिष्ठीरा कडे जाते व बेशुद्ध होते. आपल्या पत्नीला जमिनीवर बेशुद्धावस्थेत पडलेली पाहून भिमाचा पारा वर जातो. त्याला ती पहाते व जास्त रडू लागते. ती त्या सगळ्यांना बोलते, "नशिबाने पृथ्वीचे राज्य मिळाले त्याचा आनंद मात्र मिळणार नाही असे दिसते. त्या माझ्या मुलांचा वध करणार्याला शिक्षा करा तरच ते सुख प्राप्त होईल. अभिमन्यू प्रथम गेला आता सगळे गेले काय उपयोग अशा सत्तेचा? अश्वत्थामाने त्यांचा झोपेत असतांना खून केला ते त्यांचे क्षत्रिय कर्तव्य करत होते म्हणून असें असेल तर त्या क्षत्रिय कर्तव्याचा धिक्कार असो. त्या द्रोणाच्या मुलाला त्याची शिक्षा झाली पाहिजे. तुम्ही युद्धात त्याचा वध कां नाही केला"? त्याला जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत मी येथेच बसून राहीन. असे बोलून ती युधिष्ठीरा जवळ जाऊन रडत बसते. युधिष्ठीर तिला शांत करण्यासाठी बोलतो, "तुझे मुलगे व बंधू त्यांचे क्षत्रिय कर्तव्य करत असल्याने ते स्वर्गात गेले आहेत. आपले दुःख असे आहे कीं, आपण त्याना पुन्हा आपल्यात पाहू शकणार नाही हेंच आहे, त्यांच्या मृत्यूचे एरवी आपल्याला दुःख करण्याचे कारण नाही. अश्वत्थामा दूर वनात पळून गेला आहे त्याला कसे मारणार"? द्रौपदी सांगते कीं, त्याच्या कपाळावर एक मणी आहे त्याच्या जन्मापासूनचा. तो मला आणून द्या म्हणजे मी समजेन कीं, तुम्ही त्याला शिक्षा केली. तो मणी तुमच्या शिरोभूषणात मला पहावयाचा आहे. त्यानंतर ती भिमाकडे पहात त्याला तो मणी आणण्याचा आग्रह करते. ती त्याला आज्ञा करते कीं, तो अश्वत्थामाला मारेल जसे इंद्राने संवराचा वध केला होता. तू वरनावतात सगळ्या पांडवांचा संरक्षक होतास तसा आता तू माझे हे काम करशील. तू अनेक पराक्रम केले आहेस तेव्हां हेसुद्धा तुला करावे लागेल माझ्यासाठी. द्रौपदीची आज्ञा तो नाकारू शकत

नाही. तो त्याचा रथ काढतो त्यात त्याचे धनुष्य घेऊन चढतो, नकूल त्याचा सारथी होतो व ते अश्वत्थामाचा वध करण्यासाठी निघतात. तो अश्वत्थामाच्या मागावर जाऊ लागतो.

सौप्तिका पर्व भाग अकरावा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग बारावा

वैशंपायन पुढे सांगतात, भिमसेन नकूलाबरोबर अश्वत्थामाच्या मागावर गेल्यावर कृष्ण युधिष्ठीराला बोलतो, "अरे पंडुपुत्रा, हा तुझा भाऊ भावनांच्या भरात अश्वत्थामाचा वध करण्यासाठी निघाला आहे. तुझ्या सगळ्या भावंडांत भिम तुझा अतिप्रिय आहे, त्याला अशा संकटात कां घालत आहेस? अश्वत्थामाकडे ब्रह्मास्त्र आहे ते तुला माहीत आहे. ते त्याच्या पित्याने त्याला दिले आहे. ते देतांना द्रोण त्याला एक अट घालतात कीं, ते अस्त्र तो माणसावर फेकणार नाही". ते सांगितल्यावर पुन्हा कृष्ण बोलतो, "द्रोण त्याला सांगतात, तू चांगुलपणाचा मार्ग सोडता कामा नये". ते ऐकल्यावर अश्वत्थामा सर्वप्रकारची समृद्धी मिळवण्यासाठी जगभर भटकत असतो. तुम्ही जेव्हां वनवासात होता तेव्हां तो एकदा माझ्या द्वारकेला आला होता तेथे काय झाले ते सांगतो. तेथे त्याचे वृश्नीं कडून स्वागत होते. त्या काळात एकदा तो माझ्या घरी आला होता. आम्ही दोघे तेथे समुद्रावर फिरावयाला गेलो असतां, तो हसत हसत मला बोलला कीं, "अरे कृष्णा, ते ब्रह्मास्त्र ज्याची पुजा देव आणि गंधर्व करतात, ते मला माझ्या पित्याने शिकवले आहे. ते मी तुला देऊ इच्छितो त्याच्या बदल्यात तू मला तुझे सुदर्शन चक्र दे".

ते ऐकल्यावर त्याला खूष करण्यासाठी मी त्याला बोललो, "देव, दानव, गंधर्व, मनुष्य, पक्षी असे सगळे एकत्र आले तरी त्यांच्या उर्जेपेक्षा माझी उर्जा कित्येकपट जास्त आहे. माझ्याकडे हे धनुष्य आहे, चक्र आहे आणि गदा आहे तुला जे पाहिजे ते घे. त्याच्या बदल्यात मला तुझे शस्त्र नको. माझे जे शस्त्र तुला हाताळता येईल ते तू घे. ते ऐकल्यावर अश्वत्थामा मला बोलतो कीं, त्याला चक्र पाहिजे. मी त्याला परवानगी दिल्या बरोबर तो ते चक्र घेतो. परंतु, त्याला ते हाताळता येत नाही. एका हाताने नाही जमले म्हणून दोन होत वापरले पण तेसुद्धा शक्य झाले नाही. तो दुःखी होतो. पुष्कळ प्रयत्न करून ही त्याला ते जमत नाही तेव्हां तो त्याचा नाद सोडतो. तेव्हां मी त्यास बोलतो, "माझ्या परम मित्राने कधी माझ्या आयुधाची अपेक्षा केली नाही, माझ्या

मुलानी जो मला रुक्मिणीपासून झाला व जो सनतकुमारासारखा आहे त्यांने कधी ती मांगितली नाहीत. गद. बलराम, आणि अनेक माझे एकनिष्ठ साथी त्या कोणीही त्यांची मागणी केली नाही मग तू कां त्याची मागणी करत आहेस"?

अश्वत्थामा माझी क्षमा मागत सांगतो कीं, त्याला ते अस्त्र मला ठार मारण्यासाठी पाहिजे होते. दुर्योधनाने त्याला तसे करण्यास सांगितले होते! तो त्यासाठी दुर्योधनाच्या आज्ञेने मला भेटावयाला तेवढ्यासाठी आला होता.

हे तुला सांगावयाचे कारण अश्वत्थामा सुरूवातीपासून अधम प्रवृत्तीचा आहे ते लक्षात घे.

मी त्याला बोलतो कीं, यादव तुझा सन्मान करतात तरी अशा विचारांमुळे तू आमच्या नजरेतून दूर होशिल. त्यानंतर ओशाळा झालेला अश्वत्थामा ब्राह्मणाचे दान म्हणून दागदागिने, वस्त्रं असे घेऊन निघून गेला होता. ते मी कधी कोणाला सांगितले नाही कारण तशी वेळ आली नव्हती. तो खूनशी आहे, क्षत्रिय नाही व ब्राह्मणसुद्धा नाही तो एक असुर आहे माणसाच्या देहात जसा दुर्योधन आहे. म्हणून साध्या साम वृकोदराला त्याच्या मागे धाडणे धोक्याचे आहे असे मला वाटते. त्याला संरक्षणाची आवश्यकता आहे कारण अश्वत्थामा पूर्णपणे असुर झाला आहे.

सौप्तिका पर्व भाग बारावा संपला.

# सौप्तिका पर्व
# भाग तेरावा

वैशंपायन बोलतात, ते बोलून तो यादव त्याच्या रथात सर्व सामुग्री घेऊन तयारीने निघतो भिमाला संरक्षण देण्यासाठी. त्या रथाच्या उजव्या बाजूस सैव्य व डाव्या बाजूस, सुग्रीव होते. त्या रथाचा ध्वज उंच होता त्याची रचना दैवी होती. त्यावर विनताचा गरूड विराजमान होता. त्यानंतर हृशिकेष त्यात चढला. त्याच्या मागून अर्जुन व युधिष्ठीर होते. ते सगळे त्या एकाच रथात होते. कृष्ण त्यांच्याकडील सांरग धनुष्य घेऊन होता. ते रथात बसल्यावर तो रथ निघतो. तो रथ उडतो त्याचा मोठा आवाज होतो. ते वेगांने जात भिमाला गाठतात. ते भिमाला पहातात परंतु, त्याला पुढे जाण्यापासून अडवू शकत नाहीत. तो गंगा नदीच्या किनार्याने जात होता. तो तेथे व्यासमुनी पहातो. ते नदी किनारी कुसाच्या गादीवर बसलेले होते. त्यांच्या बाजूला अश्वत्थामा बसला होता. त्याला पाहिल्याबरोबर भिम त्याचे धनुष्य घेऊन बाणांचा नेम धरतो त्याच्यावर. त्याला येतांना अश्वत्थामा पहातो त्याच वेळी तो कृष्ण आणि अर्जुन व युधिष्ठीर येत असलेले पहातो. तो समजतो कीं, त्याची वेळ आली आहे. त्यावेळी त्याला ब्रह्मास्त्राची आठवण येते. तो एक कुसाचे पाते घेतो व त्यावर मंत्र भरतो. त्यामुळें ते साधे गवताचे पाते शस्त्र बनते. त्यानंर तो मोठ्याने ओरडून बोलतो कीं, "हे पांडवांच्या विध्वंसासाठी", असे बोलल्या बरोबर ते पाते तो त्यांच्यावर फेकतो. त्या गवताच्या पात्यातून अग्नी निघू लागतो. जो सगळे जग भस्मसात करणारा होता जसे युगांताच्या वेळी होते.

सौप्तिका पर्व भाग तेरावा संपला.

# सौप्तिका पर्व
## भाग चौदावा

वैशंपायन पुढे सांगतात, द्रोणाच्या मुलाचा उद्देश कृष्णाला समजतो, तो त्वरित धनंजयाला बोलतो, "आता वेळ आली आहे त्या मंत्राचा उपयोग करण्याची जे तू शिकून ठेवले आहेस. त्यांचा वापर आता अश्वत्थामावर करावयाचा आहे. त्याने तू तुझ्या सगळ्यांना संरक्षण देऊ शकशिल. तो मंत्र बोलून बाण त्याच्यावर सोड. ती आज्ञा समजून अर्जुन एक बाण मंत्रून द्रोणावर फेकतो. अर्जुन अश्वत्थामाचे व त्याबरोबर त्याच्या सगळ्या भावंडांचे भले चिंतून परमेश्वराला स्मरून मंतरलेला बाण मारतो. तो बोलतो अश्वत्थामाचे ब्रह्मास्त्र बाद हो. त्याबरोबर त्यातून ज्वाळा निघतात व तो बाण निघतो. दोनही अस्त्रांतून अग्नी उत्पन्न झाला होता. आगीचा गोळा तयार झाला होता. आकाशात गडगडाट ऐकू येऊ लागला. असंख्य अशनि पडू लागले. सगळ्या चराचरात भिती उत्पन्न झाली. सगळे आकाश त्या आवाजाने दणाणून गेले होते. सगळी कडे आगीचे लोळ उठले होते. सगळी पृथ्वी थरथरू लागली. ते घडत असतांना नारद मुनी जे सगळ्या चराचराचे संरक्षक आहेत व व्यास जे पांडवांचे जनक आहेत ते दोघे तेथे अवतरतात. ते दोघे त्या दोघांना, अश्वत्थामा आणि अर्जुन, शांत होण्यास सांगतात. सगळ्या जगाचे भले करणारे ते दोघे त्या दोन आगीच्या डोंबामध्ये उभे रहातात व त्यांना मिळू देत नाहीत. त्याच्या विलक्षण शक्तीने ते दोन ऋषी ती दोन अस्त्रं निकामी करत असतात. ते बोलतात, "अशी अस्त्र माणसांवर सोडावयाची नसतात तरी असे अविचाराने तुम्ही कसे वागता"?

सौप्तिका पर्व भाग चौदावा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग पंधरावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांना पहातांच अर्जुन त्याचे अस्त्र मागे घेण्याचे ठरवतो. तो हात जोडून बोलतो कीं, तो त्याचे अस्त्र मागे घेण्यास तयार आहे पण अश्वत्थामाचे अस्त्र मागे होणे त्यासाठी आवश्यक आहे. कारण जर तसे नाही झाले तर पाप बुद्धीने सोडलेले त्याचे ब्रह्मास्त्र सगळे नष्ट करील. तरी त्याला ते मागे घेण्यास सांगावे. अर्जुन त्या ऋषींना विनंती करतो.

वैशंपान पुढे सांगतात, ते बोलून अर्जुन त्याचे अस्त्र मागे घेतो. मी ते अश्वत्थामाच्या ब्रह्मास्त्राला अडवण्यासाठी योजले होते. असें तो त्याचे स्पष्टीकरण देतो. आपण देवा सारखे अहात. तुम्ही तिनही जगं तुमच्या सिद्धीने त्या ब्रह्मास्त्रापासून वाचवू शकाल असें मी समजतो, अर्जुन बोलतो. अशी अस्त्रं मागे घेणे सोपे नसते पण अर्जुन ते करतो. तसे फक्त इंद्र करू शकतो. ती अस्त्र ब्रह्माच्या उर्जेतून उत्पन्न झालेली होती. जो ब्रह्मचारी आहे तोंच ते करू शकतो. नाहीतर ते अस्त्र सोडणार्याचा शिरच्छेद करत असते. अर्जुन ब्रह्मचारी असल्यामुळे तो ते करू शकतो. त्याने ते अस्त्र कधीही वापरले नव्हते. अतिशय वाईट परिस्थितीत गेला होता पण ते अस्त्र त्याने वापरले नाही. त्याच्यातील गुणांमुळे ते शक्य झाले. आता अश्वत्थामाची पाळी होती त्याचे ब्रह्मास्त्र मागे घेण्याची. तो ते अस्त्र मागे घेऊ शकत नाही. तो सांगतो, त्याला ते पाठवण्याचे शिकवले परंतु, मागे घेण्याचे शिकवले नाही त्याच्या पित्याने. तो सांगतो, भिमाच्या भितीने मी ते सोडले होते. त्यांने माझ्या धन्याचा कपटाने खून केला आहे. मी अर्जुनासारखा शुद्ध वृत्तीचा नाही. त्यामुळे ते मला करता येणार नाही परंतु, मी त्याला दिशा देऊ शकेन. तरी ते पांडवांचाच फक्त नाश करण्यासाठी सो़डले असल्याने इतर जगाला त्याचा त्रास होणार नाही. मी क्रोधाच्या आहारी जाऊन ते सोडले आहे. त्याला पांडवांचा नाश करू द्या.

व्यासमुनी बोलतात, "अर्जुनाने त्याचे ब्रह्मशीर अस्त्र कोणाला मारण्यासाठी नाही तर इतरांना वाचवण्यासाठी सोडले आहे. त्याच्याकडे द्रोणांनी दिलेले ब्रह्मास्त्र सुद्धा आहे पण तो ते कधी वापरत नाही. त्याने तुझे ब्रह्मास्त्र थांबवण्यासाठी व तेसुद्धा जनार्दनाच्या आज्ञेने

सोडले होते. त्यांने त्याचे क्षत्रिय कर्तव्य केले होते ते अस्त्र सोडून तसे तुझे नव्हते. तू तुझ्या ताकदीचा अशारितीने वाईट कामासाठी कां वापर करत असतोस? जेथे ब्रह्मशीर अस्त्र वापरले जाते तेथे बारा वर्षे पाऊस पडत नाही. म्हणून तो तशी अस्त्र वापरत नाही. तो सूज्ञपणा तुझ्यात नाही. हांच फरक आहे तुझ्यात व पांडवांत. ते शुद्धबुद्धी आहेत म्हणून त्यांचे रहाणे जगासाठी चांगले आहे. ते सुरक्षित असतील तूसुद्धा सुरक्षित होशिल. म्हणून तू ते मागे घे आणि हा वाद संपुष्टात आण. युद्ध युधिष्ठीराने सुरू नाही केले ते दुर्योधनाने केले त्याचे परिणाम जर त्याला भोगावे लागले तर त्यात पांडवांचा काय दोष? तू ब्राह्मण असून असा कसा वागत आहेस"? आता त्याची शिक्षा म्हणून तुला तुझ्या कपाळात असलेला मणी काढून अर्जुनाला द्यावा लागेल. तसे केलेस तर तुला ते मारणार नाहीत".

अश्वत्थामा बोलतो, "हा माझ्या कपाळात असलेला मणी पांडवांच्या सगळ्या धनापेक्षा जास्त मौल्यवान आहे. त्याची किंमत करता येणार नाही. तो मणी धारण करणारा कोणत्याही शस्त्राने मारला जात नाही. त्याला भूक, तहान त्रास देत नाही. तो माणूस कधी थकत नाही. त्याला देव, दानव, नाग, राक्षस, यक्ष असे कोणी मारू शकत नाहीत. तरी जर तुम्ही तशी आज्ञा करत असाल तर मी तो त्यांना देण्यास तयार आहे".

"हा घ्या माझा मणी, त्यासाठी हे मंतरलेले गवताचे पाते पांडवांच्या बायकांच्या गर्भात शिरले पाहिजे. जर ते ब्रह्मास्त्र त्या स्त्रीने पचवले तर तो मणी त्या स्त्रीला मिळेल. ते झाल्यानंतर मी आपल्या सगळ्या आज्ञा मान्य करीन".

व्यास बोलतात, "ठीक आहे मग तसे कर. त्याशिवाय दुसरा कोणता उद्देश बाळगू नकोस. ते अस्त्र पांडवांच्या बायका धारण करतील".

वैशंपायन पुढे सांगतात, अश्वत्थामा ते ब्रह्मास्त्र पांडवांच्या बायकांच्या गर्भात फेकतो.

सौप्तिका पर्व भाग पंधरावा संपला.

# सौप्तिका पर्व
## भाग सोळावा

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाला समजते कीं, अश्वत्थामाचे ब्रह्मास्त्र पांडवांच्या बायकांच्या गर्भात शिरले आहे त्यामुळे त्याला आनंद होतो तो बोलतो, "मला आठवते एक ब्राह्मण विराटाच्या मुलीला बोलला होता की, जेव्हां सगळे पांडव नष्ट होतील तेव्हां तुझ्या मुलीच्या पोटात पांडवांचा वंश वाढत असेल. ती कन्या त्यावेळी उपप्लव्यात रहात होती. बापाच्या मृत्यूनंतर तो जन्मणार म्हणून त्याचे नांव परिक्षित असे ठेवले जाईल".

ते त्याचे बोलणे अश्वत्थामाला आवडत नाही कीं, त्याच्या एवढ्या मेहनतीनंतर सुद्धा पांडवांचा वंश वाढत असेल म्हणजे काय?

तो संतापाने बोलतो, "अरे केशवा, तू तुझ्या नेहमीच्या पांडवांबद्दलच्या पक्षपाती वागण्यानुसार बोलत आहेस, त्यात कांहीं तथ्य नाही. कारण कृष्ण त्याला संरक्षण देत आहे".

ऋषी बोलतात, "ते अस्त्र फुकट जाणार नाही. त्याची विध्वंसक शक्ती त्या गर्भात क्रियाशिल बनून त्या गर्भाचे तेज वृद्धींगत करणार आहे. तो गर्भ मोठा सम्राट होईल, तो दिर्घायुषी असेल. परंतु, तू मात्र सर्व जगात एक नालायक माणूस म्हणून ओळखला जाशिल. तुझ्या पापमय जीवनाची निंदा होईल. त्याची शिक्षा म्हणून तू पुढची तीन हजार वर्षे जगभर भटकत रहाशिल. तुला कोणी रहाण्यासाठी जागा देणार नाही. तुला कोणी मित्र नसेल, तुझ्या जखमांतून वहाणार्या पूंची दुर्गंधी तुझ्या सर्वांगाला येईल. निर्जन अरण्यात तू रहाशिल एकटा. तुला अनेक व्याधी जर्जर करतील. तुझे जीवन नरकासमान होईल जरी तू पृथ्वीवर असलास.

त्याचप्रमाणे परिक्षित वयात आला कीं, वेदशास्त्रसंपन्न होईल, सगळी शस्त्रं, अस्त्रं विद्या शिकेल व साठ वर्षे राज्य करील. त्याच्यातून पांडवांचा वंश पुढे वाढत जाईल. ते होत असतांना तू ते दूरून पहात असशिल. हांच तुला माझा शाप आहे.

पुढे व्यास बोलतात, "तू ब्राह्मण जन्मला आहेस पण क्षत्रिय पिंडाचे जीवन जगला आहे, त्याची ती तुला शिक्षा होत आहे. ब्राह्मणाने कधीही क्षत्रिय पिंडाचे जीवन जगावयाचे नसते".

अश्वत्थामा त्याना बोलतो, "मला माझ्या सगळ्या शिक्षा मान्य आहेत. माझा भ्रमनिरास होत आहे".

वैशंपायन बोलतात, अश्वत्थामा त्याच्या कपाळात असलेला मणी कापून काढतो. त्याचे रक्त वाहू लागते. तो मणी तो युधिष्ठीराच्या कडे देतो. त्या नंतर तो जवळच्या वनात निघून जातो चालत. अश्वत्थामा गेल्यानंतर ते सगळे व्यासमुनी आणि नारदमुनी ह्यांना घेऊन पांडवांच्या तळाकडे निघतात. ते तो मणी द्रौपदीला देतात.

वैशंपायन पुढे सांगतात, तो मणी देतांना भिम बोलतो, "हा घे तो मणी ज्याची तू इच्छा धरली होतीस. अश्वत्थामाचा पुरता बिमोड झाला आहे. आपले दुःख बाजूला सारून ती क्षत्रिय कन्या कृष्णाला बोलते, मला आता कोणी पती नाही. मला कोणी पुत्र नाही, मला कोणी बंधू नाही, किंवा मी जीवंत सुद्धा नाही असे मला वाटते. असे तिला तिचे बोल आठवतात जेव्हां तो (कृष्ण) आधीच्या वेळी (युद्धाच्या आधीची शिष्टाई) जात होता. परंतु, आता तो पुन्हा हस्तिनापुराला जात होता एका वेगळ्या प्रकारच्या शांतता बोलणी करण्यासाठी. तेव्हां सुद्धा ती तेंच बोलते. क्षत्रियांच्या बायकांसाठी तेंच खरे असते. हे कटू सत्य आहे. ती बोलते, तो नीच नराधम दुर्योधन गेला आहे, आम्ही आमच्या शत्रूला त्याची जागा दाखवली. अश्वत्थामाला जीवंत सोडून एक वेगळ्या प्रकारची शिक्षा दिली आहे. जशी कोणी कोण्या भ्रष्ट ब्राह्मणाला दिली असेल. द्रौपदी बोलते, "माझी इच्छा त्यांना शासन करण्याची होती कारण ते त्यांचे कर्म होते". त्यानंतर ती तो मणी युधिष्ठीराच्या फेट्यात अडकवते. तो नेसल्यानंतर तो अधिकच तेजस्वी दिसू लागतो. जणू द्रोणाचार्याना ती अमुल्य भेट दिली आहे.

ते सगळे दुःखात असूनही जे यशा मिळाले त्याचे समाधान त्यांच्या चेहर्यावर दिसत होते. द्रौपदी तिचे व्रत (जमिनीवर झोपण्याचे) सोडते.

सौप्तिका पर्व भाग सोळावा संपला.

# सौप्तिका पर्व

## भाग सतरावा

वैशंपायन पुढे सांगतात, पांडवांचे सगळे झोपेत असतांना मारले गेले ते समजल्यावर युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, "माझी व माझ्या भांवांची शूरवीर मुलं त्या अश्वत्थामाने कां मारली ते समजत नाही. त्याने द्रौपदीची मुलं मारली. धृष्टद्युम्नाला त्याने ठेचून मारले अशासाठी कीं, त्याला वीरगती मिळू नये. असे तो कसे करू शकला"?

कृष्ण त्याला सांगतो, द्रोणाच्या मुलाला त्या सर्वशक्तीमान महादेवाची मदत झाली होती. त्याशिवाय तो ते करू शकला नसता. महादेव प्रसन्न झाले तर त्याचा भक्त अमरसुद्धा होऊ शकतो. गिरीश इंद्रालासुद्धा मारू शकतात. त्यांच्या अनेक प्राचीन लिला मला माहीत आहेत. तो सृष्टीची सुरूवात, मध्य आणि अंत असतो. त्याच्यातून सगळे चराचर उत्पन्न होतात. हे सगळे विश्व त्याच्या मर्जीने चालते. तो जीव उत्पन्न करतो, त्याना वाढवतो व नष्ट करतो. असे अव्याहतपणे होत आहे. ब्रह्माला जीवसृष्टी उत्पन्न करावयाची होती, तो रुद्राला सांगतो, चटकन नवीन जीवसृष्टी निर्माण कर. त्याबरोबर रुद्र बोलतो, तथास्तु, आणि त्यांन पाण्यात राहून तपस्या केली. तसे अनेक वर्षे होत होते. त्यानंर आणखीन जीव त्याने निर्माण केले असे होत गेले व सगळी ही सृष्टी तयार झाली. ब्रह्मा त्याला बोलत, जर माझ्या आधी कोणी उतपन्न झाला नसेल तर मी नवीन जीवसृष्टी तयार करीन. स्थानू सांगतो तुझ्या आधी मी कोणालाही निर्माण केलेले नाही. तूंच पहिला आहेस. पुन्हा स्थानू पाण्यात (विचाररुपी पाणी) बुडतो. त्यानंतर तो दक्षाला उत्पन्न करतो. तो दक्ष इतर प्राणी निर्माण करतो त्याच्या विचारशक्तीने. त्यांना तो भूक देतो. शरीराला पचन संस्था देतो. त्यात चार प्रकारचे जीव ते तयार करतात. सगळे विचाराने. ब्रह्माने उत्पन्न केलेले प्राणी एकमेकांशी लढत असतात. विविध कारणांनी. म्हणून त्यांना संरक्षणाची आवश्यकता वाटू लागली. कांहीं प्राणी भूक लागली म्हणून वनस्पती खातात तर कांहीं इतर प्राणी खाऊ लागतात. जास्त शक्तीमान कमी शक्तीमानांचा आहार करू लागले. वनस्पती कमी शक्तीमान म्हणून तिचा आहार सगळे करू लागले. वनस्पती त्याहून कमी शक्तीमन म्हणून मातीचा आहार करू

लागल्या. अशारितीने जीवांचे खाद्य प्रकार निश्चित झाले. अशारितीने तयार झालेले जीव त्यांच्या क्षेत्रात जाऊन राहू लागले. कोणी वनात, कोणी पाण्यात, कोणी उघड्या जागी तर कोणी वाळवंटात. कोणी उडू लागले. त्यांची वाढ होत गेली व ही सृष्टी उत्पन्न झाली. ब्रह्मा विचार सागरातून बाहेर आले व त्यांना निर्माण केलेली सृष्टी पाहू लागले. त्याने पाहिले कीं, ते प्राणी त्यांच्या प्रजनन अवयवाने नवीन जीव तयार करत होते. ते रुद्राला आवडत नाही. तो त्याचे ते अवयव पृथ्वीच्या उदरात लपवून ठेवतो. ते पाहून कधीही न रागावणारे ब्रह्म रुद्राला समजावतात, "अरे रुद्रा, जे आपल्याला करावयाला अनेक युग लागतात, ते त्या आवयवामुळें कमी वेळात होत होते, ते तू कां पृथ्वीमध्ये गाडलेस"?

रुद्र रागात बोलतो, "जर ते प्रजनन करत असतील तर माझी काय आवश्यकता राहील"? त्यांचे खाद्यसुद्धा तसेंच तयार होत राहिलं. असें बोलून तो रुद्र मोठी तपस्या करण्यासाठी मुंजवत पर्वतावर जातो.

सौप्तिका पर्व भाग सतरावा संपला.

## सौप्तिका पर्व

## भाग अठरावा

ते ऐकून कृष्ण सांगतो, कृतयुगानंतर, देव (ब्रह्मा) यज्ञ करण्याचे ठरवतात. त्यासाठी सगळी तयारी केली जाते. साजूक तुप आणले जाते, इतर सामुग्री जमा केली जाते. त्या यज्ञाची तर्हा ते ठरवतात त्याशिवाय त्या यज्ञातून जो मिळेल त्याचे वाटेसुद्धा ठरवले जातात. त्यात रुद्राचा वाटा ठरवला जात नाही. ते समजल्यावर स्थानू तो यज्ञ मोडण्याचे ठरवतो. त्यात चार प्रकारचे यज्ञ करण्याचे प्रथम ठरते. सार्वजनिक यज्ञ, खास कारणाचा यज्ञ, नित्य दैनंदीन यज्ञ आणि विशेष कृपा मिळवण्याचा यज्ञ असे ते होते. त्या चार यज्ञांतून हे विश्व तयार झाले आहे असे समजले जाते कपर्दीनाने त्याचे धनुष्य तयार केले ते पहील्या व चौथ्या प्रकारच्या यज्ञांसाठी. त्याचे मंत्र त्याने ठरवले. चौथ्या यज्ञाचे भाग त्या धनुष्याचे दागिने झाले. त्यानंतर महादेवांला राग आला, तो त्याचा तिरकमटा घेऊन देवांचे यज्ञ होत होते तेथे जातो. रुद्राला येतांना पाहून पृथ्वी देवता घाबरली. तिच्यावरील पहाड हादरू लागले. वारा थांबला. अग्नी पेटेना, सूर्याचे तेज कमी झाले. चंद्र कोमेजला. यज्ञ स्वतः पळून गेला. यज्ञ स्वर्गाकडे पळाला पण रुद्र त्याच्या मागे लागला. त्याने सावित्रीचे हात तोडले व भागाचे डोळे काढले. पुशनाचे दात पाडले. ते पाहून सगळे देव पळून गेले. ते पळत असतांना खाली पडले बेहोष झाले. नीलकंठ रुद्र त्यांना बंदिस्त करतो. तेव्हां ते स्वर्गाचे सगळे रडू लागतात. त्यामुळें रुद्राच्या धनुष्याची दोर तुटते. त्यामुळे धनुष्याचा दांडा सरळ होतो. ते झाल्यावर देव त्या तिरकमटा नसलेल्या महादेवाला भेटतात. त्याला विनंती करतात. त्याचे संरक्षण मागतात. तो त्यांच्यावर प्रसन्न होतो. तो त्याचा क्रोध पाण्यात फेकून देतो. त्यामुळे त्या पाण्यात आग लागते. शांत झालेला महादेव सावित्रीला तिचे हात देतो. भागाला त्याचे डोळे व पुसनाला त्याचे दात. तो यज्ञ पुन्हा सुरू करतो. पुन्हा एकवार हे जग सुरक्षित होते. देव त्यानंतर महादेवाला मोठा हिस्सा देऊ लागतात. म्हणून जेव्हां महादेव रागावतात, सगळे जग हादरू लागते. तो शांत असेल तर सगळे शांत असते. असा हा महादेव अश्वत्थामावर प्रसन्न झाला होता म्हणून तो तसे कृत्य करू

शकला. त्याला कोणी अडवू शकणार नव्हता. महादेव कां व केव्हां कोणावर प्रसन्न होतील ते कोणी सांगू शकत नाही. ते एक अगम्य सत्य आहे. म्हणून त्याबद्दल तू जास्त विचार करू नकोस. त्यापासून तुला कांही बोध होणार नाही. कारण महादेवाला जन्म व मृत्यू समान असतात. जन्मलेला मरणार व मरण पावलेला पुन्हा जीवंत होणार हा ह्या सृष्टीचा नियम आहे. माणसाची व महादेवाची दृष्टी भिन्न आहेत. तो संहार अश्वत्थामा करत नव्हता, तो संहार महादेव करत होता. त्यात न गुंतता पुढे तू काय करणार त्याचा विचार करायला सुरूवात कर.

## - सौप्तिका पर्व संपले -

# स्त्री पर्व

## (जलप्रदानिका पर्व सुरू)

## भाग पहिला

नारायणाला नमस्कार करुन व नराला स्मरुन सरस्वतीची प्रार्थना करत मी जय म्हणत महाभारताचा हा भाग सादर करत आहे.

जनमेजय विचारतो. दुर्योधनाच्या व इतर कौरवांच्या मृत्यूनंतर धृतराष्ट्र व युधिष्ठीर काय करतात ते मला सांगा अहो ब्राह्मणा. कौरवांचे उरलेले तीन शिलेदार अश्वत्थामा, कृप आणि कृतवर्मन काय करतात. मी अश्वत्थामाच्या करामती समजलो आहे, त्यांचे शापातून मोकळे झाल्यावर काय होते ते मला सांगा. संजय अंध राजाला काय सांगतो ते मला सांगा.

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्र त्याचे सगळे मुलगे मेल्यामुळें स्वताच्या भवितव्याच्या चिंतेने व्यथीत झालेला होता. त्यावेळी शहाणपणासाठी सर्वमान्य समजलेला संजय त्यांना विचारतो, "आपण कशाची चिंता करता"? चिंता करून काय होणार आहे"? विविध देशाचे लोक तुमच्या मुलाच्या बाजूने लढण्यासाठी आले व मेले आहेत. त्यांचे अंत्यविधी करावयाचे आहेत.

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांचे सगळे मित्र, मुलं मेले आहेत ह्याची जाणीव पुन्हा पुन्हा झाल्यामुळे तो वृद्ध अंध राजा पुन्हा खाली कोसळतो दुःखातिरेकांने. तो बोलतो कीं, "मला जगावयाचे नाही, आता मी कोणासाठी जगावयाचे? माझे सगळे मला सोडून गेले आहेत. माझी सत्ता गेली, माझे राज्य गेले, अशा मी जगावयाचे कशासाठी"? मी माझ्या हितचिंतकांचे ऐकले नाही त्याचा परिणाम मी भोगत आहे. विदूरासारखा शहाणा माझ्याकडे असतांना मी चुकीच्या लोकांच्या बातामध्ये अडकलो व सर्वनाश झाला. त्या सभेत कृष्ण परोपरीने सांगत होता कीं युद्ध नको पण मी माझ्या मुलांच्या बातात अडकलो होतो. पांडवांना पांच गांव दिली असती तर काय बिघडले असते? पण माझी बुद्धी भ्रष्ट झाली होती. आता पश्चात्ताप करून काय उपयोग. हे सगळे घडले पण मी अजून मरत कां नाही. माझ्या गत जन्माच्या पापाचे फळ मी आज भोगत आहे. ते माझ्या नशिबात

होते तसे झाले. माझ्यापेक्षा जास्त दुःखी कोण असू शकेल ह्या जगात? आता पांडव मला मारतील तर ते योग्य होईल पण तो युधिष्ठीर प्रेमाची पुतळी तसे कधीच करणार नाही. तो आम्हा उभयतांना प्रेमांने सांभाळेल व तेंच त्याचे प्रेम मला डागण्या देत रहाणार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र अशारितीने शोक करत असतांना संजय त्याला बोलतो, "आपले दुःख विसरा, आपण वेदांचा व इतर शास्त्र ग्रंथांचा अभ्यास केला आहे, आपण ऋषींचे ऐकले आहे, श्रींजय राजा त्याच्या मुलाच्या मृत्यूने असाच शोक करत होता. आपला मुलगा लोभाच्या आहारी जाऊन हे करत गेला व त्याचे परिणाम आपण भोगत अहात. तुमची बुद्धी आता तुम्हाला त्रास देत आहे. तुमच्या मुलांने त्याच्या अहंमन्य वागण्याने सगळ्या जगाशी वैर केले होते. त्यात त्याला त्याचे तितकेच खट्याळ दोस्त मदत करत होते व आपण त्यासागळ्या गोष्टींकडे बुद्ध्या दुर्लक्ष करत होतात. त्याचा हा परिणाम आहे. मोठे मोठे सूज्ञ जन जसे कृष्ण, विदूर, नारद, व्यास, भिष्म, द्रोण, कृप आपल्याला जे सांगत होते ते बाजूला सारून तुम्ही त्या चांडाळचौकडीचे ऐकत राहीलात केवळ लोभामुळे. गर्वाने फुगलेला तुमचा मुलगा जे सांगत होता ते तुम्ही ऐकत गेलात, त्याला जरासुद्धा जाब विचारण्याची बुद्धी आपल्याला झाली नाही. तुमच्या मुलांनी युद्ध पांडवांवर लादले होते म्हणून त्याची जबाबदारी सर्वस्वी आपली आहे. झालेल्या क्षत्रियांच्या संहाराला आपण जबाबदार अहात. आई बाप मुलाना लाड करून बिघडवतात ते असे. आपण सम्राट होता पण आपला अधिकार कधी वापरला नाही असे तुम्ही कां वागलात त्याचा विचार करा. त्याचा अर्थ आपण सम्राट होण्याच्या लायकीचे नाहीत हे सिद्ध झाले आहे. सम्राटाचे एकही लक्षण आपण सिद्ध केले नाही. तुमच्या प्रजेपेक्षा तुम्हाला तुमचा मुलगा जास्त प्रिय होता म्हणून तुम्ही सम्राट होण्यास अयोग्य होता. तरी रिवाजानुसार आपण गादीवर बसला व केवढा मोठा संहार झाला. त्यासाठी आपल्याला कोण शासन करणार"? दुःख करण्यात समय व्यर्थ न घालवता आपण अजून योग्य निर्णय घेऊन झालेल्या चुकीची भरपाई करू शकता. पांडवांना बोलावून ते राज्य त्यांच्या हाती सुपूर्द करून ते तुम्ही करू शकता. त्यामुळे

तुमचे व गांधारीचे भवितव्य सुरक्षित होईल.  केवळ रडण्यात समय घालवू नका".  असा सल्ला संजय त्यांना देत होता.

स्त्रीपर्व भाग पहिला संपला.

# स्त्री पर्व

## भाग दुसरा

वैशंपायन पुढे सांगतात, जनमेजया आता ऐक ते विदूरांचे अमृततुल्य विचार. तुलासुद्धा एक राजा म्हणून उपयोगाचे आहेत. विदूर राजाला सांगतात, "अहो राजन, आपण असे जमिनीवर कां पडला अहात"? सगळेच मरणार असतात. तुमचे मुलगे मेले ते जगाच्या नियमांनुसार झाले आहे. आपल्या मुलांचा लोभ असणे योग्य नाही. शोक करण्याचे कारण काय ते महत्वाचे असते. केवळ मेले म्हणून जर तुम्ही शोक करत असाल तर ते मूर्खपणाचे ठरेल. जे त्यांच्या चुकीमुळे मरतात त्यांच्याबद्दल शोक करणे सुद्धा मूर्खपणाचे असते. ह्या जगाच्या व्यवहारात जे उत्पन्न झाले ते संपणारच हां नियम आहे. क्षत्रियांचा मृत्यू युद्धात होणे भूषणावह समजले जाते. मृत्यू कोणालाही टळत नाही. ज्या अर्थी तुमच्या मुलांचे मृत्यू त्यांच्या चुकींमुळें झाले आहेत त्याबद्दल तुम्ही शोक करणे अयोग्य आहे. जन्म व मरण ह्या दोन अवस्था असतात व त्यांमध्ये जो विराम काळ असतो तेव्हां ते असूनही नसल्यासारखे असतात, ते अदृष्य जगात असतात. देवांनासुद्धा मरावे लागते. ते तुझ्या पोटी जन्मले म्हणून तुझे झाले हेसुद्धा अज्ञान आहे. कारण कोणीही कोणाचे नसते. सगळे दैवयोगाने होत असतं परंतु, मनुष्य त्यात आपले पहाण्याची चूक अज्ञानामुळे करतो व त्या मोहात अडकतो. नातीगोती ही माणसाने तयार केलेली असतात. प्रत्यक्षात असें कांहीं नसते. कोणी कोठेतरी जन्मणार असतोच. कांहीवेळा एका घरात जन्मणारे एकमेकांचे शत्रू ठरतात तर कांहींवेळा दूर जन्मणारे मित्र ठरतात. म्हणून तू जे समजतोस कीं, तुझे मुलगे मेले ते वेदाच्या शिकवणूकीनुसार चुकीचे आहे. पांडव कां तुझे नाहीत? कारण ते तुझ्या पोटी जन्मले नाहीत. हे सगळे आपले समज आहेत, त्यात तथ्यांश नाही. असें समजतात, युद्धात मेला कीं तो स्वर्गात जातो पण त्याला पुरावा काय? सगळ्या माणसाच्या सोयीच्या गोष्टी असतात. जर तसे नाही मानले तर कोणीही युद्धात मरावयाला जाणार नाही. सत्य जगापेक्षा मनुष्य त्याच्या काल्पनिक जगात जास्त रमत असतो. जेव्हां मनुष्य सत्याच्या (परमेश्वराच्या) मागे लागतो तेव्हां त्याला प्रथम ते त्याने रचलेले काल्पनिक जग सोडावे लागते.

आपल्या सगळ्या सुखाच्या दुःखाच्या कल्पना त्या काल्पनिक जगामुळे उत्पन्न झाल्या आहेत. जेव्हां ते शक्य होते तेव्हांच मनुष्य खर्या अर्थाने सत्याकडे (परमेश्वराकडे) वाटचाल करू लागतो. ह्यासाठी तुम्ही आता तुमच्या मुलांच्या दिवंगत होण्याबद्दल शोक करणे थांबवावे. तुमच्या मुलांनी असंख्य योद्ध्यांना मारले होते ते मरण्या आधी त्या मृतांचे आप्त सुद्धा शोक करत असणार. आपण आपले दुःख विसरण्यासाठी त्या शेकडो वीरांच्या मृत्यूस कारणीभूत आहोत हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. त्या कृत्याची तुम्हाला लाज कां वाटत नाही? करावे तसे भरावे हा निसर्गाचा नियम आहे. म्हणून तुमचा शोक करणे योग्य नाही कारण तुम्हाला त्या मेलेल्यांच्या प्रती अजिबात शोक नाही हे विशेष आहे. असें कां त्याचा विचार करा राजे. म्हणजे कार्य कारण भावाचा नियम लक्षात येईल. उलट प्रसंगी त्या अभागी मरणार्या त्रयस्थ क्षत्रियांच्या मरण्याचे कौतुक वाटत असेल कीं, माझ्या मुलांनी इतके योद्धे यमाकडे धाडले! तुमच्या दुःखातील स्वार्थीपणा सुद्धा आपण लक्षात घेतला पाहिजे. म्हणून तुम्ही शोक करणे बंद करावे. कोणी परदेशी जातो तेव्हा सुद्धा माणसे शोक करतात. जरी तो इसम मेलेला नसतो. त्याचे कारण असे कीं, तो मनुष्य पुन्हा कधी भेटणार नाही ह्या विवंचनेने ती शोक भावना उत्पन्न होत असते. जेव्हां तो परत येतो तेव्हां माणसांना आनंद होतो. कारण तो पुन्हा भेटला. मृत्यूबद्दलचे दुःख त्या प्रकारातील असते. मृत इसम कधीच परत येणार नसल्याने त्याचे दुःख विशेष असते. दुःखाचे विचार व्यसना सारखे असतात. जसे व्यसन माणसाचा नाश करते तसे सतत दुःख करणे माणसाचा नाश करू शकते. म्हणून आपण शोक करणे बंद करावे व आपल्या निजी कार्यात गुंतून जावे.

गृहस्था माणसाने तीन गोष्टी करावयाच्या असतात. त्यात कर्तव्य, हित आणि सुख असे दिले आहेत. शोक करण्यात ह्यापैकी एकाचे सुद्धा कार्य प्राप्त होत नसते, उलटपक्षी त्या तिघांच्या विरुद्ध कार्य होत असते. म्हणून शोक थोडा ठीक परंतु, त्यापेक्षा जास्त करू नये. अतिशोकांने माणसाची प्रकृती बिघडते ती ओषधानेसुद्धा सुधारू शकत नाही. विवेकाच्या मदतीने ज्याचे बद्दल मी तुम्हाला सांगत आहे, तुम्ही तुमचा शोक संपवावा. मूर्ख माणसे शोक करण्याचे कौतुक करतात शहाणी माणसे नाही.

सुख व दुःख आपल्या मनाच्या कल्पना असतात त्यात सत्यांश नसतो. म्हणून त्यांत जास्त रमणे शहाणपणाचे नसते.

स्त्री पर्व भाग दुसरा संपला.

# स्त्री पर्व
## भाग तिसरा

धृतराष्ट्र बोलतात, अहो प्रज्ञावंत माझ्या बंधू तुझ्या सांगण्याने माझे दुःख नाहीसे झाले. कारण दुःख करणे हा मार्ग नसतो तर तो अटकाव आणणारा असतो, म्हणून शहाणे जास्त दुःख करत नाहीत.

विदूर बोलतो, मनाच्या शांततेने सुख आणि दुःख दोनही आपण नियंत्रित करू शकतो. परंतु, जर त्यात भावना अडकल्या असतील तर ते होत नाही. जो कार्याच्या सिद्धीच्या विषयामुळें काळजी करतो त्याला दुःख समजले जाते तो प्रकार वेगळा आहे.

मृत्यूनंतर सगळे सारखेच असतात मग त्याच्या मध्ये फरक करणे चुकीचे असते. युद्धात दोघे त्याच्या परीने लढलेले असतात म्हणून ते एकाच दर्जाचे समजले पाहिजेत. ते सारखेच श्रेष्ठ असतात. त्यांच्या त्या कृतीने ते स्वर्गात जातात.

माणसाच्या देहाचे महत्व असते जगतांना. मृत्यू देहाचा असतो त्यातील आत्म्याचा नाही. परंतु. सामान्यतः देहालाच आपण सर्व कांहीं मानतो कारण तो दिसत असतो. त्याच्या विविध अवस्थांचे महत्व असते. शोक तुम्ही करता तो तुमच्या मुलांच्या देहाच्या मृत्यूसाठी कारण तुमची मुलं म्हणजे त्यांचा आत्मा नित्य आहे. तो कधी मरत नाही. तो लहान नसतो, तरुण नसतो व वृद्धसुद्धा नसतो. ते सगळे देहाचे विकार असतात. आपण त्यात रमतो कारण ते आपल्याला दिसत असते. ते सदैव जीवंत आहेत मग शोक कां करावा? माणसाचे जीवन त्याच्या गतकर्मानुसार विहीत असते. ते समजून आपल्या जीवनाचे आपणच कर्ते आहोत हे जर समजून राहीलो तर सर्व प्रकारची सुख व दुःख कां आपण भोगत आहोत ते समजते. ह्या जन्मात जे कृत्य करतो ते भाग्य बनून पुढच्या जन्मी आपल्याला भोगावे लागते हे समजले कीं, कोणी त्याच्या जीवनाबद्दल दुसर्या कोणाला अथवा देवांना दोष देणार नाही. जे सुखाचे क्षण आले ते आपल्याच चांगल्या कर्माचे फळ आहे व जे दुःखाचे आले तेसुद्धा आपल्याच गतकर्माचे फळ आहे हे जो समजतो त्याची मती स्थीर होते. तो न सुखी होत वा दुःखी. असा मनुष्य स्थितप्रज्ञ

समजला जातो.  आपण नेहमी एकटेच असतो जे आजूबाजूला असतात ते कारणमात्र असतात.  स्त्रीपर्व भाग तिसरा संपला.

# स्त्री पर्व
## भाग चौथा

धृतराष्ट्र बोलतात, "अहो प्रज्ञावंत बंधू, मला सांग ह्या जगातील जीवसृष्टीची व्यवस्था कशी असते"?

विदूर सांगतात, मी आपल्याला सांगणार आहे अगदी सुरूवातीपासून कसे जीव उत्पन्न झाले. सुरूवातीला तो जीव म्हणजे त्या शरीराची प्रेरणा शक्ती रक्त आणि जीवरसाच्या मिश्रणातून उत्पन्न होते. त्यात तो सुक्ष्म जीव सावकाशपणे वाढत जातो. पांचव्या महिन्याच्या शेवटी त्याला कांहीं विशिष्ट आकार प्राप्त होतो. त्यानंतर त्याचे विविध अवयव व्यक्त होऊ लागतात. अशारितीने तो एक पूर्ण अवयवाने युक्त असा गर्भ तयार होतो. त्यात चौथ्या महिन्याला त्या गर्भात आत्मा म्हणजे मी प्रवेशतो त्याच्या गतकर्माचे गाठोडे घेऊन. तो गर्भाशयात अतिशय अस्वच्छ अशा अवस्थेत वाढत असतो. त्याला त्वचा प्राप्त झालेली असते. त्यानंतर उदान वायूच्या प्रभावामुळें तो उलटवला जातो. त्यामुळें तो डोके खाली व पाय वर असा होतो. त्यामुळें त्याचे डोके गर्भाशयाच्या तोंडाकडे होते असें कीं, त्यातून तो डोक्याने बाहेर यावा. ते सगळे सोपस्कार होत असतांना त्याला विविध त्रासदायक गोष्टी सहन कराव्या लागतात ज्या आपल्याला समजत नाहीत. त्यानंतर यथावकाश गर्भाशयाच्या आकूंचनाने तो अर्भक बाहेर येतो. म्हणजे त्याचा जन्म होतो. त्यानंतर तो त्याच्या गतकर्माप्रमाणे सगळे भोग चांगले वाईट भोगण्यासाठी तयार होतो. गतकर्माप्रमाणे त्याला विविध भोग भोगावे लागतात त्यात आजार, व्याधी, अपघात, अपमान असे कष्टदायक अनुभव भोगावे लागतात. त्याच प्रमाणे निरोगी प्रकृती, सन्मान, सहकर्य, आधार असें सुखदाई अनुभव सुद्धा येतात. त्याप्रकारे त्याचे जीवन साध्य होत असते. त्याचे सहा दोष जसे काम (इच्छा), क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर त्याच्या विचारांची आखणी करत असतात. त्यातून त्याचा अहंकार उत्पन्न होत असतो. त्याप्रमाणे त्याचे नवीन कर्म ह्या जन्माचे तो करू लागतो. त्यात वासना, लालसा, आसक्ती आणि अहंकार त्याला सतावू लागतात. त्यांच्या प्रभावाखाली तो नवीन चांगले व वाईट कर्म करू लागतो. ते त्याचे

पुढील जन्माचे आयुष्य (भाग्य) ठरवत असतात. त्या सगळ्यांच्या मध्ये अडकलेला तो जीव खरे सुख प्राप्त करू शकत नाही. परंतु, तो सतत सुखाच्या साठीच प्रयत्न करत असतो. त्या मोहजालात अडकलेला तसेंच जीवन जगत असतांना त्याचा मृत्यू कधी नजिक येऊन ठेपला ते त्याला समजत नाही. त्या जीवाच्या कामात गुमंतलेला आत्मा त्या कर्मात अडकून असतो. कारण नसतांना त्या जीवाच्या कर्माला तो आत्मा स्वताचे कर्म समजून त्यात गुंतून जातो. अखेरीस यमाचे दूत त्याला घेऊन जातात पलिकडील जगात. त्याचा देह जातो. म्हणून त्याला आपण म्हणतो कीं, तो मेला प्रत्यक्षात त्याचा देह गेलेला असतो, तो तसाच अव्यक्त रुपात असतो. स्वार्थी त्याच्या कारवायाने यशस्वी झाला तर तो जगाला फसवण्यात कामयाब होतो. त्याला वाटते तो जिंकला. परंतु, ते खरे यश नसते. ती एक मायावी भूल असते. जे सूज्ञ असतात ते अशा यशात रमत नाहीत कारण ते शाश्वत सुख नसते. जे थोडे येते व जाते. कांहीं कायम नसते. परंतु, सामान्यपणे लोक त्यालाच खरे सुख समजून त्यात रमतात. ज्यांना नाही मिळाले त्याला तो तुच्छ समजतो. यशस्वी व अयशस्वी असे भेद करतो. यशस्वी स्वताला सुखी समजतात. अयशस्वी दुःखी होतात. असे होत असते. माणसे जेव्हां दुसर्याला फसवतात तेव्हां वस्तुतः ते स्वताला फसवत असतात कारण त्यांची पुढच्या जन्मी तशाच प्रकारे फसवणूक होणार असते. जो कोणाला फसवत नाही त्याला त्याच्या पुढच्या जन्मी कोणी फसवणार नसते. ह्या जन्मी जर तुम्ही फसलात तर समजा कीं, तुम्ही तुमच्या गेल्या जन्मी कोणाला तरी असेंच फसवले होते ते तुमच्याकडे परत आले आहे. म्हणून त्यासाठी तुम्ही फक्त स्वताला दोष द्या व सुधारा. पण माणसे हा नियम समजत नाहीत व आपल्या अपयशाचे खापर देवाच्या माथी मारत रहातात. जो हे सत्य समजला तो त्याचे वळण सुधारत उच्च पदी जातो. तेथे त्याला कोणी फसवत नाही व तो कोणाला फसवत नाही.

स्त्री पर्व भाग चौथा संपला.

# स्त्री पर्व
## भाग पांचवा

धृतराष्ट्र विचारतात, "मला नीट समजावून सांग ह्या जीवसृष्टीचे नियम. ज्यांच्या समजण्याने मनुष्य त्याचे जीवन सुखी करू शकेल".
विदूर सांगतात, स्वयंभूला नमन करून मी तुम्हाला ते सगळे सांगणार आहे एका रुपकाच्या मदतीने, जे प्राचीन ऋषी सांगत होते जीवसृष्टीच्या व्यवहाराबद्दल. एक ब्राह्मण स्वताला एका अशा अरण्यात नेतो जेथे विविध प्रकारचे प्राणी रहात होते. सगळीकडे वाघ, सिंह, सरभ असे हिंस्त्र प्राणी वावरत होते. त्याशिवाय हत्ती सारखे प्रचंड प्राणीसुद्धा होते. ते सगळे स्वच्छंदपणे त्या अरण्यात रहात होते. ते असे अरण्य होते कीं, त्याची यमासुद्धा भिती वाटत होती. ते अरण्य पाहून त्या ब्राह्मणाला अस्वस्थ वाटू लागले. तो घाबरला. तो भितीने सैरावैरा पळू लागला. कोणाचा आधार मिळतो कां त्यासाठी तो सगळ्या दिशा पहात होता. कांहीं केल्या त्याला टाळता येत नव्हते. ते हिंस्त्र प्राणी त्याला सगळीकडे दिसत होते. त्याला दिसते कीं, ते अरण्य एका जाळीने वेढलेले आहे. त्यामध्ये एक महिला घाबरल्यासारखी उभी होती व तिने तिचे दोन हात वर उचलून मदतीसाठी बोलवत होती. त्याशिवाय त्या जंगलात मोठे पांचतोंडी नाग त्याला दिसत होते. ते नाग डोंगरासारखे प्रचंड होते व त्याचे फणे गगनाला भिडलेले होते. त्या अरण्याच्या मध्यभागी एक मोठा खंदक होता. त्यात कित्येक भिववणार्या अशा विचित्र दिसणार्या वेली व झुडपं होती. सगळेंच भयंकर होते. ब्राह्मण तेथे फिरत असतांना त्या सहजपणे न दिसणार्या खंदकात पडतो. तो त्या वेलीत गुरफटला जातो. त्या वेलींच्या टोकाला एक मोठे फणसा सारखे फळ होते. तो मनुष्य तेथे तसांच टांगलेला त्याला दिसत होता. त्याला त्या खंदकाच्या बाहेर त्या खंदकात डोकावणारा प्रचंड हत्ती दिसतो. त्या सावळ्या रंगाच्या हत्तीला सहा तोड होती व बारा पाय होते. त्याशिवाय त्या ब्राह्मणाला एक मोठा नाग त्या विशाल खंदकात वळवळतांना दिसतो. त्या अरण्यातील ते हिंस्त्र प्राणी सावकाशपणे त्या खंदकात शिरत होते. त्या खंदकाच्या कडांवर जे वेल होते त्यावर भयंकर दिसणार्या गांधील माशा घोंघावत होत्या. त्या माशा

त्या वेलावरील फुलाचे मध खाण्याचा प्रयत्न करत होत्या पण तो मध त्याना खाता येत नव्हता. तेथे टांगत असलेला मनुष्य तो मध खात होता. तेथील झाडांची मुळं कांहीं पांढरे व काळे उंदीर खात होती. त्या ब्राह्मणाला त्या हिंस्त्र प्राण्याची व त्याला हात करणार्या बाईची भिती वाटत होती. त्याचप्रमाणे तेथे असलेले नागसुद्धा त्याला घाबरवत होते. अशा परिस्थितीत तो ब्राह्मण तेथे रहात होता. निराश झालेला तो ब्राह्मण तसांच भविष्याची स्वप्न पहात होता.

स्त्री पर्व भाग पांचवा संपला.

# स्त्री पर्व

## भाग सहावा

धृतराष्ट्र बोलतात, "त्या ब्राह्मणाची अवस्था फारच शोचनीय होती. त्याचे जीवनाशी असलेले संबंध आणि सुखाचे काय झाले ते सांग. तो प्रदेश पृथ्वीवर कोठे आहे. अशा परिस्थितीत कसे पुण्यवंत जीवन जगणार ते ब्राह्मण? मला सांग तो ब्राह्मण त्यातून कसा स्वताची सुटका करतो? त्याला आपण मदत करू शकतो कां? मला त्याची परिस्थिती पाहून फार काळजी वाटू लागली आहे".

विदूर त्याला पुढे सांगतो, मोक्षाच्या दिशेने जाणारे व हा ब्राह्मण ह्यांची परिस्थिती सारखीच असते. ते जो समजला त्याला अंतिम मोक्ष मिळवणे सोपे होते. ते अरण्य म्हणजेच आपले जग आहे. त्यात कमी जागेत सगळे वावरत आहेत. ते हिंस्त्र प्राणी म्हणजे जीवनातील विविध अडचणी. ती महिला आहे मोह माया. तो खंदक म्हणजे आपले शरीर. ते नाग म्हणजे काळ. जो सगळे नष्ट करतो. तो सहा तोंडाचा हत्ती म्हणजे येणारी वेळ. खंदकातील वेली आहेत माणसाच्या वासना. ते उंदीर आहेत दिवस व रात्री. मधाचे थेब आहेत जीवनात मिळणारी सुख. त्याचा आस्वाद ते घेत असतात. ज्याच्या मोहात माणसं पडतात. अशा तुलनेने मनुष्य त्याच्या जीवनातील प्रश्न सोडवू शकतो, असें विदूर सांगतात.

स्त्री पर्व भाग सहावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग सातवा

धृतराष्ट्र विचारतात, "हे रुपक चांगले आहे जीवनाचा अर्थ समजण्यासाठी. असेंच असते आयुष्य. ते ऐकल्यानंतर मला तुझ्याकडून आणखीन असे ऐकावेसे वाटते".

विदूर बोलतात, मोक्षाच्या मार्गाचा चांगला परिचय होण्यासाठी मी पुन्हा ते सगळे जास्त तपशिलात जाऊन सांगणार आहे. लांबचा प्रवास करणारा जसे अधून मधून विश्रांतीसाठी थांबतो तसे अज्ञानी त्या लांबच्या मोक्षाच्या प्रवासात अनेक छोटे विश्रांतीचे टप्पे घेत असतात ज्याला आपण योगशास्त्रात पुनर्जन्म असे म्हणतो. ज्ञान पूर्ण झाले कीं, तो मोक्षाचा प्रवास संपतो. सूज्ञ जाणकार तेवढे करत नाहीत. त्या लांबच्या प्रवासाला कांहीं जंगलातील प्रवास असे समजतात कारण जंगलात जसे अचानक अनपेक्षित धोके उद्भवतात तसे जीवनाच्या प्रवासात धोके उद्भवत असतात. म्हणून त्या मोक्षाच्या प्रवासाला जंगलातील प्रवासाची तुलना केली जाते. त्या धोक्यात गणले जाणारे असतात व्याधी, मनाचे व शरीराचे प्रश्न, त्यांना त्या प्रवासातील जंगली प्राणी समजले आहे जे जीवनात अनेक अडचणी उत्पन्न करत असतात. व्याधींचा धोका संपल्यानंतर मोठा धोका असतो वासनांचा. पंच इंद्रीयांच्या पांच वासना माणसाला सतावू लागतात. त्या वासनांचे मोह ते मधाचे थेंब म्हणून सांगितले आहेत. त्यातून शरीराची सुख मनुष्य (जीव) अनुभवतो. त्यांत न गुंतता आत्म्याला ती सुख पचवायची असतात. ते सगळे करत आयुष्यातील दिवस, रात्री आणि महिने व मोसम असे काळाच्या प्रवासातून त्याला (आत्म्याला) जावयाचे असते. त्या काळाच्या प्रवासात त्याचे शरीर थकते. त्याची सुख भोगण्याची इच्छा कमी होत जाते कारण ज्या शरीराने ती भोगावयाची ते शरीर त्या सुखांसाठी योग्य रहात नाही.

दुसर्या तुलनेत शरीर हे रथ अथवा गाडी समजले आहे व शरीराची प्रेरणा अर्थात् जीव हा सारथी, चालक असें मानले आहे. रथाचा सारथी त्या रथा बरोबर असतो म्हणजे रथ संपला कीं तो सारथीसुद्धा संपतो त्या बरोबर असें असते. त्या रथातील प्रवासी आहे आपण म्हणजे आपला आत्माराम. रथाच्या चलकाच्या कामात ढवळाढवळ करणारा

चालक अर्थात् आत्मा त्या चुकीमुळें पुन्हा पुन्हा जन्म घेत असतो. ज्या आत्म्याने जीवाच्या कामात दखलअंदाजी केली नाही तो आत्मा त्या शरीराच्या वासनांच्या बंधनात रहात नाही. कारण वासना त्या जीवाच्या असतात. जो आत्मा त्या वासनांच्या भोगात रमला तो त्या जंगलातील वेली झुडूपांच्या जाळ्यात अडकला असे ते रुपक आहे. शहाणा आत्मा त्या भोगात गुंतत नाही. तो मोक्षापर्यंत पोहोचतो. भोग शरीराचे असतात त्यात ब्राह्मणाने (आत्म्याने) हिस्सा घ्यावयाचा नसतो. भोग शरीराचे आहेत हे समजणे व त्यात म्हणून न रमणे हे जमले कीं, तो खरा सूज्ञ झाला असें समजले जाते. भोग आत्म्याचे (स्वताचे) आहेत असे जोवर तो समजतो तोवर त्याचा प्रवास जन्मोजन्मी चालूच रहातो. असें समजणे ह्यालाच अज्ञान समजले आहे. आत्मा म्हणजे मी व शरीराचा जीव हे वेगळे आहेत ते लक्षात येणे ही मोक्षसाधनेची सुरूवात असते. असा माणूस त्याचे भोग त्रयस्था सारखे वापरत असतो. शरीराच्या गरजे पुरते ते ठेवावयाचे भान त्यास आले म्हणजे तो चांगला योगी झाला असें मानले जाते. तसा माणूस सुख आणि दुःख ह्या विकारांमुळे बाधत नाही. त्या वासनांच्या इच्छा त्या शरीराच्या जीवाच्या आहेत हे लक्षात येणे व त्याप्रमाणे त्यांबद्दल त्रयस्थता आचरण्यात असणे हे चांगल्या योग्याचे लक्षण असते. त्यासाठी उपयोगी येणारे गुण आहेत, संयम, त्यागबुद्धी, उदासिनता हे तीन घोडे त्या रथाचे असावे लागतात. ज्याच्या रथाचे हे घोडे आहेत त्याचा मोक्ष मार्ग सुकर झाला असें मानले जाते. असा माणूस सात्त्विक समजला जातो कारण त्याला कशाचीच गरज नसते. माणसाचे प्रेम स्वतावर असते. परंतु, त्याची अभिव्यक्ती मात्र दुसर्या माणसाच्या, वस्तुच्या, कांहीं गोष्टीच्या माध्यमातून होत असल्याने माणसाचे त्यांवर प्रेम आहे असा गैरसमज रुढ होतो. वस्तुतः ते खरे नसते. अशारितीने जो स्वताच्या गरजा कमी करत रहातो तो सगळे भोग घेऊनही ते भोग घेतले नाहीत असाच होतो. त्याची प्रज्ञा स्थीर झाली असे समजले जाते. शेवटी तो मोक्षपदी जातो.

स्त्री पर्व भाग सातवा संपला.

# स्त्री पर्व

## भाग आठवा

वैशंपायन पुढे सांगतात, एवढे सगळे ऐकूनसुद्धा धृतराष्ट्र त्याच्या मुलांच्या आठवणीने पुन्हा बेहोष होऊन पडतो. त्याना सावध करण्यासाठी तेथे असलेले सगळे त्यांना उठवण्यासाठी पाण्याचा शिडकावा त्याच्या चेहर्यावर मारत असतात. त्यामध्ये विदूर, व्यास, संजय असे लोक होते त्याशिवाय राजाचे इतर सहाय्यक होते. त्याचा हात हातात घेऊन तो कोणी जोराजोराने चोळत होता ज्यामुळे ते लवकर उठतील. असें बराच काळ होत होते, त्यानंतर तो राजा शुद्धीवर आला. तो बोलतो, "ह्या मानव समाजाच्या व्यवस्थेचा मी धिक्कार करतो. त्या शरीराचा धिक्कार असो. आपण मानव जन्म घेतला म्हणून ह्या अशा गोष्टींच्या आहारी आपण जात असतो. संपत्ती, सत्ता व संतति ह्यांच्या नाशाचे दुःख फारच भयानक असते. अशा दुःखामुळें सगळे अवयव बधीर होतात, विवेक संपतो, आपला स्वतावरील विश्वास संपतो. म्हणून असे जीवन जगण्यापेक्षा मरण यावे असें मी देवाला सांगतो परंतु, तो माझे ऐकत नाही, मी काय करू"? असे बोलून तो पुन्हा बेशुद्ध होतो. त्याचे ते उद्‌गार ऐकल्यावर व्यासमुनी बोलतात, "अरे महाबली धृतराष्ट्रा, माझे ऐक, तू मोठा शिकलेला आहेस, तू चांगला बुद्धीमान आहेस, तुला ते सगळे माहीत आहे जे एका राजाला माहीत असले पाहिजे. तू जाणतोस कीं ह्या जगात कांहींही कायम नसते. जे आले ते गेलेच पाहिजेत. म्हणून त्याच्या जाण्याचा शोक करणे तुला शोभत नाही. हे विश्व स्वतः अनित्य आहे त्यातील सगळे अर्थातच अनित्य असते म्हणून त्यांच्या शिवाय रहाण्याची तयारी असणे ह्यातच खरे शहाणपण असते. कुरु घराण्याचा नाश होणे हे विधिलिखीत होते ते झाले त्यात तुझ्या मुलांबरोबर पांडवांचेसुद्धा गेले आहेत हे लक्षात घे. कारण ते सगळे जाणारच होते. कोणी ती विधी बदलू शकणारा नाही. विशेष म्हणजे जे आता गेले ते पुन्हा जन्म घेऊन येणार आहेत नवीन देह धारण करून. कोणी मारले ते महत्वाचे नसते कारण ज्याने मारले असे वाटते तो केवळ कारणमात्र होता. खरा मारणारा असतो काळ. हे सत्य जो समजतो त्याचा मोक्षमार्ग सुलभ होतो व जो ते समजत नाही तो ह्या मायामय जगात

अडकून रहातो. विदूर ते सगळे जाणतात परंतु, दुर्बुद्धीमुळें त्यांचे न ऐकण्याची कृती तू केलीस व आता शोक करून काय उपयोग"? आपणच गतजन्मात आपले भाग्य लिहीत असतो ह्या जन्माचे, ते आपणच ह्या जन्मात बदलण्याचा प्रयत्न करत असतो. त्याकरतां शस्त्रात अनेक कर्मकांडं दिली आहेत. त्यानुसार आपण यज्ञ वगैरे पुजाविधी करत असतो. व्रतवैकल्ये करत असतो, उपास तापास करत असतो, तरी आपणच लिहीलेले आपलेच भाग्य बदलेल ह्याची शाश्वती नसते. त्या ठरलेल्या भाग्याला दैवगती म्हणून समजले जाते पण ती आपणच लिहिलेली असते. तरी देवाला त्यासाठी आपण दोष देत असतो. ज्याचा त्याशी वस्तुतः कांहीं संबंध नसतो. मनुष्य नेहमी दुसर्यालाच दोष देण्यात त्याचा वेळ व्यर्थ घालवत असतो. जर तुम्ही तुमच्या चुका वेळीच सुधारल्या तर असं झालं नसतं पण ते झाले आहे. आता शोक करण्यात काय उपयोग नाही म्हणून स्वताला सावरा.

नारद सांगतात, ते एकदा इंद्राच्या सभेत गेले होते. तेथे पृथ्वी देहधारण करून उभी होती. ती इंद्राला सांगते कीं, तिच्यावर पापाचा बोजा फार झाला आहे तरी तो कमी करण्यासाठी कांहींतरी करावे. ते ऐकल्यावर विष्णू स्मित हास्य करत बोलतात, "तुझी इच्छा पूर्ण होईल. त्यासाठी असुर तुझ्या पोटी कुरु घराण्यात जन्म घेतील त्यांचा प्रमुख असेल दुर्योधन. त्या बरोबर इतर असुर त्याचे बंधू म्हणून कौरवांच्या घराण्यात येतील. त्यांच्या विरोधात लोकपाल देवतां, यम, वायू, इंद्र, आश्विनीकुमार, असे येतील पंडुपुत्र म्हणून त्यांच्यातील वादातून जो संहार होईल त्यामुळें पृथ्वीवरील पाप नष्ट होईल. त्यात दुर्योधन व इतर असुर मारले जातील". असे बोलून तो पृथ्वीला सांगतो की, आता निश्चिंतपणे तू जा. पृथ्वीला त्या दिलेल्या वचना नुसार ते सगळे घडले आहे. असें नारद सांगतात. ते कुरु घराण्याशी झाले कारण ते सर्वात बलशाली घराणे आहे पृथ्वीवर.

जे ठरले होते ते झाले आहे त्यावर सूज्ञ लोक शोक करत नाहीत. म्हणून तूसुद्धा शोक करत बसू नकोस. नारद पुढे सांगतात, जेव्हां युधिष्ठीराने राजसूययज्ञ केला तेव्हां त्या यज्ञाच्या परिणाम स्वरुप असे युद्ध होणार व पांडवांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागणार आहेत असें सांगितले होते. तरी त्यांने तो यज्ञ केला व ह्या नियतिचा पाया

घातला. त्यात प्रमाणे पांडव यशस्वी होणार त्या युद्धात तेसुद्धा नारदाने भाकित केले होते. नारदांच्या त्या सांगण्यामुळें पांडव फार चिंतीत झाले होते. ते लक्षात घेऊन तू अरे धृतराष्ट्रा, पांडवांना आपले समजून तू त्याच्या आधिपत्याखाली ह्यापुढे राज्य करावे असे नारद त्याला सुचवतात.

पांडवांच्या आधिपत्याखाली तुझी ख्याति सगळ्या तिनही जगात होईल एक उत्तम सम्राट म्हणून. तुला कशाचीच चिंता नसेल कारण पांडव फार चांगले आहेत व तुझ्यात ते त्यांचा पिता पहात आहेत. त्यांच्या प्रेमळ वर्तणूकीमुळे सगळे कौरव (त्याची नातवंड, सुना इत्यादि) सुखात रहाणार आहेत.

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र बोलतो आपल्या सांगण्यामुळे माझे दुःख कमी झाले आहे तरी त्यां पांडवांच्या पुढे मी कसा बसेन ज्याना मी अनेक पिडा दिल्या आहेत. त्यांचा चांगुलपणा मला शिक्षेसारखा सदैव सतावत रहाणार आहे. तरी मी ह्यापुढे मरण्याचे विचार करणार नाही. पुढील जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहीन. पांडवांच्या राज्यात माझ्या नातवंडाना, सुनांना चांगली वागणूक मिळेल ह्याची मला खात्री वाटते ते मला विशेष संतोष देणारे आहे. ते ऐकल्यावर नारद, व्यास तेथून निघून जातात.

स्त्रीपर्व भाग आठवा संपला.

# स्त्री पर्व

## भाग नववा

जनमेजय विचारतो, "व्यासमुनी गेल्यानंतर अहो ब्राह्मणा, मला सांगा राजा धृतराष्ट्र काय करतात"? त्याशिवाय युधिष्ठीर काय करतात ते सुद्धा सांगा. कृप, कृतवर्मन काय करत असतात ते सांगा. अश्वत्थामाचे काय झाले ते समजले आहे मला. ते सगळे मला सांगा.

वैशंपायन सांगतात, दुर्योधनाचा वध झाल्यावर व सगळे युद्ध संपल्यावर संजयाला असलेली दिव्य दृष्टी रहात नाही. त्यानंतर संजय धृतराष्ट्राला सांगतो, "युद्धासाठी विविध प्रदेशातून आलेले राजे व त्यांच्या फौजा निघून जातात. कित्येकांचा नाश झाला होता. पांडव सतत शांतता सांगत असूनही तुमची मुलं त्यांच्या नाशाच्या योजना आखत होते व त्यामुळे हे युद्ध झाले हे सगळे जाणातात. त्यात पांडवांचा जय झाला व आपले हरले व त्याहून जास्त म्हणजे सगळे मारलेले आहेत. दुसर्याचे वाईट करणार्याचेच वाईट होते त्या न्यायांने ते सारे घडले होते. संजय विचारतो राजाला की, त्याच्या सगळ्या मुलांची अंत्यविधी ते करणार कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, संजयाचे शब्द ऐकून धृतराष्ट्र पुन्हा बेशुद्ध होतो. त्याच्या सगळ्या हालचाली बंद होतात जसे कांहीं ते मेला आहे. तेथे विदूर होते ते बोलतात, "अहो राजे आता असे पडून चालणार नाही, त्यांचे विधी करावेच लागतील आपल्याला. आता दुःख करण्यात अर्थ नाही. तो विधी माणसाच्या त्या जन्माचा शेवटचा असतो. तो करावाच लागतो नाहीतर त्या तुमच्या मुलांचे पुनर्जन्म कसे होतील. ते त्या अदृष्य जगात अडकून पडतील कायमचे. सुरूवातीला तो असाच त्या जगात असतो तेथून कांहीं वासनांच्या प्रेरणेने तो पृथ्वीवर येतो. जगतो, चांगले वाईट करतो व त्याच्या देहाची मर्यादा संपली कीं, तो पुन्हा त्या अदृष्य जगात जातो हा क्रम आहे सृष्टीचा. केवळ शोक करून कांहीं साध्य होणार नाही. आता हे शोक करण्याचे कृपया बंद करा. पुष्कळ झाला शोक करण्याचा तमाशा. काळ यंत्राप्रमाणे काम करत असतो त्याला भावना नसतात. ज्याच्या मुळे मनुष्य शोक अथवा हर्ष व्यक्त करत असतो.

त्याच्या तावडीतून कोणीही सुटत नाही. त्याच्या कार्यक्रमानुसार सगळे जीव वागत असतात. काळ केव्हां कोणाला धरेल ते सांगता येत नाही. जे मेले ते सगळे सुशिक्षित होते. जाणकार होते. त्यांना त्यांच्या कर्तव्याची कल्पना होती, ते जे करत होते ते जाणून बूजून करत होते त्याप्रमाणे त्यांना मृत्यू आला होता असे तुम्हाला माहित असतांना, त्यांच्या मरण्याचा शोक करणे कोणत्या शहाणपणात येते? त्याच्या मृत्यूत कोणत्याही प्रकारचा अन्याय नव्हता मग शोक कशासाठी? ते स्वता सुद्धा इतरांना मारण्याचे प्रयत्न करत होते. त्यात ते मेले आहेत हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. क्षत्रियाचा मृत्यू त्यांना प्राप्त झाला जे त्यांच्यासाठी भूषणावह आहे तरी तुम्ही कसला शोक करत अहात"? शोक करण्याचे व्यसन लावून घेऊ नका ते प्रकृतीसाठी हानिकारक असते.

स्त्री पर्व भाग नववा संपला.

# स्त्री पर्व

## भाग दहावा

वैशंपायन पुढे सांगतात, ते विदूराचे निर्वाणीचे बोलणे ऐकून धृतराष्ट्र सावध होतो व त्याचा रथ तयार करण्यासाठी संजयाला सांगतो. पुढे ते आज्ञा करतात कीं, गांधारीला तेथे घेऊन यावे. त्याशिवाय इतर सगळ्या कुरु स्त्रीयांनासुद्धा आणा त्यात कुंती वहिनीसुद्धा आणा. ती आज्ञा झाल्यानंतर त्या सगळ्या महिला तेथे येतात. त्या सगळ्या शोक करत होत्या त्यांचे पति मेलेले होते. त्या सगळ्या एकत्र झाल्यानंर त्यांचे शोक करणे आणखीन मोठ्याने होऊ लागते. त्यांचा आकांत ऐकवत नव्हता. धृतराष्ट्र त्याच्या रथात चढतो. गांधारी त्यांच्याबरोबर चढते. त्यांच्या बरोबर कुंतीसुद्धा चढते . त्या पाठोपाठ इतर राण्या चढतात त्यांच्या रथांमध्ये. विदूर त्यांना त्यांच्या परीने शांत करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या आकांताने सगळी नगरी भडकून गेली होती. सगळी हस्तिनापुरी शोक सागरात बुडली होती कारण त्या नगरातील प्रत्येक घरचा कोणी तरी त्या युद्धात कामी आला होता. असंख्य बांगड्या फुटल्या होत्या. ज्या शाही स्त्रियां ज्याना आधी कोणी पाहिले नव्हते त्या आता सगळ्यांच्या पुढे उभ्या होत्या. त्यांचे केस विस्कटलेले होते, कपडे व्यवस्थीत नव्हते, त्यांच्या अंगावर दागिने नव्हते. गळे त्यांचे उघडे झाले होते जे एरवी अलंकाराने भरलेले असतं. अशा शोककुल त्या शाही स्त्रिया त्या रथातून रणांगणी निघाल्या होत्या. त्याचे पति जेथे मरून पडलेले होते. त्या कौरव घराच्या सुना त्यांच्या दुःखात मग्न झाल्या होत्या त्याना त्यांच्या कपड्याचेसुद्धा भान नव्हते. नगरातील वैश्य. सुत (कसबी लोक), शुद्र, स्त्रिया, मुलं, बापडे असे सगळे ते पहाण्यासाठी त्यांच्या घरातून बाहेर येऊन त्या रथाच्या तांड्याला पहात होते. त्यांचे दुःख पाहून ते नगरवासी सुद्धा रडू लागतात.

स्त्री पर्व भाग दहावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग अकरावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांच्यी नगरातून तीन मैल बाहेर आल्यावर त्यांना ते तिघे कुरु योद्धे दिसतात, कृप, कृतवर्मन आणि अश्वत्थामा. त्यांच्या अंध राजाला पाहिल्यावर ते दुःखाचा उसासा टाकतात व त्याच्या कडे पहात उद्गारतात, "अहो राजन, तुमचे मुलगे एक मोठे कार्य करून अखेरीस स्वर्गात गेले आहेत. फक्त आम्ही तिघे मागे राहिलो आहोत. सगळे मारले गेले आहेत. ते राजाला सांगितल्यानंतर कृप गांधारीला बोलतो, तुमचे पुत्र शूराचा मृत्यू प्राप्त करून गेले आहेत त्याचा आपल्याला सार्थ अभिमान वाटला पाहिजे. ते त्या स्वर्गात दैव बनून रहाणार आहेत ह्याचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. ते सगळे शस्त्राच्या घावाने मारले गेले आहेत. त्यांचा मृत्यू कौतुकास्पद आहे. क्षत्रियाने जसे मरावे तसे ते मेले आहेत. पांडवांचे सुद्धा सगळे मेले आहेत. भिमाने दुर्योधनाला अन्यायाने मारले ते समजल्यावर अश्वत्थामा व आम्ही त्यांच्या तंबूत रात्री गेलो व त्याना ते झोपेत असतांना मारून टाकले आहेत. अन्यायाचा बदला अन्यायानी केला आम्ही तिघानी मिळून. तरी त्यांचे कुंतीपुत्र आम्ही मारू शकले नाही कारण त्यांचे संरक्षण कृष्ण करत होता. त्यात पांडवांबरोबर पांचाल, श्रींजय, सोमक, मत्स्य असे त्यांचे सगळे जोडीदार आम्ही मारले आहेत. ते युद्धात मेले नाहीत म्हणून ते स्वर्गात जाणार नाहीत ह्याची आम्ही दक्षता त्यांना मारतांना घेतली आहे. आपल्या पराजयाचा आम्ही सूड उगवला आहे. आता पांडवांना ते समजले आहे म्हणून भिम, अर्जुन व कृष्ण मोठी फौज घेऊन आमच्या मागे लागले आहेत. त्यांच्याशी आम्ही लढू शकणार नाही म्हणून पळून जात आहोत. असे ते त्यांच्या राजाला सांगतात. पांडवांचे सुद्धा मेले आहेत ते ऐकून तुम्हाला हर्ष झाला असेल ह्याची आम्हाला खात्री वाटते. ते गांधारीला व इतर कौरव स्त्रियांना सागतात. असे बोलून ते त्यांच्या राजाचे शेवटचे दर्शन घेत गंगेच्या किनार्याने निघून जातात. त्यानंतर ते एकमेकांचा निरोप घेत वेगळे वेगळे असे तिन दिशांनी निघून जातात.

कृप सरळ हस्तिनापुरी जातात. कृतवर्मन त्याच्या भोजदेशाला जातो. अश्वत्थामा व्यासांच्या आश्रमाकडे निघतो. ते सूर्य उगवण्या आधी त्यांच्या ठरलेल्या जागी जात असतात. द्रोणाच्या मुलाला पांडव कसे शिक्षा करतात व तडीपार करतात त्याचा मणी काढल्यानंतर ते आपण आधी पाहिले आहेच. म्हणून त्याबद्दल पुन्हा लिहीत नाही.

स्त्री पर्व भाग अकरावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग बारावा

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराला समजते कीं, त्याचे काका रणभूमीकडे रवाना झाले आहेत. तो त्याचे बंधू घेऊन त्यांना रणभूमीत भेटण्यासाठी निघतो. त्यांच्या बरोबर कृष्णसुद्धा निघतो. त्यांच्या बरोबर युयुधन व युयुत्सू असतात. द्रौपदीसुद्धा तिच्या सुनांसह तेथे निघतात. सगळे अति दुःखात असतात. युधिष्ठीर त्यांना गंगेच्या किनारी पहातो तेथे कौरवांच्या बायका मोठ्या मोठ्याने रडत त्यांना जे मनात येईल ते बोलत होत्या. त्या युधिष्ठीराच्या चांगुलपणाचे धिंडवडे काढत होत्या. त्याच्यामुळे भिष्म, द्रोण, कर्ण, सल्य असे सगळे मेले त्याबद्दल त्या पांडवांना दोष देत होत्या. त्यांच्या दोषारोपांकडे दुर्लक्ष करत तो ते धृतराष्ट्राच्या कडे जातो. त्याना नमस्कार करतो. ते त्यांना (धृतराष्ट्राला) भेटण्यास आल्याचे सांगतात. ते पांडव ते आल्याचे त्याला सांगतात. धृतराष्ट्र नाखुषीतच युधिष्ठीराला औपचारीक मिठी मारतो नंतर झिडकारतो अलगदपणे. धृतराष्ट्राचा राग भिमावर असतो तो बाहेर येतो. तो भिमाला मिठी मारण्याची इच्छा व्यक्त करतो तेव्हां कृष्ण त्या अंध राजाची मनीषा चांगलीच ओळखतो व भिमाच्या ऐवजी एक लोखंडी पुतळा त्याच्या समोर नेतात. त्या कपडे घातलेल्या लोखंडी पुतण्याला तो धृतराष्ट्र कडकडून मिठी मारतो. त्याच्या आवळण्याने तो लोखंडी पुतळा मोडतो. ते पाहून सगळे आश्चर्य करत रहातात. असा प्रसंग येणार त्याची त्या भगवंताला आधीच माहिती होती. ते करतांना त्याची शक्ती ऐवढी खर्च होते कीं, तो रक्त ओकू लागतो. त्यानंतर सगळी शक्ती खर्च झाल्याने तो खाली पडतो बेशुद्ध होऊन. त्याचा सारथी संजय त्याला उचलतो व बोलतो, "असे करू नका. तुम्ही भिमाला नाही आवळले तो एक लोखंडी पुतळा होता".

थोड्या वेळानी तो अंध राजा ध्यानावर येतो. त्याना त्यांची चूक समजते व ते जोराजोराने रडू लागतात. कृष्ण त्या अंध राजाला शांत होण्यास सांगतात. कृष्ण त्यांना बोलतो, "राजे शांत व्हा. तुम्ही भिमाला मिठी मारली नव्हती तो एक पुतळा होता. तुमच्या क्रोधाचा मला आधीपासून अंदाज आला होता म्हणून मी ते केले भिमाला

वाचवण्यासाठी. तुमच्या मिठीच्या ताकदीचा मला अंदाज होता. मुलांच्या मृत्यूने तुम्ही बावळे झाला होता त्यासाठी मी ही व्यवस्था केली होती. अशारितीने वागून तुम्ही काही साध्य करणार नव्हता. परंतु, तुमच्या ते लक्षात आले नाही. तुमची मुलं स्वताहून युद्धास निघाली होती त्यात एकतर पांडव मरणार अथवा कौरव, हे तुम्ही युद्धाचे नियम जाणता तरी असे वागलात ते तुम्हाला शोभले नाही. हा नरसंहार तुमच्या मुलांनी क्षत्रिय समाजावर लादला होता हे लक्षात घ्या. पांडवांचा त्यात अजिबात अपराध नाही की, तुम्ही त्यांच्यावर गैरवाजवी आरोप करावेत".

स्त्री पर्व भाग बारावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग तेरावा

वैशंपायन पुढे सांगतात, कांही दास्या राजाला धुतात त्याच्या ओकण्याचे साफ करतात. त्यांनंतर कृष्णा त्याला सांगतो, "तुम्ही वेद अभ्यास केला आहे, नितीशास्त्राचा अभ्यास केला आहे, इतिहास वाचला आहे, अशा शहाण्या राजाला शोभेल असे तुमचे ते वागणे नव्हते. तुम्ही असे कसे पांडवांना सतत दोष देता जेव्हा तुम्ही जाणता कीं ते युद्ध तुमच्या स्वतावरील फाजिल विश्वासामुळे पांडवांवर लादले होते. मी, भिष्म, द्रोण, कृप, नारद आणि व्यास असें सगळे सांगत होते तरी त्या युद्धाला तुम्ही प्रोत्साहन दिले आणि त्यात तुम्ही हरलात नव्हे तुमचे शिरकांड झाले. तरी तुम्ही व तुमच्या परिवारातील स्त्रिया पांडवांना कसे घालून पाडून बोलता ते कोणत्या संस्कृतीत बसते"?

"हे सगळे खोटे आरोप करणे बंद करा. कारण आता तुम्हाला पांडवांच्या राज्यात ह्यापुढे रहावयाचे आहे. पांडव कितीही चांगले असले तरी खोटे आरोप ते सहन करणार नाहीत ह्याची जाणीव ठेवा. तुम्हाला माहित होते कीं, पांडव युद्धशास्त्रात तुमच्या पेक्षा सरस आहेत म्हणजे तुम्ही हरणार तरी का ते युद्ध पांडवांवर लादले गेले"?

"तुम्हाला चांगलेच माहित होते कौरवांनी त्यांच्यावर किती व कसे त्याना ठार मारण्यासाठी डाव केले त्यात कोणता चांगुलपणा होता ते त्या कौरवांच्या बायकांनी पहावे त्यानंतर पांडवांना दोष द्यावा. भिमाला विष खायला घातले त्यासाठी तुम्ही तुमच्या मुलाला जाब कां नाही विचारलात? वरनावतात घराला आग लावली त्याबद्दल दुर्योधनाला जाब कां नाही विचारलात? अशा अनेक घटना आहेत ज्याचे तुम्हाला उत्तर द्यावा लागेल ते तुम्ही करू शकणार नाही. मग आत्ताच भिमावर तुम्ही प्राणघातक कारवाई केली त्याचे काय समर्थन आहे तुमच्याकडे"?

"तुमची पाप पहा प्रथम मग पांडवांना दोष देण्याची हिम्मत करा. पांडव पूर्णतया निर्दोष आहेत ते माहीत असतांना तुम्ही असे कसे वागू शकता? नियतीने जी शिक्षा तुम्हाला दिली ती योग्यच आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, ते कृष्णाचे निर्वाणीचे बोल ऐकल्यावर त्यांच्या समर्थनार्थ तो अंध राजा सांगतो की, त्याच्या अंधपुत्रप्रेमापोटी तो तसे करत होता व ते सरासर चुकीचे होते अशी कबुली देतो. ते होत असतांना कौरवांच्या बायकांचे रडणे थाबते कारण त्यांना समजते कीं, त्यांची बाजू खोटी आहे व जे घडले त्यास त्यांचे पती जबाबदार होते. त्यानंतर धृतराष्ट्र त्याचेच चूक होते हे समजतो व भिमाची क्षमा मागतो आणि त्यावेळी तो त्याला आलिंगन देण्याची इच्छा दाखवतो. कृष्णाला समजते कीं, आता कांहीं धोका होणार नाही तेव्हां ते भिमाला मिठी मारण्याची परवानगी देतो. त्यानंतर सगळे पांडव त्याच्या अभागी काकाला आलिगनं देतात.

स्त्री पर्व भाग तेरावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग चौदावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून ते पांडव व कृष्ण गांधारीला भेटण्यास तयार होतात. गांधारी तिच्या सगळ्या मुलांच्या वधास युधिष्ठीराल जबाबदार समजून त्याला शाप देणार असते. तो तिचा हेतू लक्षात घेऊन सत्यवतीचा मुलगा व्यासमुनी एक डाव करतो पांडवांना वाचवण्यासाठी. ते क्षणात त्या ठिकाणी येतात. ते गांधारीला बोलतात, "हि वेळ नाही शाप देण्याची, आता तू त्यांना क्षमा करत असल्याचे दाखव. कारण तुला त्यांची भविष्यात फार गरज आहे हे लक्षात घेऊन सावधगिरीने वागले पाहिजेस. आठव जेव्हां तुझा मुलगा त्या युद्धाच्या अठरा दिवसात दररोज सांगत होता कीं, त्याला विजयी हो असा आशिर्वाद द्यावा परंतु, तू त्याला सांगत होतीस कीं, जेथे चांगुलपणा आहे तेथे माझा आशिर्वाद आहे व ते घडले आहे हे लक्षात घे. पांडवाना तुझ्या आशिर्वादाने विजयी केले आहे हे लक्षात घे. अशा परिस्थितीत त्याना तू कसा शाप देऊ शकतेस"? तू सदैव चांगुलपणाची पुरस्कर्ती असतेस मग जे युद्ध तुझ्या आशिर्वादाने ते जिंकले त्यांना तू शाप दिलास तर तू चांगुलपणा सोडलास असे होईल हे ध्यानात घे. म्हणून पुत्रप्रेमापोटी तू हा अनर्थ करू नकोस". गांधारीला ते व्यासांचे बोल स्पष्टपणे ऐकू येत होते जे इतरांना ऐकू येत नव्हते.

गांधारी तिच्या सासर्याला बोलते, मी पांडवांचा तिरस्कार करत नाही. मी त्यांचा नाश व्हावा असे सुद्धा चिंतीत नाही. तरी माझ्या मुलांच्या मरण्याने मी व्यथीत झाली आहे. मला माहीत आहे कीं, मी पांडवांचे भले केले पाहिजे जितके कुंती करू इच्छिते . धृतराष्ट्रसुद्धा त्याच्या भल्यासाठी असले पाहिजेत. सगळे दोष माझ्याच लोकांचे होते. ते दुर्योधनाला भडकवत होते पांडवांच्या विरुद्ध. मी सगळे जाणते कीं, किती त्रास पांडवांनी व कुतीने आणि द्रौपदीने माझ्या मुलांच्या कारवायांमुळे कित्येक वर्षे सहन केला होता. कुंतीची सगळी मुलं फार चांगली आहेत . त्यांच्या मनात पाप नसते हे मी अनुभवले आहे. मला फक्त एकच गोष्ट भिमाची आवडली नाही ती ही की, तो

गदायुद्धात नियम बाह्य गदा चालवतो.  त्यांने गदा दुर्योधनाच्या मांडीवर मारली ते मला अजिबात आवडले नाही म्हणून माझ्या त्याच्यावर राग अजून आहे".

स्त्री पर्व भाग चौदावा संपला.

## स्त्री पर्व (जलप्रदानिका पर्व संपले)

## भाग पंधरावा

वैशंपायन पुढे सांगतात, गांधारीचे हे ऐकून भिमाला भिती वाटते त्याच्या काकीची. तो तिला शांत करण्यासाठी सांगतो, "ते योग्य होते कीं अयोग्य, मी ते केले कारण मी माझ्या संरक्षणासाठी ते केले व शास्त्राप्रमाणे स्वताच्या संरक्षणासाठी नियम मोडण्याची मुभा आहे हे आपण जाणताच. म्हणून आपण मोठ्या मनाने मला क्षमा करावी". असे बोलून तो तिच्या पायावर डोके ठेवतो. भिम पुढे सांगतो, "त्याशिवाय मी त्या द्युताच्या वेळी आमच्या पत्नीचा तो अपमान करत असतांना त्याच्या माडीवर माझी गदा बसेल असें बोललो होतो त्याप्रमाणे ते झाले म्हणजे माझी तशी प्रतिज्ञा होती, ती मी पुर्ण केली. आमच्या बंधूने त्याच्याशी बोलणे केले होतो कीं, जर तो मला गदायुद्धात हरवेल तर तो युद्धात विजयी घोषीत केला जाईल व ते मला नको होते त्यामुळे मी तसे केले, एकाच वेळी अशा कांहीं कारणामुळें ते घडल होते. तुमच्या मुलांनी मला विष खायला घातले होते, त्याशिवाय इतर अनेक प्रकारे आम्हा भावंडाना त्यांने त्रास दिला होता ते सगळे तुम्ही जाणता परंतु, त्याबद्दल त्याला तुम्ही कधी जाब विचारला नाही असे दुटप्पी आपले वागणे कां असते ते सांगाल कां"? त्याकरतां त्याला तुम्ही कां नाही शाप दिली"? त्याच्या मृत्यूने एक शत्रूत्व संपले आहे त्याचा विचार आपण केला पाहिजे. आता पृथ्वीवर शातता असेल कारण युधिष्ठीराच्या राज्यात अन्याय आम्ही होऊ देणार नाही. गांधारी त्याला बोलते, "तू माझ्या मुलाचे रक्त प्यालास ते कृत्य कोणत्या धर्मयुद्धात बसते"? भिम सांगतो. "मी रक्त प्यायलो नाही. माझ्या ओठाना ते लागले होते म्हणून असा गैरसमज झाला पहाणार्यांचा. पुढे तो विचारतो त्या कौरव मातेला, द्युताच्यावेळी तुमच्या मुलानी तुमच्या सुनेचे केस धरून तिला अर्धवस्त्रात असतांना सभेत खेचून आणले त्याबद्दल आपण त्याला कोणती सजा दिली ते सांगल कां? त्यांच्या कोणत्याही अपकृत्याबद्दल आपण एकदासुद्धा नाराजी कां नाही दाखवत"? ते त्यांचे वागणे क्षत्रिय धर्मात बसत नव्हते तरी तुम्ही त्याला कां नाही आवरले ते सांगा.

गांधारी बोलते, तुम्ही त्या वृद्ध पित्याचे सगळे पुत्र मारले तेव्हां त्याचा एक पुत्र जीवंत राहीला असतां तर तुमचे कोणते नुकसान होणार होते"?
वैशंपायन पुढे सांगतात, गांधारी रागाने विचारते, "तो नवा राजा कोठे आहे"?
त्यावर युधिष्ठीर तिच्यापुढे हात जोडून उभा होते व नम्रपणे बोलतो, "हा मी तुमच्या पुढे आहे मला शाप द्या कारण मी तुमच्या मुलांचा मारकरी आहे".
"मला आता जगण्याची इच्छा उरलेली नाही. मारून टाका मला म्हणजे मी सुद्धा त्यांच्याबरोबर स्वर्गात जाऊन बसेन". ते ऐकून ती माता कांहीं बोलत नाही. दूरदृष्टी असलेली ती गांधार कन्या युधिष्ठीराच्या हाताकडे पहाते तिच्या पट्टी लावून बंद केलेल्या डोळ्याने. ती अंदाज घेत होती कीं, युधिष्ठीर काय करत आहे. तो तिच्यापुढे वाकला आहे ते तिला समजते. इतर पांडवसुद्धा तसेंच तिच्यापुढे नतमस्तक झालेले ती समजते. तिचा राग जातो व आईच्या प्रेमांने ती त्यांच्याशी बोलते. तिची ते रजा घेतात. ते आता त्यांच्या कुतीमातेकडे निघतात. ती त्यांच्या चिंतेने सतत व्यस्त असे. ते येत आहेत हे समजल्यावर तिला अश्रू आवरत नाहीत. मुलांना जवळ घेऊन ती रडत बसते, ते आनंदाश्रू होते. तिच्या कुशीत ते विसावले होते जशी लहान मुलं करतात. ती त्यांच्या पाठीवरून हात फिरवते, त्यांना थोपटते. ते कांहींवेळ चालू होते.
ते पाहून द्रौपदी बोलते, "अहो माई तुमची सगळी नातवंड कोठे गेली आहेत? ते तुमच्या कडे कां येत नाहीत? माझी सगळी मुलं, माझे बंधू कोठे गेले"? कुंती तिलासुद्धा जवळ घेते व तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करते. त्यानंतर ते सगळे शोकमग्न असलेल्या गांधारीला जाऊन पुन्हा भेटतात. द्रौपदीला आलेले समजल्यावर ती तिला उद्देशून बोलते मुली शोक करू नकोस कारण जे घडले ते काळाच्या योजनेचा भाग होते असें समजून रहावयाचे आहे. ते होणारेच होते कोणीही ते थांबवू शकले नसते. जेव्हां कृष्णाच्या शिष्टाईला माझ्या मुलांनी नाकारले तेव्हां विदूरानी आधीच सांगितले होते तसे झाले आहे. ते विधीलिखीत होते. अशासाठी तू व मी दोघी दुःख करण्यात कांहीं अर्थ नाही. आपण दोघी एकाच प्रकारच्या त्रासात आहोत. मी माझ्या मुलाला अडवले नाही जे करील ते करू दिले त्याचा हा परिणाम आपण सगळे भोगत आहोत. आपला वंश संपवला आपल्याच कर्माने. स्त्री पर्वातील जलप्रदानिका पर्व भाग पंधरावा संपला.

# स्त्री पर्व

## (स्त्री विलाप पर्व)

## भाग सोळावा

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने बोलणे होत असतांना गांधारी त्या रणभूमीच्या एका सुरक्षित जागी डेरा टाकून बसली होती. तिला व्यासमुनीने दिलेल्या दिव्य दृष्टीने सगळे पहाता येत होते जरी तिचे चर्मचक्षू पट्टीने बांधलेले होते. तिच्या भोवतीच्या तिच्या सुनांचे आकांत ऐकवत नव्हते. तेथे सर्वकडे मृत योद्ध्याची कलेवरं पडलेली होती. त्यांत मुंडकी नसलेली धडं व शरीर नसलेली मुंडकी पडलेली होती. कौरवांच्या बायका त्या मुडद्यात त्यांचा पति, मुलगा शोधत होत्या. ते दृष्य मन हलवणारे होते. त्या बायका त्याच्या मृदू हातांनी त्याच्या छातीवर व डोक्यावर जोराजोराने मारून त्यांचा शोक व्यक्त करत होत्या. गांधारी त्यात शांतपणे बसलेली होती. तिला तिच्या सुना व अजून जीवंत असलेल्या नातवंडाचा विचार होता. पांडवांच्या राज्यात त्यांना आता उर्वरित आयुष्य काढावयाचे होते त्या दृष्टीने ती सगळे ठरवत होती. कौरव स्त्रिया तेथे फिरत होत्या त्यांच्या बाजूने कोल्हे, लांडगे सुद्धा मांस खाण्यासाठी फिरत होते. गिधाडं कावळे सुद्धा तेथे वावरत होती. राजा धृतराष्ट्र त्याच्या बरोबर पांडवाना व कृष्णाला घेऊन तेथे आले होते. तो संहार पाहून आमची चूक किती मोठी होती त्याचा अंदाज त्या अंध राजाला आला होता. पशूनी अर्धवट खाल्लेली शरीरे तेथे पडलेली होती. ते दृष्य ते गुपचूप पहात होते. तेथे गांधारी कृष्णाला बोलते, "अरे जनार्दना त्या पहा माझ्या सुना त्यांचे पति गेल्यामुळे कशा हवालदिल झाल्या आहेत. त्यांचे रडणे मला ऐकवत नाही. त्या रणांगणात त्या त्यांच्या पतिला शोधत आहेत. कोणाला त्याचे डोके मिळते परंतु, शरीर मिळत नाही. कित्येक डोकी व शरीरं प्राण्यांनी अर्धवट खाल्लेली आहेत. असें सगळे पाहून त्याच्या शोकात भर पडत आहे. कित्येक माझ्या सुना त्याचे मुलगे शोधत आहेत जे युद्धात विरगति प्राप्त करून गेले आहेत. त्या शोक करणार्या महिलांत माझ्या नातसुना आहेत. त्यांची सुद्धा तशीच अवस्था झाली आहे. आणि हे सगळे माझ्या मुलाच्या

हट्टामुळे झाले हे मी जाणून आहे. हे सहजपणे टाळता आले असते परंतु, दैवगति वेगळी होती व हे घडले".

तेथे विविध योद्ध्याची शरीर शोधण्याच्या कामात सेवक मदत करत होते. डोकी सापडत परंतु, त्यांचे योग्य शरीर मिळत नव्हती. त्याचे वेगळे दुःख त्या महिलांत दिसत होते. कांहीं ते शोधण्याचे सोडून शांतपणे त्या रणभूमीत ठाण मांडून बसल्या होत्या. कित्येक शरीरं ओळखता येत नव्हती. माणसांच्या शरीराबरोबर त्यांचे तुडलेले हात, पाय तेथे पडलेले होते. कोणाचा हात व कोणाचा पाय ते सांगणे केवळ अशक्य होते. त्यांचे अंगावरील दागिने तेथे पडलेले होते.

दुःखावेगाने गांधारी कृष्णाला बोलते, "ह्या युद्धाने माणूसकीचा खून केला आहे. सगळी उच्च तत्त्वे धुळीला मिळाली आहेत. ते पहा आमचे प्रिय जन आता त्या श्वापदांचे खाद्य बनले आहेत. पहा काय ही दैवगती. मऊ गादीवर निजणारे आता मातीत पडले आहेत. शत्रूचा नाश करणारे स्वतः नष्ट झाले आहेत. काय ही दैवगती आहे पहा. राजे रजवाडे ज्यांच्याकडे कोणाची मान वर करून पहाण्याची हिम्मत नव्हती ते आता लांडग्यांच्या तोंडात आले आहेत. कित्येकांचे लचके तोडले जात आहेत. काय ही दैवगती. त्यांचे लाखमोलाचे दागिने आता मातीत पडले आहेत जे त्यांना त्यांच्या प्रिय पत्नीने प्रेमांने दिले होते. आता त्यांच्याकडे कोणी पहातसुद्धा नाही".

आता त्या कौरव सुना रडण्याचे थांबून फक्त ते युद्धाचे दृष्य हताशपणे पहात होत्या. आपल्या कपाळावर हात मारत त्या बसल्या होत्या त्या मुडद्यांच्या मध्ये. कोणतेही शरीर पूर्ण नव्हते. त्यामुळें त्यांना त्यांचे प्रियजन शोधता येत नव्हते हांच मोठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. म्हणून त्या निराशपणे त्या अचेतन देहांकडे पहात होत्या. फक्त डोकी ओळखता येत होती म्हणून कांहीं त्यांच्या माता मुलाचे डोके मांडीवर घेऊन तेथे शोक करत बसल्या होत्या. गांधारी कृष्णाला बोलते, "त्या पहा माझ्या सुना त्यांचे सौंदर्य झाकोळले आहे पति निधनामुळे. मला वाटते मी मोठे पाप केले असलं पाहिजे म्हणून मला हा दिवस पहावा लागत आहे.

ते बोलत असतांना तिला दुर्योधनाचे कलेवर दिसते.

स्त्री पर्व भाग सोळावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग सतरावा

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाचे कलेवर पाहून तिचा धीर सुटला. ती बेहोष झाली आणि खाली पडली. लवकरच ती सावध झाली आणि रडू लागली. तिला तिचा दुःखावेग आवरेना. ते मातीत पडलेले दुर्योधनाचे रक्ताने माखलेले शरीर पाहून ती आकांत करू लागली. गांधारी त्याच्या मृत शरीराला मिठी मारते. तिच्या रडण्याने कृष्णसुद्धा हेलावला गेला. तिच्या अश्रूनी तिची छाती भिजली गेली. त्याचा धिप्पाड बांधा हाताने चाचपडत ती कृष्णाला सांगते, "अरे जनार्दना, त्या युद्धाच्या आदल्या रात्री मला बोलला कीं, मला जय मिळण्याचा आशिर्वाद दे. ते ऐकल्यावर मला समजले कीं एक मोठे संकट येणार आहे. मी त्याला सांगितले की, जेथे चांगुलपणा आहे तेथे यश जाणार आहे. असे मी बोलले कारण मला तो चांगुलपणात असावा असे फार वाटत होते. ते ऐकून तो थोडा खजिल झालेला मला दिसला. त्याला मी म्हणाले, तुझे मन युद्ध करण्या करता आहे त्यात शस्त्रांने जे मिळणार ते तुला मिळवता येईल. परंतु, अंतिम यश पुण्याकडेच असेल. तसे झाले तर मी त्याबद्दल समाधानी असेन. मला तरी माझ्या वृद्ध पतिची चिंता आहे. त्यांचे मन त्यांच्या मुलांत अडकलेले असते. माझा हा मुलगा रागीट, हट्टी, हेकट स्वभावाचा होता त्यामुळे हे सगळे घडले. परंतु, दैवाने वेगळेच रचले होते. एकेकाळी गादीवर झोपणारा माझा मुलगा आता मातीत पडला आहे. राजसत्ता गेली पण ते आता स्वर्गात इंद्राच्या सभेत बसणार आहे. ज्याच्या भोवती राजे व सुंदर ललना असावयाच्या त्याच्या भोवती आता कोल्हे, गिधाडं फिरत आहेत काय दैवगति आहे पहा एकेकाची. एकेकाळी सुंदर दास्या त्याला पंख्याने वारा घालत तेथे आता गिधाडांच्या व कावळ्यांच्या पंखाने त्याला वारा घातला जात आहे. जो सिंहाना आव्हान देत असे त्याच्या अंगाचे लचके कुत्री तोडत आहेत, काय दैवगति आहे पहा. ज्याने अकरा अक्षौहिणी सैन्य जमवले तो आता त्या सैनिकांबरोबर मरून पडला आहे. काय दैवगति आहे पहा. हा काळाचा महिमा आहे दुसरे काय. त्यांने त्याच्या वडीलधार्या सल्लागारांचा सल्ला मानला नाही त्याची किंमत त्याने मोठी महाग अशी मोजली

आहे, ही दैवगति दुसरे काय म्हणावयाचे त्याला. मला हे पहावे लागत आहे ह्याच्यापेक्षा वाईट आणखीन काय असणार? मला माझे मुलगे, नातू असे मेलेले पहावे लागत आहे ह्यापेक्षा वाईट आणखीन काय असू शकते माधवा"?

गांधारी दुर्योधनाचे माथ्याचे चूंबन घेते. जो माथा त्याच्या रक्ताने भरलेला होता. हे घडण्यात माझ्या मुलाचाच दोष आहे म्हणून मी दुसर्या कोणाला कोठल्या तोंडाने दोष देऊ. ती बोलते, "जर श्रूती खर्या असतील तर जे शस्त्रांने मारले जातात ते स्वर्गात जातात, तर माझी मुलं सगळी इंद्राच्या सभेत जाऊन बसणार आहेत. हे त्यातल्या त्यात समाधानाचे आहे माझ्यासाठी".

स्त्री पर्व भाग सतरावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग अठरावा

गांधारी पुढे बोलते, "माधवा, माझे सगळे शंभर मुलगे त्या भिमाने त्याच्या गदेने एका हाती मारले आहेत. त्याचे मला जास्त दुःख होत आहे. त्यांच्या नाजूक बायका त्यांचे केस विस्कळीत झालेले देहाचे भान हरपलेल्या अवस्थेत त्या रणांगणात त्यांचे पति शोधत फिरत आहेत हे मला पहावत नाही. ज्या स्त्रिया त्यांच्या चांगली फरशी असलेल्या आगाशीतच फिरत होत्या त्या आता त्या रक्ताच्या चिखलातून वाट काढत त्यांचे पति शोधत आहेत हे मला पहावत नाही. त्यांचे वस्त्रं कसे आहे त्याचे त्यांना भान राहिलेले नाही. हे मला पहावत नाही. त्यांचे दागिन्यानी भरलेले देह आज दागिन्या शिवाय उघडे पडलेले मला पहावत नाही. त्यांच्या भोवती हिंस्र श्वापदं वावरत आहेत त्याचे सुद्धा त्यांना भान नाही. हे मला पहावत नाही. त्यातील कित्येत तो संहार पाहून बेहोष झाल्या आहेत हे मला पहावत नाही. ती दुर्योधनाची पत्नी, लक्ष्मणाची माता, तिला पाहून माझे काळींज पिळवटते आहे. ती सती जाण्याच्या गोष्टी करत आहे. तिचा पति व एकुलता एक मुलगा ह्या लढाईत पांडवांनी मारले ते मला पहावत नाही. त्या देखण्या माझ्या सुना त्यांच्या मृत नवर्याशी, मुलांशी वेड्यासारख्या बोलत आहेत त्यांचे निर्जीव हात हातात घेऊन हे मला पहावत नाही. कांहीं त्यांचे पुरूष मेलेले पाहून स्वतः शुद्ध हरवत आहेत हे मला पहावत नाही. कांहीं मोडक्या रथाच्या आधाराने उभ्या आहेत ते रणांगण पहात हे मला पहावत नाही. त्यांचे आकांत माझ्या कानांत घुमत आहेत. कोणी एक सुन तिच्या पतिचे तुटलेले डोके हातात घेऊन वेड्या सारखी कोठेतरी जात आहे ते मला पहावत नाही. फार मोठे पाप माझ्याकडून झाले आहे म्हणून हे मला पहावे लागत आहे. आमचे सगळे नातेवाईक युधिष्ठीराच्या सैन्याने ठार मारले आहेत. जे योग्य अथवा अयोग्य आमच्या कडून झाले त्यासाठी एवढी मोठी सजा झाली हे मला पहावत नाही. माझ्या सुंदर सुनांचे आकांत मला ऐकवत नाहीत. माझ्या सुना ज्यांच्यावर सूर्याचे किरण सुद्धा पडत नव्हते त्या आता सामान्य माणसे पहात आहेत हे मला पहावत नाही. तो पहा दुःशासनाचा देह, रक्ताने भरला आहे. त्यांने द्रौपदीचा भर सभेत

उपमर्द केला त्याला भिमाने अशी सजा केली आहे. ते मला पहावत नाही. मी दुर्योधनाला सांगत असें कीं, माझ्या नीच प्रवृत्तीच्या भावाचा शकूनीचा नाद सोड पण तो माझे ऐकत नव्हता. त्याचे परिणाम पहा दिसत आहेत. "असंगाशी संग म्हणजे प्राणाशी गांठ", असें जे सांगतात ते येथे प्रत्यक्षात आलेले दिसत आहे. माझा भाऊ नीच स्वभावाचा होता. तो लोकांत भांडणं लावण्याचा छंद बाळगून होता. त्याच्या संगतीत राहू नको असे मी माझ्या मुलांना सांगत असे पण ते माझे ऐकत नव्हते. त्याचा हा परिणाम दिसत आहे. पांडवांतील सर्वात जास्त रागीट भिम तो माझ्या मुलाचे रक्त प्याला त्याचे मला वैषंम्य वाटते".

स्त्री पर्व भाग अठरावा संपला.

# स्त्री पर्व
## भाग एकोणीसावा
गांधारी पुढे बोलत होती, माझा शहाणा मुलगा विकर्ण सगळ्यात जास्त हुशार तो पहा तेथे मरून पडला आहे. त्याच्या बाजूला मेलेला हत्ती आहे. भिमाने त्याच्या चिधड्या केल्या ते दिसत आहे. त्याच्या हत्तीबरोबर त्याला मारले भिमाने. ते मला पहावत नाही. त्याचे शरीर गिधाडं खात आहेत हे मला पहावत नाही. त्याची पत्नी त्या गिधाडाना हकलवत आहे पण ते जात नाहीत. हे मला पहावत नाही. तो सुखात वाढलेला आता मातीत गिधाडांचे भक्ष्य बनला आहे. विकर्ण चिंधड्या झालेला असला तरी त्याते देखणेपण त्यातूनही उभारून येत आहे. तेथे पहा माझा दुर्मुख पडला आहे, भिमाने त्याला मारले त्याच्या प्रतिज्ञे नुसार. त्याला अर्धे खाऊन टाकले आहे श्वापदांनी. माझी राजबिंडी मुलं ती गिधाड खात आहेत ते मला पहावत नाही. तो पहा चित्रसेन त्याला सुद्धा भिमाने मारले तो मातीत पडला आहे. त्याच्या बायका त्याच्या भोवती रडत बसल्या आहेत. ते मला पहावत नाही. अरे कृष्णा, तो माझा विविंसती ज्याच्या देखणेपणामुळें तो स्त्रीयांचा आवडता झाला होता तो तेथे पडला आहे. त्याच्या अंगात कितीतरी बाण घुसले आहेत ते मला पहावत नाही. त्याच्यवर गिधाडं बसलेली आहेत ते मला पहावत नाही. त्याचा मृत्यू क्षत्रियाचा होता. एकेकाळी सुंदर ललना त्याच्या मागे लागत होत्या ते मी पाहिलेले आहे. आता त्याच्यावर कावळे पसलेले मी पहात आहे. ते मला पहावत नाही. अरे कृष्णा तो पहा दुःशह मोठा वीर योद्धा पण आता मरून पडला आहे भिमाच्या हल्ल्याने तो मेला. त्याचे सगळे शरीर बाणांनी भरलेले आहे. ह्याला खरा क्षत्रियाचा मृत्यू म्हणतात. ते त्याला मिळाला आहे. मेल्यानंतर सुद्धा तो किती देखणा दिसत आहे ते पहा, कृष्णा.

स्त्री पर्व भाग एकोणीसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग विसावा

गांधारी बोलत असते, अरे जनार्दना, ज्याच्या शौर्याच्या गाथा लोकांनी गाव्यात जो एकटा लढत होता त्याच्यापेक्षा बलाढ्य योद्ध्यांशी तो पहा तेथे पडला आहे. तो अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू. त्याला माझ्या मुलांनी कपटाने मारले ते मला समजले तेव्हां मी हताश झाले. किती लहान होता तो पांडव, त्याला माझ्या मुलांनी तसे मारले ते मला ऐकवत नाही. मारल्यांनतर सुद्धा त्याचे तेज कमी नाही झाले ते वाढतच आहे हे मला पहावयाला आवडले. ती त्याची पत्नी त्याला शोधत फिरत आहे. त्याला पाहिल्यावर ती त्याचा रक्ताने भरलेला चेहरा पुसत आहे. ते मला पहावत नाही. ती त्याच्या मुखाचे चुंबन घेत आहे. ते मला पहावयाला आवडले. तिने त्याचे सोनेरी कवच काढले व आता ती त्याचे बाणांने छिन्नभिन्न झालेले उर पहात आहे. ते मला पहावत नाही. अरे कृष्णा, तो तुझ्या बरोबरीचा होता कारण तो तुझ्या बहिणाची होता. त्याचे चेहर्याची ठेवण तुझ्यासारखी होती. आता तो मातीत पहूडला आहे कायमचा. सगळ्या वैभवाच्या पलिकडे तो गेला आहे सूर्य लोकात. व्यायाम करून तयार झालेले ते शरीर कसे दिसत आहे पहा. त्याचे कौतुक करावे तितके कमी होईल. त्याची पत्नी अभिमन्यूला विचारते कीं तो आता तिच्याशी कां बोलत नाही. पूर्वी तू मला लांबून हाका मारून बोलावत होतास आता मी तुझ्या जवळ आहे पण तू मला का उत्तर देत नाहीस. तो विलाप मला पहावत नाही, गांधारी कृष्णाला सांगते. गांधारी कृष्णाला सांगते, ती पहा त्याचे रक्ताने भरलेले हात हातात घेऊन त्याचे रक्ताने माखलेले केस पहात होती. त्या आमच्या योद्ध्यांचा मी धिक्कार करते जे कर्ण, कृप आणि द्रोण होते. ते त्या शूरवीराला असे कसे घेरत होते? तुला पांचालांचे आणि पांडवांचे संरक्षण असतांना तसे कसे झाले"? ते कितीही जिंकले तरी तुझा मृत्यू कधीच भरून निघणार नाही. तेथे स्वर्गात अप्सरा तुझी करमणूक करतील तेथे तुला माझी आठवण येईल कां सख्या असे त्याची बायको बोलत होती. गांधारी पहाते कीं, मत्स्य लोक त्यांची राजकन्या उत्तरा अभिमन्यूची पत्नी, नेत होते. विराटाच्या देहा भोवती गिधाडं जमलेली होती. ते त्या

शरीराला मजेत खात होती. अभिमन्युच्या शिवाय तेथे मत्स्य राजपुत्र उत्तर, सुदक्षिण आणि लक्ष्मण मरून पडलेले होते.

स्त्री पर्व भाग विसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग एकविसावा

गांधारी पुढे बोलत असते, "तो पहा महाबली कर्ण तेथे त्याच्या रथाच्या चाका खाली पडलेला आहे. तो साक्षात सूर्य आता शांतपणे पडला आहे. त्याचा पुत्र अनेक योद्ध्यांचा वध केल्यानंतर मारला गेला ते पलिकडे पडला आहे. त्याचा वध धनंजयाने केला जसे कर्णाचा सुद्धा त्याने केला. सव्यसाचीने अनेक योद्धे मारले जे अजिंक्य समजले जात होते. त्या सगळ्या योद्ध्यांच्या बायका त्यांच्या देहाजवळ बसल्या होत्या. माझा पुतण्या युधिष्ठीर तेरा वर्षे झोपला नव्हता त्याच्या चिंतेने तो पोखरला गेला होता. ती पहाते की, कर्णाची बायको व राधा त्याच्या देहाजवळ शोक करत बसल्या होत्या. त्याचा मृत्यूसुद्धा चलाखीने केला होता. गांधारी बोलते ती तशा चलाखीचा धिक्कार करते. सुशेनाची आई दुःखाने बेहोष होते. त्याचा मृतदेह पाहून खाली पडते. ती पहाते कीं, त्याचे शरीर अर्धे खाल्लेले होते. अंगा वरील खुणामुळे त्याची ओळख करता आली होती.

स्त्री पर्व भाग एकविसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग बाविसावा

गांधारी बोलत असते, ते पहा अवंतीचे राजे भिमाने मारले त्यांना. गिधाड त्याना मोठ्या चवीने खात आहेत. अनेक दोस्तात वावरणारे ते आता एकटे गिधाडात अडकले आहेत. अनेक शत्रूंचा पराभव करणारे आता गिधाडांचे खाद्य झाले आहेत. काळाचा महीमा आहे हा. त्यांच्या बायका रडत बसल्या आहेत. तो प्रतिपाचा मुलगा वल्हीक, मोठा शूर युद्धा आता शांत पडला आहे घोड्याच्या खाली अडकलेला. अर्जुन त्याच्या मुलाच्या मृत्यूमुळे रागावलेला वृद्धक्षत्राचा वध करतो. ती जयद्रथाचे कलेवर पहाते. ज्याला द्रोण संरक्षण देणार होते. त्याचा देह गिधाडांनी खाऊन संपवला होता. उरलेले भाग हिंस्र श्वापदं खेचून वनात नेत होते. त्याची बायको ते थांबवण्याचा प्रयत्न करत होती. यवनांचे व कंबोजांचे तसेंच सिंधचे व सौवीरांचे योद्धे तेथे पडलेले दिसत होते. सगळे खाऊन टाकलेले होते गिधाडांनी. द्रौपदीचा उपमर्द करण्याचा माझ्या जावयानी प्रयत्न केला त्याला पांडवांनी योग्य शासन केले ते मला आवडले. तरी मला आता माझ्या मुलीची चिंता होते. ती तिचा नवरा मेला म्हणून रडत आहे. ती पांडवांना दोष देत आहे. ती स्वताच्या पतिच्या कूलक्षणा बद्दल अनभिज्ञ आहे. कारण ती अजून लहान आहे. माझ्या सगळ्या सुना विधवा झाल्या आहेत. दुःशला तिच्या नवर्याचे डोके शोधत आहे. जे केव्हांच नष्ट झाले त्या शापामुळे.

स्त्री पर्व भाग बाविसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग तेविसावा

गांधारी बोलत असते, तेथे सल्य पडला आहे. नकूल व सहदेवांचा मामा. त्याचा वध युधिष्ठीराने केला. तो नेहमी सांगत असे कीं, तो जनार्दनाच्या बरोबरीचा आहे. तो मद्रदेशाचा अधिपति शांतपणे झोपला आहे. त्याचे डोळे खूप छान होते असे सांगतात ते कावळ्यांनी खाऊन टाकले आहेत. त्याची लाल जीभ पक्षांनी खाऊन टाकली आहे. त्यांच्या स्त्रिया आकांत करत आहेत. ते मला ऐकवत नाही. तेथे पलिकडे भागादत्त पडला आहे. तो एकेकाळचा इंद्राचा मित्र. डोंगराचा राजा. नेहमी हत्ती वरून लढणारा, त्याच्या गळ्यातील सोन्याचा हार अजून तेथे तसांच आहे. हत्तीच्याच खाली अर्धा अडकलेला दिसतो. त्याची व पार्थाची लढाई तुफान झाली असें सांगतात. शेवटी तो मेला. पलिकडे आजोबा शांतपणे समाधीत आहेत शरपंजरी. त्यांचे डोके अर्जुनाने मारलेल्या तीन शरावर टेकलेले दिसत आहे. अरे माधवा, तो ज्ञानी अजून समाधीत आहे त्याला युद्ध संपल्याचे माहीत आहे कीं नाही समज नाही. भिष्म एक वसू होते त्या प्रमाणे ते जगले. त्यांनी स्वतः पांडवाना सांगितले त्याच्या मृत्यूचे रहस्य व त्याप्रमाणे त्यांना मारले गेले. देवव्रत देव लोकात वसूमध्ये गेले. तेथे द्रोण दिसत आहेत माझ्या दिव्य दृष्टीला. त्यांनी सुद्धा त्यांचा मृत्यू कशात आहे ते अर्जुनाला सांगितले होते असे मला दिसते. ते त्याच्या डोक्याशिवाय पडलेले आहेत. तो कौरवांसाठी लढता लढता मारला गेला त्याच्या हातात अजून धनुष्य आहे. त्यांचे पाय ज्याला सगळे स्पर्श करत ते आता कोल्हे खेचून नेत आहेत. धृष्टद्युम्नाने त्याना मारले जे विधीलिखीत होते. द्रोणांची पत्नी कृपी त्यांचे अंत्यविधी येथेच करण्याचे ठरवत आहे. त्याला सगळे साथ देत आहेत. त्यांच्या चितेला सामवंदना दिली जात आहे. तीन ब्रह्मचारी ते करत आहेत. त्यांची चिता विविध प्रकारच्या बाणांची रचलेली आहे. त्यानंतर ते अर्ध्वर्यू गंगा किनारी जात आहेत. क्षत्रियांचे देह तसेच रणांगणी ठेवतात व कोणता प्राणी त्याला खातो त्यावरुन त्याला कोणता लोक मिळाला ते ठरवतात. गिधाडाने खाणे उत्तम समजले जाते. स्त्री पर्व भाग तेविसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग चोविसावा

गांधारी पुढे सांगत असते, तो पहा सोमदत्त. त्याला युयुधनाने त्याच्या मुलाला मारले. त्याला आता मोठे पक्षी खात आहेत. त्या पित्येचे दुःख किती असेल त्याची कल्पना मी करू शकते. तो युयुधनाच्या नांवांने शिव्या घालत आहे. पुढे भुरिश्रव पडला आहे. त्याचा एक हात अर्जुनाने कापला होता. त्याचे डोके सत्यकीने कापले व तेथेच टाकले दुर्योधनाच्या पुढे. सोमदत्ताच्या मुलाची पत्नी त्याच्याशी बोलत आहे. तुम्ही अनेक यज्ञ केले आहेत. तुम्ही युद्धभूमीत गेला त्यामुळे क्षत्रियाचा मान तुम्हाला मिळाला. आता जेथे अहात तेथे तपस्या करत रहा. मी वेळीच तुम्हाला भेटण्यास येईन. त्याची सुन तिच्या नवर्याला शोधत होती. त्यांच्या धावण्याने तिचे काळे केस हेलकावे घेत होते. त्यांचे दुःख मी समजू शकते. त्याचा वध सत्यकीने केला होता जेव्हां तो समाधीत होता. त्या शोकाकूल होत्या व मातीत गडबडा लोळत होत्या. त्या यज्ञात मग्न असलेल्याला अर्जुनाने व नंतर सत्यकीने कां मारले त्याचे उत्तर त्या दोघाच्या गत जन्माशी संबंधित होते ते मला समजले. म्हणून मी त्या दोघांना दोष देत नाही. त्याचा तुटलेला हात घेऊन त्या त्याच्या बायका शोक करत होत्या. ती हत्त्या कृष्णाच्या समक्ष झाली होती. त्याबद्दल अर्जुन काय सांगणार आहे ते सांगता येणार नाही. त्या बायका तुला व धनंजयाला दोष देत आहेत. तो माझा भाऊ शकूनी गांधारांचा राजा, ज्याची कुटनिती सर्वाना माहीत आहे ज्यामुळे पांडव वनवासात गेले व ह्या युद्धाची निव घातली गेली. त्याने द्युताचा डाव केला नसता तर हे कांहींच झाले नसते. त्याला वारा घालण्यासाठी दोन सोन्याचे पंखे बसवले होते त्याच्या रथात. आता पक्षी त्याला त्यांच्या पंखानी वारा घालत त्याला खात आहेत. त्याला सहदेवांने मारले. माझा भाऊ मायावी विद्येत तरबेज होता पण पांडवानी त्याला ठार मारले. जेव्हां माणसाची वेळ येते तेव्हां त्याच्या सगळ्या विद्या आणि कला कोठे जातात ते समज नाही. जसें कर्णाची वेळ आली तेव्हां ते मंत्र विसरला. द्रोणांचेसुद्धा तेंच झाले. किती मोठे पक्षी माझ्या भावाच्या शरीरावर स्वार झाले आहेत पहा. त्याच्या द्युताच्या खेळानी माझ्या मुलांचा नाश झाला,

मी कोणाला दोष देऊ,  कृष्णा?  अरे मला वाटते तो ज्या लोकात जाईल तेथेसुद्धा तेंच खेळ खेळेल जे तो माझ्या मुलांशी खेळत होता.  तेथेसुद्धा चुगल्या करून भांडणं लावेल. त्याला कित्येकदा मी सांगत असें कीं,  त्यांनी गांधारला जावे पण ते कधी गेलाच नाही. तसा गेला असतां तर हे सगळे झालेच नसते.  सगळा दैवाचा खेळ दुसरे काय!

स्त्री पर्व भाग चोविसाला संपला.

# स्त्री पर्व

## भाग पंचविसावा

गांधारा कृष्णाला सांगत असते, पहा तो कंबोजचा राजा शांत पडला आहे. त्याची बायको त्याच्या जवळ बसली आहे. त्याचे रक्ताने भरलेले हात ती तिच्या हातात घेऊन रडत आहे. ती बोलते त्याच्यी सहवासाची तिला आठवण येणार. ती दुःखाने थरथरा कांपत होती. त्यांचे सौंदर्य त्या स्थितीतसुद्धा उभारून आलेले दिसत आहे. तो पहा जयत्सेन त्याच्या भोवती त्याच्या मगधी स्त्रिया जमल्या आहेत. ते दृष्य मनाला डागण्या देणारे आहे. त्या मौल्यवान गाद्यांवर बसणार्या आता मातीत बसल्या आहेत आणि रडत आहेत. तेथे कोसलचा राजा कायमचा झोपला आहे. बृहद्वलाच्या बायका त्याच्या नांवाने शोक करत आहेत. त्याच्या शरीरात अभिमन्यूने मारलेले भाले अजून तसेंच आहेत. त्यामुळे तो जमिनीवर वेडावाकडा पडला आहे. त्याच्या परिवारातील स्त्रिया ओक्साबोक्सी रडत आहेत. तेथे द्रोणांनी मारलेले धृष्टद्युम्नाची मुलं पडलेली आहेत. त्यांना द्रोणानी मत्सरा पोटी क्रूरपणे मारले ते मला आवडले नाही. त्या पलिकडे द्रोणाच्या बाणाने मारलेले कित्यक योद्धे मी पहात होते. ते सगळे लहान मुलं होती. त्यांना मारण्यात द्रोणांना कोणता आनंद मिळत होता. युद्ध शास्त्र सांगते बरोबरीच्यानी लढावे मग द्रोण अशा लहान मुलांना कां मारत होते"? ते मला आवडले नाही. त्या पुढे केकयांचे ध्वज खाली पडलेले दिसत आहेत. त्याचे रेशमी कापड सुर्याच्या उन्हात चमकत आहे. पलिकडे राजा द्रुपद पडला आहे. त्याच्या परिवाराचे त्याच्या भोवती जमलेले आहेत. रडारड चालू आहे. ते पाहून मी माझे दुःख विसरले. पांडवांना मदत करणार्यांचा ते शिरकांड मला आवडले नाही. पांचालांच्या रिवाजानुसार त्यांना अग्नीसंस्कार दिला जात होता. त्याच्या उजव्या बाजूला छेड्डीचा राजा धृष्टकेतू पडला आहे. ज्यांने द्रोणांना चांगली टक्कर दिली होती. हजारांची कत्तल करणारे स्वता सुद्धा तसेंच मारले जात होते. त्यांच्या बायका त्याच्या देहाजवळ रडत बसल्या आहेत. धृष्टकेतूचा मुलगा जवळच पडला आहे. तो त्याच्या बापाची साथ कधी सोडत नव्हता. अखेरीस दोघे मेले द्रोणाच्या बाणांनी. तसाच होता लक्ष्मण त्याने कधी दुर्योधनाची साथ

सोडली नव्हती. कर्णाची मुलं सुद्धा त्याच्या बरोबर राहून लढत होती. अवंतीचे दोन राजपुत्र तेथे मेलेले होते. ते पांडव आणि तू (कृष्ण) मारले जाणारे नव्हता. तसेंच सत्यकी सुद्धा मारला गेला नाही. बाकी सगळे त्या युद्धात मारले गेले आहेत. मग तो कितीही मोठा योद्धा असो. कौरवांतील अश्वत्थामा, कृप आणि कृतवर्मन जीवंत राहीले. बाकीचे सगळे मारले गेले. जेव्हां तुझी शिष्टाई अपयशी झाली म्हणून उपप्लव्याला गेलास तेव्हा मला विदूर बोलले कीं, मी माझ्या मुलांचा विचार करणे सोडून द्यावे कारण ते आता जास्त काळ रहाणार नाहीत.

वैशंपायन पुढे सांगतात, असे बोलून ती कौरवांची माता अतिशोकांने बेशुद्ध होते. ती कृष्णाला सगळे सांगत होती. ती कृष्णाला सांगत होती दोनही बाजूचे अपरिमित नुकसान झाले आहे एकमेकांना मारण्यामध्ये. अरे जनार्दना, "मला सांग, तू सगळे जाणणारा असतांना हा संहार कां नाही थांबवलास? तू हुशार आहेस तू तो सहजपणे थांबवू शकला असतात. कां, तू जाणूनबुजून तटस्थ राहीलास व जे होते ते होऊ देत होतास"? "मला जे पावित्र्य माझ्या पतिची सेवा करून प्राप्त झाले आहे ते वापरून मी तुला शाप देणार आहे. त्याप्रमाणे तू तुझ्या आप्तांच्या नाशास कारणीभूत होशिल. आजपासून तीस वर्षानी तू तुझे आप्त मारशिल व त्यानंतर एका वनात विनाकारण मारला जाशिल". वैशंपायन सांगतात कीं, तो शाप ती गांधारी कृष्णाला देते.

वैशंपायन पुढे सांगतात,तो शाप ऐकून कृष्ण तिला बोलतो, "ह्या जगात वृश्नींचा नाश फक्त मी करू शकतो त्याप्रमाणे तुमचा शाप खरा होईल असे मी सांगतो. अशारितीने कृष्णाने त्याच्या मृत्यूची निश्चिती केली. वृश्नीना देव, असुर, राक्षस, यक्ष, गंधर्व असे कोणाही मारू शकणार नाही. ते यादवीनेच मरतील हे आधी ठरलेले आहे तेंच तुम्ही बोलत अहात". ते संभाषण पांडव ऐकत असतात. ते कृष्णाचे ऐकून थक्क होतात. त्यांच्यात नैराश्य पसरते.

स्त्री पर्व भाग पंचविसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग सव्विसावा

भगवान बोलतात, "आता उठ, दुःख करत बसू नकोस. त्या संहाराचे कारण तुझा मुलगा असतांना तू मला कसा दोष देत आहेस"? त्याचा हलकटपणा, स्वार्थ, उद्धटपणा, द्वेषी स्वभाव ही ह्या संहाराची कारणं आहेत. त्या दोषांवर पांघरूण घालणारी तू, मला शाप देत आहेस? जे घडून गेले त्यावर पुन्हा पुन्हा विचार करण्याने जे दुःख प्राप्त होते ते कमी होत नाही. त्या दुःखाचे व्यसन लागू शकते. तसे झाले कीं, त्यातून माणसाची सुटका होत नाही. असे दिसते की, ब्राह्मणाची बाई तत्त्वनिष्ठ व्रतस्थ ब्राह्मणाला जन्म देते, गाय शेती करणार्या बैलाला जन्म देते, वैश्य स्त्री व्यापारी माणसाला जन्म देते, शुद्र स्त्री सेवक जन्माला घालते तशा तुमच्या सारख्या राजकारणी घराण्यातील स्त्रिया संहार करणार्या क्षत्रियांना जन्म देतात. म्हणून अशी युद्ध होतात".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाचे ते कठोर परंतु, मुद्देसूद बोलणे गांधारीला आवडत नाही. ती चिडते, तरी गप्प बसते. त्यावेळी स्वताचे दुःख बाजूला करत धृतराष्ट्र युधिष्ठीराला विचारतात, "मला सांग, दोन बाजूंपैकीं कोणाचे किती गेले व किती अजून आहेत ते मला सांग".

युधिष्ठीर सांगतो, "एकंदर एक अब्ज सहाहजार साठ दशलक्ष योद्धे मारले गेले आहेत. जे त्या संहारातून सुटले त्यांची संख्या आहे चोवीस हजार एकशे पासष्ठ".

धृतराष्ट्र विचारतात, "जे मेले ते कोणत्या लोकी गेले ते मला सांग कारण तू ते सगळे जाणतोस".

युधिष्ठीर सांगतो, जे लढत मेले ते इंद्रलोकात गेले आहेत. जे नाइलाज म्हणून मेले ते गंधर्व लोकी गेले आहेत. जे लढाई सोडून जाताना मारले गेले ते गुह्यक लोकात (गुह्यक लोक म्हणजे स्कंध लोक) गेले आहेत. जे क्षत्रिय कर्तव्य करत परंतु, हत्त्या निषेधार्थक मानणारे मेले ते ब्रह्मलोकी गेले आहेत. बाकीचे सामान्य योद्धे जे एक धंदा म्हणून लढले ते उत्तरा कुरू लोकी गेले आहेत.

धृतराष्ट्र बोलतात, "तुला अशी कोणती सिद्धी आहे कीं, तू हे सगळे खात्रीने सांगत आहेस"?

युधिष्ठीर सांगतो, "वनवासाच्या काळात आम्ही तिर्थयात्रा करत होतो तेव्हां तेथे भेटलेले योगी लोमस ऋषी मला ती विद्या शिकवत होते".

धृतराष्ट्र बोलतात, "मला वाटते कीं, आपल्या लोकांचे देह अशीरितीने हिंस्त्र प्राणी खातात ते योग्य नाही. त्यापेक्षा त्यांना अग्नीच्या भक्षस्थानी देणे जास्त उचित आहे. जे येथे दिसत आहे ते मनाला त्रास देणारे आहे. कोणा कोणाचे अग्नीसंस्कार करावेत ते ठरवा".

वैशंपायन पुढे सांगतात, ती आज्ञा मानून युधिष्ठीर कौरवांचे पुरोहित सुधर्मन ह्याना त्या अग्नीसंस्काराचा व्यवस्था करण्यास सांगतात. त्यानंतर ऋषी धौम्य पुढे होतात. संजयसुत त्यांना मदत करण्यास तयार होतो. विदूर, युयुत्सू कौरवांपैकी, त्यांचे नोकर इंद्रसेनाच्या मार्गदर्शना खाली ते कार्य सुरू करतात. अनेक चिता रचल्या जातात त्यातून असंख्य योद्ध्यांचे उरलेले भाग अग्नीमध्ये सोडले जातात जसे यज्ञात आहुती देतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणात सुके काष्ठ जमा केले जाते. त्यासाठी मोडलेल्या रथांचे भाग वापरण्यात येतात. सगळ्या कौरवांचे देह एकत्रपणे मोठ्या चितेवर ठेवले जातात. त्यात दुर्योधन, सल्य, भुरिश्रव, जयद्रथ, अभिमन्यू, दुःशासन, लक्ष्मण, धृष्टकेतू, बृहंत, सोमदत्त, शेकडो श्रींजय, राजा क्षेमधन्व, विराट, शिखंडी, द्रुपद, असंख्य पांचाल, धृष्द्युम्न, युधमन्यू, उत्तमौजस, कोसलचा राजा, द्रौपदीची मुलं, शकूनी, अचल आणि वृषल, राजा भागादत्त, कर्ण, त्याची मुलं, केकया राजपुत्र, घटोत्कच, त्रिगर्त, अलमवूष, जलासंध, आणि इतर असंख्य ह्यांच्या साठी अनेक चित्या तयार केल्या होत्या व त्यावर त्यांना सन्मानपूर्वक अग्नीसंस्कार केले गेले. ते झाल्याबरोबर त्या शोक करणार्यांचे रडणे थांबले. जोवर ते मृत त्यांच्या पुढे होते तोवर ते दुःख उफाळून येत होते. ते अस्थीरुप झाल्यावर ते कमी झाले. त्यानंतर ताबडतोब पितृमेध विधी केला जातो (पिंडदान विधी). साम गान होत होते. त्यातून पितरांचे आवाहन झाले कीं, ते त्या मृतांना त्याच्या लोकी जाण्यात मदत करावेत. हे विधी ब्राह्मणांत होते ते त्या काळा पासून क्षत्रियानी सुद्धा स्वीकारले. त्या

काळी वैश्य व शुद्र त्यांचे मृत जमिनीत पुरत होते तेसुद्धा अग्नी संस्कार करू लागले. अशारितीने त्या काळापासून समस्त हिंदूंमध्ये मृतांवर अग्नीसंस्कार होऊ लागले. विशेष म्हणजे मृताचे शरीर अग्नीला दिल्यांने त्याच्या आत्म्याचे शुद्धीकरण होते व तो लवकर त्या देहाच्या बंधनातून मुक्त होतो. त्यामुळे दुःखसुद्धा कमी होते. चिता जळत असतांना त्याच्या ज्वाळांकडे पहात साम गाईले गेले, त्यामुळे ते आत्मे मुक्त झाले त्यांच्या पुढच्या प्रवासासाठी.

जे बेवारस सैनिक होते त्यांची वेगळी चिता रचली व तिला त्यांचा वारस बनून विदूर अग्नी देतात त्यांच्या आत्म्याच्या मुक्ती करता. त्या सगळ्या अस्थी (राख) नंतर धृतराष्ट्रांच्या नेतृत्वाखाली व विदूरांच्या आणि धौम्य ऋषींच्या मार्गदर्शना खाली गंगेत सन्मान पूर्वकपणे सोडल्या जातात. ।। शांतिः शांतिः शांतिः ।। असे त्रिवार वंदन त्या मृतांना केले जाते.

स्त्री पर्व भाग सव्विसावा संपला.

# स्त्री पर्व

## भाग सत्ताविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, ते त्या सगळ्या लहान मोठ्या कमी जास्त शौर्य गाजवलेल्या योद्ध्याच्या अस्थी घेऊन शांतपणे गंगे किनारी पोहोचतात. त्यात स्त्रियासुद्धा असतात. त्या स्त्रिया पाण्यात उतरून त्यांच्या मृत प्रियजनांच्या साठी अर्घ्य देतात. त्या शुरांचे दागिने व इतर वापरलेले सर्व गंगेत सोडले जाते. ह्याचा अर्थ असा कीं, ते शुद्ध झाले व त्यानंतर गंगामैया ते कोणालाही देऊ शकते. किनार्यावर वावरणारे लोक ते काढून घेऊ शकतात. तेथे त्यांचे श्राद्ध होते सामाईक स्वरुपाचे कारण त्यांचे कोणी तेथे उपस्थित नव्हते. गंगेचा वेगवान ओघ ते सगळे घेऊन जातो कोठल्या कोठे ते माहीत नसते. सगळे ते उदास मनाने पहात होते. एक पर्व संपले होते जे दुर्योधनाने सुरू केले व युधिष्ठीराने संपवले. तेथे जमलेले जाणकार अर्जुनाला सांगतात कीं, ज्या कर्णाचा त्यांने वध केला तो त्याचाच मोठा बंधू होता. तोसुद्धा एक भटकलेला पांडव होता. तो सुताचा मुलगा नव्हता. तेव्हां त्याचे श्राद्ध पांडवांनी करावे असे ते सांगतात. कुंती त्याला अनुमोदन देते. पांडव ते ऐकून अतिशय शोकाकूल होतात. त्यांना समजत नाही आता काय करावयाचे. युधिष्ठीर रडू लागतो, तो बोलतो जर ते त्याला आधी सांगितले असते तर मी त्याचे पाय धरले असते पण मला कोणी ते सांगितले नाही. कर्णाचे गुण त्याना आठवून येतात. परंतु, ते झाले होते. त्यात काहीं फरक होणार नव्हता आता. त्याबद्दल कोणाला दोष देणे सुद्धा अयोग्य होते, ती नियति होती. कौरव त्याची पुजा करत होते जसे आम्ही अर्जुनाची करत असू. कुंती सांगते कीं , त्याचे रहस्य तुम्हाला न सांगण्याचे करण कर्ण स्वतः होता. त्यानेच तिला ते न सांगण्याचे वचन घातले होते. परंतु, दुर्योधनाला ते माहित होते व कुंतीच्याच विनंतिनुसार त्याने कर्णाला राजा केले होते. असें कुंती त्याना सांगते . धनंजय कृष्णाकडे पहातो, तो खुणवतो की, जे कुंती सांगते ते खरे आहे. ते सगळे ऐकून धनंजय व्यथीत होतो बेचैन होतो. आम्ही आमच्या भावाला मारले ते त्यांना असहय्य करणारे होते. अज्ञानात मोठी शक्ती असते त्याचा ते अनुभव घेत होते. कृष्ण बोलतो ते विधीलिखीत होते ते होणारच म्हणून त्याचा विचार

करू नकोस. ते कर्णाचे श्राद्ध करतात. सहदेव त्यांना सांगतो कीं, एका द्वंद्वात कर्णाने त्याला चीत केले पण न मारता सोडून दिले होते. भिमसुद्धा तशा आठवणी सांगतो. त्याचा अर्थ तो आपल्याला मारू इच्छित नव्हता परंतु, दुर्योधनापुढे लढण्याचे नाटक करत होता. असा आठवणीमुळे त्या सगळ्या पांडवांना अतिशय दुःख होत होते. नियतीच्या त्या क्रूर खेळाचा त्याना मनस्वी राग येतो. कदाचित कर्ण अर्जुनालासुद्धा मारणार नसेल अशा विचाराने जिश्नू जास्त व्यथीत होतो. सर्व कांहीं जाणणारा जनार्दन मात्र कांहीं न बोलता शांतपणे तेथे उभा असतो. त्यानंतर तेथे जमलेल्या स्त्रिया एकदम मोठ्यांने हंबरडा फोडतात. त्यांच्या रडण्याने आसमंत खिन्न झाला आहे असे वाटते.
बुद्धीमान कुरु राजा युधिष्ठीर त्या महिलांचे सांत्वन करत असतो. जो स्वतः मनस्वी खिन्न झालेला असतो कर्णाच्या आठवणींने. त्याच्या समोर कर्णाच्या परिवाराला आणले जाते. त्यांच्या समक्ष त्याचे श्राद्ध तो करतो. त्यासाठी तो गंगेत स्नान करतो. सगळे पांडव त्यांच्या मोठ्या भावाच्या आठवणीने अतिशय व्यथीत झाले होते. कर्णाच्या बद्दल जास्त माहिती ते नंतर कुंती कडे विचारणार असतात .

# - स्त्री पर्व (विलाप पर्व) संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,